म.ग्रं.सं., संग्रह शाखा, ठाणे.
विषय : नाटके
सं.क्र. : २०६०२

IRBK-0120602
IRBK-0120602

म. ग्रं. सं. ठाणे.

वाचनालय
नाटक
२०६०२
३।११।८४

# आश्चर्य नंबर दहा

IRBK-0120602

“ Wisdom lies in the simple admission that things are not always the way I would like them to be, that I myself am not so good or so kind or so hardworking as I would like to believe. And yet.... and yet.... with each sun that rises, there is a new day, a new challenge, a new opportunity for doing better. ”

“ O Lord, grant me the strength to change things that need changing; the courage to accept things that cannot be changed, and the wisdom to know the difference.”

प्रकाशक : अशोक केशव कोठावळे, मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई ४.
मुद्रक : अ. के. कोठावळे, ॐ मुद्रणालय, २५० अ, शनिवार पेठ, पुणे ३०.
पहिली आवृत्ती : एप्रिल १९७१, दुसरी आवृत्ती : एप्रिल १९८४,
© सौ. प्रमिला तोरडमल. मुखपृष्ठ : मोहन वाघ.
मांडणी : अरुण घाटे.

किंमत वीस रुपये

# आश्चर्य नंबर दहा

प्रा. मधुकर तोरडमल

प्रा. मधुकर तोरडमल

आश्चर्य नंबर दहा

आश्चर्य नंबर दहा

प्रा. मधुकर तोरडमल

मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई ४.

या नाटकाचा प्रथम प्रयोग चंद्रलेखा, मुंबई, या संस्थेने शिवाजी मंदिर, दादर येथे ६ जानेवारी १९७१ रोजी केला. त्यात खालील कलाकारांनी भूमिका केल्या.

**प्रा. बाजीराव पळपुटे :** प्रा. मधुकर तोरडमल. **सौ. विमल पळपुटे :** आशालता वाबगांवकर. **जयंत पळपुटे :** गजन जोशी. **गजाभाऊ भिंगारे :** गणेश सोळंकी. **राजा सरपोतदार ऊर्फ रघुनाथ :** दत्ता भट. **योगिराज मुकेश :** जनार्दन सोहनी. **टेलर :** मोहन मुंगी.

**दिग्दर्शन :** प्रा. मधुकर तोरडमल. **नेपथ्य :** रघुवीर तळाशीलकर. **प्रकाशयोजना :** बाबा दळवी, अरुण पराडकर. **रंगभूषा :** कृष्णा बोरकर. **निर्माते :** चंद्रलेखा, मुंबई.

व्यावसायिक रंगभूमीवर यावे किंवा नाही अशा मनाच्या दोलायमान अवस्थेत असताना ज्यांनी आग्रहपूर्वक प्रोत्साहन दिले आणि ज्यांच्या 'वेड्याच्या घराने' नट म्हणून माझे प्रथम नाव झाले ते आजचे आघाडीचे नाटककार प्रा. वसंत कानेटकर यांस प्रेमादरपूर्वक अर्पण....

मधुकर तोरडमल

मित्रांनो, आपलं हे जग म्हणजे एक आश्चर्य आहे. त्यात राहणारा माणूस हे त्याहूनही मोठं आश्चर्य आहे. आणि त्या मनाला ज्याचा सतत पाठलाग करावा लागतो, जे मनातच असून मनाला गवसत नाही, ते तर सर्वांत मोटं आश्चर्य आहे. खरं म्हणजे गुणानुक्रमें नंबर एकचं आश्चर्य. पण या वशिलेबाजीच्या जगात गुणांचं चीज होतंच असं नाही. जगातल्या आश्चर्यांच्या यादीत अशाच नऊ वशिल्यांच्या तट्टांनी आधीच नंबर लावून ठेवले आहेत. ठीक आहे. जे आहे त्याबद्दल आता वाद घालत बसण्यात अर्थ नाही. तेव्हा आपल्या या नंबर एकच्या आश्चर्याला आपण म्हणूया ... आश्चर्य नंबर दहा ...

# अंक पहिला

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. 20502 नों. दि. 2/99/09
वि. ......... क्र. ..........
जी24

[ प्रा. बाजीराव पळपुटे यांचे घर. एकंदर टापटीप डोळ्यांत भरणारी. फर्निचर, टेलिफोन, रेडिओ जिथल्या तिथे. प्राध्यापक मध्यमवयीन. डोक्याला टक्कल, पोट सुटलेले, अवतार गबाळ. सौ. विमलाबाई पळपुटे दिसायला प्राध्यापकांना उजव्या– तरुण – व्यवस्थित. प्राध्यापक एका कोपऱ्यात पेपर तपाशीत बसलेले आहेत. पडदा वर जातो तेव्हा बाजीराव एकटाच – फोनची घंटा वाजू लागते. आतून विमल केस विंचरीत प्रवेश करते. केस बांधून रिसीव्हर उचलते. ]

**विमलाबाई :** ( फोनवर ) हलो, मिसेस पळपुटे हिअर – कोण मिनी का ? अग, परवा येणारच होते; पण यायला निघाले आणि तुझ्या डॅडींना ॲक्सिडेंट झाला...नाही; तसा काही फार मोठा नाही झाला. मोरीत पाय घसरून पडले. ( प्राध्यापक नापसंती-दर्शक चुळबूळ करतात. ) कोळशाचं पोतं पडल्यासारखा आवाज झाला म्हणून पाहायला गेले, तर हे फरशीवर आडवे. फरशी फुटली की काय हे पाहावं म्हणून ह्यांना उठवायला गेले, तर हे इंचभरसुद्धा हलायला तयार नाहीत. हालचाल नाही की काही नाही. पाच मिनिटं अगदी सुन्न. मी इतकी घाबरले......नाही नाही. तसं काही घाबरण्यासारखं झालं नाही ग. पण तुला डॅडींचं माहिती आहे ना ? एकदा लोळण घेतल्यावर साधं या अंगावरून त्या अंगावर व्हायचंसुद्धा किती जिवावर येतं ह्यांच्या. हातपाय पसरून

पडून राहायला मिळालं म्हणजे यांना स्वर्गसुख. पसरले की पसरले. मग उठून बसणार नाहीत. बसले तर उभे राहणार नाहीत; आणि उभे राहिले तर कधी एकदा लोळायला मिळतं या चिंतेनं खचून अर्धे जमिनीला टेकतात. अग, जयंत सांगत होता, कॉलेजमध्येसुद्धा खुर्चीवर फतकल मारून बसतात... टेबलावर रेलतात आणि मगच शिकवतात.

**बाजीराव** : आजच्या दिवसात तो फोन बंद करणार आहात ना तुम्ही ?

**विमलाबाई** : तुम्ही पेपर तपासा बघू मुकाट्यानं.

**बाजीराव** : हो. पेपर तपासा. फोनला लाऊडस्पीकर लावून घे आणखी. म्हणे पेपर तपासा. पेपर काय तपासा, कपाळ ?

**विमलाबाई** : मग उठून आतल्या खोलीत जा... (फोनमध्ये) तुझे डॅडी ग. अं....हो....हों...थांब हं. फोन ठेवू नकोस खाली. (प्रोफेसरांना) अहो—मीना विचारते आहे, डॅडींचा राग अजून गेला नाही का ? बोलणार का तिच्याशी थोडं ?

**बाजीराव** : मी त्या कार्टीचं तोंड पाहणार नाही जन्मात !

**विमलाबाई** : एवढं चिडायला काय केलंय हो असं तिनं ?

**बाजीराव** : काय केलंय ? कार्टी माझ्या तोंडाला डांबर फासून पळून गेली घरातून, तरी तिनं काही केलं नाही ?

**विमलाबाई** : पळून कशानं... चांगली चालत गेली. आणि जाऊन तरी लग्नच केलं ना ? दुसरं तिसरं तर नाही ना काही केलं ?

**बाजीराव** : पण लग्न केलं कुणाशी ? शिखाशी ? सरदारजीशी ? आफ्टर ऑल द पर्सन्स सरदारजी ?

**विमलाबाई** : मग काय बिघडलं त्यात ? कुणाशीतरी करायचं ते शिखाशी केलं. तिला पटलं, तिनं केलं. तुमचं हो काय गेलं ?

**बाजीराव** : प्रेस्टीज गेलं. आख्खं कॉलेज—आख्खं गाव हसतंय मला. प्रो० बाजीराव पळपुट्यांचा जावई सरदारजी. आमच्या कॉलेजातली कार्टी तर मलाच सरदार बाजीराव पळपुटे म्हणतात.

**विमलाबाई** : म्हणू देत. तुम्हाला नाही ना सरदारजीशी संसार करायचा ? झालं तर मग.

**बाजीराव** : काही तरी बोलू नकोस उगीच. तुला म्हणजे—

विमलाबाई : पेपर तपासा. ( फोन उचलून ) काही नाही ग. नेहमीचं च. बरं, ते जाऊ दे. तुझा सरदार काय म्हणतोय ? हं–असं. झकास चाललंय ना तुझं ? तू आनंदात आहेस ना ? मग झालं तर...तसे चांगले असतात हं हे लोक. उमदे–दिलदार–प्रेमळ...

बाजीराव : अहो –

विमलाबाई : आणि तुझा नवरा त्या पगडीत दिसतो तरी किती रुबाबदार – नाहीतर तुझे डॅडी. हॅट घातली ना की, लहान डब्यावर मोठं झाकण ठेवल्यासारखं तोंड दिसतं ह्यांचं.

बाजीराव : हे पाहा –

विमलाबाई : हं – असं ? डॉक्टरीणबाईंना भेटून आलात तुम्ही ? बरं.. ...कोणती तारीख दिली ? हं – अस्सं – हो हो....मला माहीत आहे. काय नाव म्हणालीस त्या मॅटर्निटी होमचं ?– सेवा प्रसूती गृह ? हं. कोणती तारीख दिली ? अस्सं – हं– हं. अग वेडाबाई, घाबरायचं काय त्याच्यात – अग हो हो - - पहिल्या खेपेला सर्वांना असंच होतं. मला सुद्धा झालं. खरं की नाही हो ?

बाजीराव : ( पेपर तपासण्यात गर्क ) मला ? काही नाही झालं.

विमलाबाई : मी तुमच्याबद्दल बोलते आहे का ?

बाजीराव : मग कुणाबद्दल ?

विमलाबाई : माझ्याबद्दल.

बाजीराव : हां–हां.

विमलाबाई : माझ्या पहिल्या खेपेला असंच झालं की नाही ?

बाजीराव : तर. किती ? खूपच झालं....बट इफ आय मिस्टेक नॉट, ते पहिल्या खेपेला झालं नाही. दुसऱ्या खेपेला झालं. किंवा कदाचित तिसऱ्या खेपेला असेल. पण झालं भयंकर.

विमलाबाई : तिसऱ्या खेपेला ? अहो, आपल्याला दोनच मुलं आहेत ! अगदी प्रोफेसर शोभता !

बाजीराव : काय म्हणालीस ?

विमलाबाई : पेपर तपासा ( फोनमध्ये ) मीने, तू अगदी घाबरू नकोस. सगळं व्यवस्थित होईल. अं ? हं हं. ( हसून ) अग त्याचा विचार आत्ता का झाला ? ते आपल्या हातात का असतं ? काहीतरी होईल एक– मुलगा नाहीतर मुलगी.

बाजीराव : (पेपरात लक्ष) तिसराही एक मुद्दा आहे.

विमलाबाई : काय?

बाजीराव : पण तो या गाढवानं लिहिला नाही. दोन मार्क कमी.

विमलाबाई : मिनीला मुलगा होईल की मुलगी याबद्दल बोलते आहे मी!

बाजीराव : बोल ना. त्या फोनचा कान फुटेपर्यंत बोलत राहा!

विमलाबाई : पण तिचे वडील म्हणून तुम्हाला काहीच बोलायचं नाही, असंच ना?

बाजीराव : असंच काही नाही. माझं मत विचारशील तर, मुलगी झालेली बरी.

विमलाबाई : का?

बाजीराव : मुलगा झाला म्हणजे ते आलंच....ती दाढी, त्या मिशा, ती पगडी ...

विमलाबाई : आता जन्म घेतानाच ते मूल दाढीमिशा वाढवून आणि पगडी घालून जन्माला येणार आहे?

बाजीराव : त्याचं काही सांगता येत नाही. शेवटी मुलगा कुणाचा?

विमलाबाई : काही तरी बोलू नका उगीच!

बाजीराव : राहिलं....

विमलाबाई : (फोनमधे) मीने, तुला ऐकू येतंय ना ह्यांचं बोलणं? पण तू काही मनावर घेऊ नकोस. मी आहे तुझ्या पाठीशी. तुझं सगळं व्यवस्थित होईल. काही एक अडू देणार नाही. हो हो– गाईच्या तुपाची बरणी उद्या घेऊन येईन मी येताना....

[ती हे बोलत असताना जयंत आतूनच मोठ्याने हाक मारतो. झकपक पोषाखात प्रवेश करतो.]

जयंत : मॉम (बापाकडे पाहातो. थोडा दबतो. आईच्या कानाजवळ तोंड नेतो. त्या कानावर फोन आहे. हळूच आईकडे–) मॉम–एक मिनिट....

[ती रिसीव्हर दुसऱ्या कानावर घेते. जयंत कानात कुजबुजतो. ती फोनमधे बोलत असतानाच पर्स त्याच्याजवळ देते. तो बापाकडे पाठ करून पर्समधून दहा रुपयांची नोट काढून घेतो.] थँक्स अ लॉट मॉम. (जाऊ लागतो.)

बाजीराव : चिरंजीव...

जयंत : (थबकून दरवाज्यातूनच) मला हाक मारलीत डॅडी?

बाजीराव : कुठे निघालात ?

जयंत : (गडबडून किंचित पुढे येतो) मी ? मी जरा–हं–हो. लायब्ररीत जाऊन येतो जरा.

बाजीराव : लायब्ररीत ?

जयंत : हो! सायकॉलॉजीचं गाइड आलंय नवं, ते पाहिजे होतं.

बाजीराव : बसा. खाली बसा.

जयंत : नाही...पण–डॅडी....

बाजीराव : इतक्या लवकर जाऊन काय करणार तिथे ? झाडू वगैरे मारून घेणार असलात तर त्याची आवश्यकता नाही. कॉलेजचे झाडूवाले आहेत.

जयंत : मॉम– पाहिलंस डॅडी कसे—

बाजीराव : नाही – भलतेच लवकर निघालात म्हणून म्हटलं.

जयंत : लवकर ?

बाजीराव : हो. म्हणजे आज जाणार असाल तर लायब्ररी बंद झालेली असेल. घड्याळ पाहा – आणि उद्यासाठी निघाला असाल, तर उद्या सकाळी आठ-शिवाय ती उघडणार नाही.

जयंत : नाही डॅडी – त्याचं काय आहे–

बाजीराव : माय सन, यू आर टू लेट फॉर टुडे; अँड टू अर्ली फॉर टुमॉरो. उद्या सकाळपर्यंत लायब्ररीच्या दाराशी ताटकळत बसण्यापेक्षा इथे आरामात बसा....इतकंच म्हणायचंय मला.

जयंत : ओ डॅड....

बाजीराव : (सिगरेटचं पाकीट आणि काड्यांची पेटी पुढे टाकीत) घ्या.

जयंत : (पाकीट घेत उठतो) हे ड्रॉअरमध्ये नेऊन ठेवू ?

बाजीराव : नाही...ओढा.

जयंत : कोण मी ? डॅड, मी सिगारेट ओढीत नाही हे तुम्हाला माहीत आहे.

बाजीराव : ओढता.

जयंत : अं ?

बाजीराव : तुमच्या पँटच्या खिशात चारमिनार सिगरेटचं पाकीट सापडलं मला. चोरून चारमिनार ओढण्यापेक्षा राजरोस फिल्टर टिप्ड ओढलेली तुमच्या छातीच्या दृष्टीनं बरी.

[पेपर तपासणे चालू.]

**जयंत** : म्हणजे डॅडी, तुम्ही माझ्या अपरोक्ष माझ्या पँटचे खिसे तपासून पाहता ? हॉरिबल ! हायली ऑब्जेक्शनेबल ! डॅडी, मला हे तुमचं वागणं मुळीच पसंत पडलेलं नाही. मी याचा तीव्र निषेध करतो ! तुमच्या या...

**बाजीराव** : ( पेपराकडे पाहात ) महामूर्ख ! स्टुपिड !!

**जयंत** : मला काही म्हणालात ?

**बाजीराव** : ब्लॉकहेड !!!

**जयंत** : मी ?

**बाजीराव** : ( पेपर दाखवीत ) हा. याला म्हणालो. गाढवानं कोरा करकरीत पेपर दिलाय. आणि शेवटच्या पानावर लिहितोय—

" टु अर इज ह्यूमन, टु फरगिव्ह डिव्हाइन.

इफ यू आर काइंड, थर्टी फाइव्ह मार्क्स् आर माइन. "

या दोन ओळी लिहून घाण केली नसती पेपरावर, तर स्वच्छता आणि टापटिपीचे दोन मार्क तरी देता आले असते. पण आता काही नाही. अ बीग झीरो ! ( पेपर मार्क करतो ).

**जयंत** : कोण तो ?

**बाजीराव** : नंबर २१.

**जयंत** : डिसोझा. नक्कीच ! ( उठू लागतो. )

**बाजीराव** : तुम्ही त्यांच्याच जातीचे. ऑनरेबल मेंबर आफ झीरोब्रहादर्स !

**जयंत** : ओ डॅड ! ( उठतो )

**बाजीराव** : बसा खाली. हा तुमचा. पेपर. बाप पेपर तपासणार आहे म्हणून काय वाटेल ते लिहिता ? अहो, ऐका.

**विमलाबाई** : तुम्ही बोला– मी ऐकते आहे. ( फोनमध्ये गर्क )

**बाजीराव** : बाप इंग्रजीचा प्रोफेसर आणि चिरंजीव शेक्सपिअरच्या नाटकावर लिहिताहेत, " ही नाटकं शेक्सपिअरनं लिहिली की व्हिक्टोरिया राणीनं लिहिली, याबद्दल संशोधन होऊन फायनल निर्णय हाती आल्याशिवाय मी शेक्सपिअरच्या नाटकाबद्दल काही लिहू शकत नाही. सबब पेपर कोरा. "

**विमलाबाई** : मग काय चुकलं हो त्यात ?

**बाजीराव** : फोनचा खोळंबा होतोय तिकडे.

[ जयंत उठू लागतो. त्याला ]

तुम्ही कुठे निघालात ? बसा खाली. सहामाहीची परीक्षा झाली म्हणून काय झालं– हे असं लिहितात पेपरात ?

**जयंत** : नाही डॅडी....हल्ली वाद चाललाय ना जोरात.... शेक्सपिअर एक होता की अनेक होते– की होता की नव्हता– होता तर त्यानंच ही सारी नाटकं लिहिली का ? आणि त्यानं लिहिली नसली तर मग दुसऱ्या कुणी लिहिली ? व्हिक्टोरिआ राणीनं ? की....

**बाजीराव** : ही व्हिक्टोरिआ कुठून काढलीत मधेच ?

**जयंत** : व्हिक्टोरिआ म्हणतो, आपली कोण ती ( चुटकी वाजवून ).... हा एलिझाबेथ.

**बाजीराव** : तिचा काय संबंध आहे ?

**जयत** : इफ आय मिस्टेक नॉट डॅडी– मी कुठेतरी वाचल्याचं आठवतंय की, ही नाटकं एलिझाबेथनंही लिहिली असण्याची शक्यता आहे.

**बाजोराव** : लायब्ररीत जाऊन हे वाचता आपण ?

**जयंत** : रिअली डॅडी. बाय गॉड वाचलं. मग म्हटलं या वादात फुकट पडा कशाला. तुम्हाला आपला स्वभाव माहीत आहे डॅडी. आपल्याला उगीच वाद वाढवीत बसायला आवडत नाही. आच्छा. ( उठतो )

**बाजीराव** : बसा, चिरंजीव, उडवाउडवी करून मुख्य प्रश्न डावलू नका. तुम्ही या सहा महिन्यांत पुस्तकाला शिवला नाहीत. फक्त टिवल्याबावल्या केल्या. उडाणटप्पूपणा केला.

**जयंत** : डॅडी, धिस इज टू मच हां. मी सिन्सिअरली अभ्यास केला. विचारा मॉमला.

**बाजीराव** : तिला कशाला विचारायचं ? पेपर सांगतोय ना बोंबलून ! म्हणे शेक्सपिअरनं लिहिली का व्हिटोरिआनं लिहिली !

**जयंत** : व्हिक्टोरिआ नाही डॅडी– एलिझायेथ !

**बाजीराव** : कोणी का असेना, तिचा इथे संबंध काय ? प्रश्न नाटकावर होता. नाटककाराच्या नावावर नव्हता. पण तुमच्या एक्स्ट्रा करिक्युलर ॲक्टिव्हिटीज-मधून फुरसत मिळाली पाहिजे ना पुस्तक उघडायला !

**जयंत** : डॅडी, मी खरंच अभ्यास केला होता– पण ऑन प्रिन्सिपल्स तसं लिहिलं.

हा वाद एकदा कायमचा मिटलाच पाहिजे. हा प्रश्न तपशिलाचा नसून तत्त्वाचा आहे डॅडी.

बाजीराव : स्टुपिड! हा वाद होऊच शकत नाही. निदान तुमचा या वादाशी काहीही संबंध नाही.

जयंत : डॅडी, इंग्रजीचे प्रोफेसर असून तुम्ही इतक्या बेपर्वाईनं बोलू शकता? शेक्सपिअरबद्दल? ओहोहो! स्वर्गात त्याला काय वाटत असेल? अहो, ही नाटकं एलिझाबेथनं लिहिली नाहीत हे, वन्स ॲण्ड फॉर ऑल, सिद्ध झाल्या-शिवाय त्याच्या आत्म्याला शांती लाभेल का कधी?

बाजीराव : सिद्ध कशाला करायला पाहिजे? एलिझाबेथ इतकी सगळी नाटकं लिहिणंच शक्य नाही! साधी कॉमन सेन्स आहे. एका बाईला अशी नाटकं लिहिता येतील? तुझ्या आईला विचार! चार ओळी तरी लिहिता येतात का धड? इतक्या वर्षांत मला एक पत्र लिहिलं. काय तर म्हणे, "प्रिय अहो यांस शि. सा. न. वि. वि. आपले पत्र मिळाले. मजकूर समजला. इत्यादी इत्यादी इत्यादी...कळावे लो. अ. विनंती. आपली आज्ञाधारक —सौ. विमल पळपुटे."

विमलाबाई : माझं नाव काढू नका हं मधे उगीच!

जयंत : पण मॉम म्हणजे काही राणी एलिझाबेथ नाही.

बाजीराव : बायका इथून 'तिथून सारख्याच. त्यांनी काय अशी आणि इतकी नाटकं लिहावीत!....इट इज अ मॅन्स जॉब. साधी कॉमन सेन्स आहे.

जयंत : पण डॅडी, मी वाचलं ते नेमकं हेच आहे. राणी एलिझाबेथ ही बाई नव्हतीच!

बाजीराव : काय?

जयंत : काही टीकाकारांचं म्हणणं असं आहे की एलिझाबेथ हा पुरुष होता. आता पाहा. ती बाई होती की बुवा होता याचं संशोधन होऊन हा वाद कायमचा मिटायला नको?

बाजीराव : चिरंजीव, उठा आणि तुम्हाला जायचं तिकडे जा!

जयंत : ओ थँक्स अ लॉट, डॅडी! ( लगबगीने पळ काढू लागतो. )

बाजीराव : एक मिनिट...

जयंत : प्लीज.

बाजीराव : ऐका. तुमचा बाप काही टाटा किंवा बिर्ला नाही; आणि तुमची आई

सुद्धा या देशाची पंतप्रधान नाही. दुर्दैवानं तुम्ही एका मध्यमवर्गीय पांढरपेशा घरात जन्माला आलेले आहात. त्यामुळे तुम्हाला गुंडगिरी करून पोट भरता येणार नाही. हमाली करण्याची ताकद तुमच्यात नाही. व्यापार करण्याची अक्कल नाही. राजकारणाचा धंदा तुम्हाला जमणार नाही. तेव्हा स्वाभिमान जिवंत ठेवून जेमतेम जगायचं असेल, तर वेळच्या वेळी परीक्षा पास होत राहाणं ही एकच शिदोरी तुमच्या उपयोगी पडणार आहे!

**विमलाबाई** : (फोन बंद करीत) का उगीच तडातडा बोलताय हो मघापासून बिचाऱ्याला ?

**बाजीराव** : तुम्ही फोन का बंद केलात ? अजून दिवस संपला नाही !

**विमलाबाई** : पण आमचं बोलणं संपलंय.

**बाजीराव** : मग दुसऱ्या कुणाला तरी फोन करा. नाहीतर गप्प बसा. तेव्हा, चिरंजीव...

**जयंत** : डॅडी, झालं एवढं एरंडेल बस झालं. आजचा कोटा फुल झाला....तुडुंब भरलोय नुसता. टाचणी टोचलीत ना, तर रक्ताच्या ऐवजी एरंडेल बाहेर पडेल नुसतं !

**बाजीराव** : (विमलाबाईंना) ऐका ऐका— बोलले चिरंजीव ! आहाहा ! काय अवलाद आहे ! नवसानं मागितलं आणि मुळावर आलं....कसं काय होणार आहे याचं....

**विमलाबाई** : काय होणार ? तुमचं काय झालं ?

**बाजीराव** : म्हणजे काय ?

**विमलाबाई** : तुमचं जसं झालं तसंच त्याचंही होईल.

**बाजीराव** : म्हणजे, याची तुलना तुम्ही माझ्याशी करताय ?

**विमलाबाई** : अहो, तुमचाच मुलगा आहे ना तो ?

**बाजीराव** : हो ! पण मी काही असे दिवे पाजळले नव्हते कधी. आमच्या वेळी—

**विमलाबाई** : काही बोलू नका. तुमच्या वेळेला काहीही वेगळं नव्हतं. जे तुम्ही आत्ता तुमच्या मुलाला बोलता आहात, तेच त्या वेळी तुमचे वडील तुम्हाला बोलत होते. तोंड फिरवू नका उगीच. तुम्हीच स्वतःच्या तोंडानं सांगितलंय मला. मॅट्रिकच्या परीक्षेला तुम्ही अलजिब्राचा पेपर कोरा दिलात तेव्हा तुमचे वडील....

बाजीराव : तुम्ही ऐकता का माझं....

जयंत : आयला ! मॉम, अलजिब्राचा पेपर कोरा दिला डॅडींनी ? आणि तोही मॅट्रिकच्या परीक्षेला ? गुड हेवन्स ! एट टू ब्रूटे—देन स्टॅंड सीझर ! (छाती फुगवून ताठ उभा राहातो.)

बाजीराव : हे पाहा चिरंजीव—मी पेपर कोरा दिला नव्हता. चांगला एक सबंध पेपर आणि तीन सप्लिमेंटस्...

विमलाबाई : पण त्यात लिहिलंत काय ?

बाजीराव : तुम्ही आता...

जयंत : सांग सांग....मॉम, काय लिहिलं डॅडींनी ?

बाजीराव : श्रू !

विमलाबाई : यांच्या त्या वेळच्या इंग्रजीत अलजिब्रा या विषयावर एक फर्डा निबंध लिहिला. अलजिब्रा हा विषय कसा फालतू आहे...सामान्य माणसाच्या जीवनात कसा निरुपयोगी आहे फक्त साहित्यात गोडी असणाऱ्या यांच्यासारख्या कवि-मनाच्या विद्यार्थ्यांची असल्या गद्य विषयानं कशी अडवणूक होते....वगैरे वगैरे. एक सबंध पेपर आणि तीन सप्लिमेंटस्...

बाजीराव : अहो ऐकलंत का—

जयंत : सालं ग्रेट ! आय ॲम प्राऊड ऑफ यू, डॅड !

विमलाबाई : आणि पहिल्या पानावर ब्रीदवाक्य—यांच्या त्या वेळच्या इंग्रजीत—अलजिब्रा इज नॉट अ झीब्रा, बट अ कोब्रा, टु मी !

जयंत : ओहोहो ! सिंपली वंडरफुल ! डॅड, डॅड ! तुम्हाला कुठे ठेवू आणि कुठे ठेवू नको असं झालंय मला....व्हेअर टु पुट यू; ॲंड व्हेअर नॉट टु पुट यू....

बाजीराव : गेट आऊट !

जयंत : अं ? मला काही म्हणालात ?

बाजीराव : गेट आऊट !

जयंत : ओ—ऑफ कोर्स. अच्छा मॉम—थॅंक्यू—थॅंक्यू—थॅंक्यू—(जातो.)

बाजीराव : हे हे सगळं बोलायलाच पाहिजे होतं का ?

विमलाबाई : खोटं आहे का ते ?

बाजीराव : पण ते अगदी आत्ता याच्या समोर बोलायलाच पाहिजे होतं का ?

विमलाबाई : बोलले. काय बिघडलं त्यात ?

बाजीराव : अहो, बाप म्हणून माझी काही डिग्निटी आहे की नाही या घरात ?

विमलाबाई : तुम्ही चहा घेणार का ?

बाजीराव : हे पाहा....हजार वेळा मी तुम्हाला सांगितलंय. तुमचं हे असलं उथळ वागणं मला मुळीच पसंत नाही. नेहमी तुम्ही माझा नको त्या वेळी पाण-उतारा करता.

विमलाबाई : तुम्ही चहा घेणार की सरबत करू ?

बाजीराव : तुम्हाला माझी काडीचीही पर्वा नाही....किंमत नाही... मी तुमच्या-साठी एवढं जिवाचं रान करतो...

विमलाबाई : तुमच्यासाठी करतो...तुमच्यासाठी करतो.. म्हणून टेंभा मिरवत जाऊ नका उगीच. बायकापोरासाठी झिजणारे काही तुम्ही पहिले नवरदेव नाही आणि शेवटचेही नाही. इतर हजारो करतात तेच तुम्ही करताय....काही उप-कार करीत नाही आमच्यावर ! हो.

बाजीराव : आता तुम्ही गप्प बसता की–

विमलाबाई : ( थंडपणानं ) काय करणार तुम्ही ?

बाजीराव : ओहोहो–

[ वैतागून कोचावरची उशी तिच्यासमोर आदळतो. टी पॉयला लाथ मारतो. ते कोलमडते. त्याच्या कप्प्यातून बाहेर पडलेली मासिकं आणि वर्तमानपत्रं घरभर पसरतात. दमछाट होऊन तिच्यासमोर उभा राहातो. ती शांतपणे हे सारं पाहात असते. ]

विमलाबाई : तुम्हाला काय वाटतं ? असा त्रागा फक्त तुम्हालाच करता येतो ? मला करता येत नाही ?

[ कोचावरची दुसरी उशी त्यांच्यासमोर आदळते. खुर्ची उलथून टाकते. फ्लॉवरपॉट उचलून खाली आदळते. आणि शेवटी कंबरेवर हात ठेवून त्याच्यासमोर उभी राहाते. दोघे क्षणभर एकमेकांकडे पाहात राहातात. ]

बाजीराव : आहाहा—काय बायको आहे—काय पोझ आहे ! झाशीची राणी जशी !

विमलाबाई : आणि तुम्ही तात्या पोटे !

बाजीराव : तात्या पोटे नाही, तात्या टोपे.

विमलाबाई : तुम्ही पोटेच. ते पोट पाहा.

बाजीराव : डोंट हिट बिलो द बेल्ट, आय से. माझ्या पोटाबद्दल बोललेलं मला मुळीच आवडत नाही ! सांगून ठेवतो. नो पर्सनल कॉमेंटस् !

विमलाबाई : तुम्ही आणि मी फिरायला निघालो की कॉलेजची पोरं काय कॉमेंटस् करतात ते ऐका एकदा जयंतकडून !

बाजीराव : काय—काय कॉमेंटस् करतात ?

विमलाबाई : डबाबाटली चालली म्हणतात !

बाजीराव : म्हणजे ?

विमलाबाई : मला बाटली म्हणतात शँपेनची; आणि तुम्हाला घासलेटचा डबा !

बाजीराव : रास्कल्स !

विमलाबाई : चिडू नका उगीच. दिसतं तसं बोलतात बिचारे.

बाजीराव : माहीत आहे—माहीत आहे. रूपाची घमेंड नको इतकी. लग्नाआधीचा माझा फोटो काढून बघ एकदा !

विमलाबाई : हो. तो फोटोच गळ्यात बांधून फिरत जा आता !

बाजीराव : हे पाहा—

विमलाबाई : (शांतपणानं) काय पाहू ? पाहण्यासारखं आहे काही तुमच्यात ?

बाजीराव : तू जा बघू इथून.

विमलाबाई : नाही जाणार !

बाजीराव : नको जाऊस. मीच जातो. (पेपर गोळा करू लागतो.)

विमलाबाई : चहा घेऊन जाणार की सरबत आणू ?

बाजीराव : हेल विथ चहा अँड सरबत !

[ गजाभाऊ एकदम प्रवेश करतो. ]

गजाभाऊ : हलो हलो हलो. (एकदम थबकतो. अस्ताव्यस्त हॉल पाहतो.) व्हॉट इज धिस ? इथेही सृष्टीची उलथापालथ तर झाली नाही ना ? इथेही मुंगीनं मेरू पर्वत तर गिळला नाही ना ? सगळेच असे कमनशिबी कसे ! (नाटकी आविर्भावात उभा राहतो.)

बाजीराव : गजा, प्लीज...

गजाभाऊ : एक बेबंदशाहीचा प्रयोग घरी संपवून इथे आलो. म्हटलं या थेटरात काय चाललंय पाहावं....तर इथेही बेबंदशाहीच ! म्हणजे नाटक तेच, पण नटनटी वेगळी. थोडक्यात तात्पर्य असं की, इन एव्हरी हाऊस देअर आर

चूल्स ऑफ मड !

**बाजीराव** : गजा, फॉर हेवन्स सेक....फक्त मराठीत बोल.

**गजाभाऊ** : ओके ओके ! पण इथलं नाटक कसं होतं ? ट्रॅजेडी, कॉमेडी, ट्रॅजी-कॉमेडी, कॉमी-ट्रॅजेडी, रोमँटिक-कॉमेडी की कोमँटिक-रॉमेडी ?

**विमलाबाई** : फार्स होता फार्स !

**गजाभाऊ** : ओ, आय सी ! तरीच (उलथापालथीकडे पाहात) फार्स असाच पाहिजे. शब्द कमी-ॲक्शन जास्त ! पण आमच्या घरी मात्र ट्रॅजिकल-कॉमिकल-रोमँटिक-फार्सिकल-नवनाट्य झालं !

**विमलाबाई** : म्हणजे काय ?

**गजाभाऊ** : म्हणजे असं की, सगळं नाटक संपवून पडदा पाडून मी घराबाहेर पडलो तरी, हे असं का झालं, कसं झालं, कशासाठी झालं-थोडक्यात-हाऊ, व्हाय, व्हॉट झालं-याचा अर्थ मला मुळीच समजला नाही. त्रागा-वैताग-निःश्वास-उच्छ्वास-आरडाओरड-रडारड...आल्टून पाल्टून सगळं एकएकदा झालं. पण त्याचाही अर्थ मला समजला नाही. म्हणून नवनाट्य. बाकीचे फॉर्म्स तर तुम्हाला माहीतच आहेत. बायको रडली म्हणून ट्रॅजेडी. माझ्या गळ्यात पडून रडली म्हणून रोमँटिक ट्रॅजेडी. नंतर आमचं एक विनोदी पण कडाक्याचं भांडण झालं म्हणून कॉमेडी. आणि शेवटी दोघंही ॲक्शनवर आलो म्हणून फार्स ! रागाच्या भरात तिनं बशी फोडली. मी लगेच कप फोडून टाकला. तिनं माझ्या नाटकाचं स्क्रिप्ट फाडलं. मी तिचं भरतकामाचं पुस्तक टरकावून दिलं. तिनं माझा डावा बुट फेकून दिला. मी मागोमाग तिची चप्पल पाठवली. साले हम भी कुछ कमी नही ! आय ॲम नॉट लेस !

**विमलाबाई** : भाऊजी, खाली बसा. हे काही नाटकाचं थिएटर नाही; आणि तुम्ही विनोदाचे बादशहा म्हणून इथे उभे नाही आहात ! तुम्ही नट आहात हे विसरा आणि सरळ साध्या माणसासारखं काय झालं ते सांगा.

**गजाभाऊ** : व्हायचंय काय ? नेहमीचंच. तुमच्या मिनीचं बाळंतपण आलंय ना जवळ ? बोलताना सहज विषय काढला, तर हिचा रागाचा पारा थर्मामिटर फोडून बाहेर ! झाली सुरुवात. ‘ इतक्यात लग्न झालं नाही तर मिनीला मूल होतंय आणि आमचं लग्न होऊन एक तप लोटलं तरी आम्हाला काही नाही!’ लगेच बोंबाबोंब....रडारड-आता हिला पोर होत नाही त्याला मी काय करू ?

विमलाबाई : हो ना. ते काय कुणाच्या हातचं का आहे?

गजाभाऊ : वहिनी, तुम्हीच सांगा, एवढी एक बाब सोडली तर काय कमी आहे हो हिला? आमचं लग्न झालं तेव्हा साधा शाळामास्तर होतो मी. पुढे नशिबानं हात दिला आणि महाराष्ट्राचा विनोदसम्राट म्हणून नाव झालं. पैसा मिळायला लागला. मिस्टर नोबडी होतो तो मिस्टर समबडी झालो. यात हिला समाधान नको? पण नाही. आहे त्याच्याकडे पाठ, आणि नाही त्याच्याकडे तोंड करून बघायची सवय असते बायकांना!

विमलाबाई : नुसतं बायकांना म्हणू नका, भाऊजी– पुरुषांनासुद्धा असते. ह्यांना विचारा.

बाजीराव : ते राहू द्या हो. गजा, भांडण मिटलं ना शेवटी?

गजाभाऊ : छ्या! इतक्या लवकर मिटणार आहे ते? आठ दिवस घर धुमसत राहाणार नुसतं! तुम्हाला कल्पना नाही–आमची ही म्हणजे....

विमलाबाई : एका हातानं टाळी वाजत नाही भाऊजी!

गजाभाऊ : असं बोलू नका वहिनी. प्रोफेसर, तूच सांग, यात माझी काही चूक आहे का? मुलं होणं माझ्या हातात आहे का? ते काय स्टेशनावरचं वजनाचं मशीन आहे? नाणं घातलं की तिकिट बाहेर आलं! अहो, ते मशीनसुद्धा बिघडतं. मी माझ्याकडून होईल तितकी कोशिश करतोय. डॉक्टर झाले; वैद्य झाले...उपासतापास चालू आहेत. गंडेदोरेसुद्धा झाले. परवाच एका मांत्रिकानं गंडा द्यायचं कबूल केलंय. शंभर रुपयाला. फार पावरफुल आहे म्हणे. एका बाईला पंधरा वर्षं मूल होत नव्हतं. या मांत्रिकानं सकाळी गंडा मंत्रून तिच्या दंडात घातला आणि संध्याकाळी तिला मुलगा झाला म्हणे!

विमलाबाई : झाली तुमची विदूषकी सुरू. हे असलं आगाऊ बोलता म्हणूनच चिडून जाते ती. (आत जाऊ लागते.)

गजाभाऊ : थांबा. यातली गंमत सोडा; अर्थ घ्या. याचा अर्थ असा की मी अजून प्रयत्न सोडलेला नाही. म्हटलंच आहे–ट्राय ॲण्ड ट्राय अगेन, बॉईज. यू वुइल सक्सीड ॲट लास्ट. पण एवढा धीर हिला कुठला! रोज कचकच... तकतक....चिडचिड...वैताग आणलाय नुसता.

विमलाबाई : तुम्हीच थोडं समजुतीनं घेतलंत, हळुवारपणानं तिला समजावलंत, थोडी सहानुभूती दाखवलीत....

राजाभाऊ : किती समजुतीनं घेऊ? किती समजावून सांगू? उदाहरण देऊन समजावलं....की बाई, माझा एक फलाणा मित्र आहे. आठ वर्षं त्यालाही मूल झालं नाही. पण नवव्या वर्षी एकदम जुळं झालं. त्यानंतर लागोपाठ दोन वर्षं जुळीच झाली. तीन वर्षांत मागचीपुढची सगळी भर निघाली! शेवटी मुलं होऊ नयेत म्हणून ऑपरेशन करून घ्यावं लागलं त्याला. आपलंही तसंच होईल. आपण काय कुणाचं घोडं मारलंय म्हणून देव आपलं वाईट करील? पण नाही. डोक्यात प्रकाश म्हणून नाही. आपण तर हैराण झालो. असं वाटतं—अंगाला राख फासावी आणि सरळ हिमालयात चालतं व्हावं!

बाजीराव ! तुझं नक्की झालं म्हणजे मला सांग– मीही येईन तुझ्याबरोबर.

विमलाबाई : आता ताबडतोब निघणार का? शेगडीत राख आहे पुष्कळ. आणून देते पाहिजे तर! की आधी चहा घेता?

गजाभाऊ : चहाच आणा तूर्त. (ती हसून आत जाते) हे गव्हर्मेंट सुद्धा होपलेस आहे. गुड फॉर नथिंग.

बाजीराव : अरे, तुला मूल होत नाही त्याला काय गव्हर्मेंटचा दोष आहे?

गजाभाऊ : तीनपेक्षा जास्त मुलं होऊ देऊ नका म्हणून बर्थकंट्रोलचे कैक उपाय आवर्जून आवर्जून सांगतं; पण ज्यांच्या घरी एकाचाही पत्ता नाही त्यांना कमीत कमी तीन पोरं कशी व्हावीत यावर मात्र उपाय सांगत नाही! पण गव्हर्मेंटला तरी कशाला दोष द्या. आपलीच लाइन चुकली. नट न होता शाळामास्तरच राहिलो असतो, किंवा कुठे कारकुनी केली असती, तर पोरांची पलटण उभी झाली असती!

बाजीराव : डोंट टॉक रॉट.

गजाभाऊ : खोटं नाही. पोरं होण्याच्या बाबतीत मास्तर आणि कारकून यांचा हात कुणीही धरणार नाही जगात!

बाजीराव : मग सोड नाटकधंदा आणि हो पुन्हा मास्तर! तुला कुणी बंदी केलीय?

गजाभाऊ : इट इज टू लेट, ओल्ड बॉय! एकदा आयुष्याचे रूळ एका दिशेनं रोवले गेले की गाडी त्याच रूळावरून गेली पाहिजे. त्याला दुसरा पर्याय नाही. कारण, या रूळांना सांधे बदलायची सोय क्वचितच असते– म्हणजे नसतेच– आणि असलीच तरी सांधा बदलणं आपल्या हातात क्वचितच असतं!

[ विमलाबाई चहाचा ट्रे घेऊन येतात ]

सवाई गणपतराव जोशी व्हावं ही एकेकाळची तुझी महत्त्वाकांक्षा. पण शेवटी, कॉलेजातला का होईना, मास्तर झालास. मी मूळचा मास्तर. दिपुटी व्हावं ही आमची ॲंबिशन. पण नशिबानं उचललं आणि नाटकाच्या लायनीवर आणून घातलं ! आपला तो गोगट्या— केवढा स्कॉलर. कलेक्टर व्हायची स्वप्नं पाहात होता. पण झाला तिकिट कलेक्टर ! एकूण काय ? तो वरचा शंटर पाठवील त्याच रूळावरून आपण जायचं !

**विमलाबाई** : चहा घ्या.

**गजाभाऊ** : हो. चहा घ्या म्हटलं की घ्यायचा...हास म्हटलं की हसायचं.... रड म्हटलं की रडायचं....थोडक्यात म्हणजे तो देईल ती भूमिका आपण घ्यायची. बस. आपल्या हातात काही नाही. आहे त्यात समाधान नाही. नाही त्याबद्दलची खंत सुटत नाही ! म्हणून सुख आपल्याला सापडत नाही. हॅपीनेस इज हिडन बिहाइंड द कॉर्नर ऑफ अ राऊंड हाऊस....सुख हे गोलाकार घराच्या कोपऱ्याआड दडलेलं असतं, म्हणून ते माणसाला सापडत नाही ! कारण, गोलाकार घराला कोपराच नसतो !

**विमलाबाई** : देवळात जाऊन आलेले दिसताय भाऊजी ?

**बाजीराव** : देवळात कधीपासून जायला लागला हा ?

**गजाभाऊ** : देऊळ म्हणजे देवाचं देऊळ नव्हे. देवळात जाऊन येणं ही शिष्ट-सांप्रदायात वापरायची भाषा. कंट्री भाषेत याचा अर्थ दारू पिऊन येणं. वहिनी, मी नशापाणी न करता हे बोलतोय म्हणूनच इतकं चांगलं बोलतोय. कारण, वेदना जितकी सुंदर बोलते तितकी दारू नाही बोलत !

**विमलाबाई** : हे कुठल्या नाटकातलं वाक्य ?

**गजाभाऊ** : वाक्य माझंच...पण मूळ कल्पना— ‘ तुझे आहे तुजपाशी ’— यूवर्स इज उइथ यू —मधली.

**विमलाबाई** : मघापासून तुम्ही जो वैताग करता आहात ना भाऊजी, त्याचं हेच उत्तर आहे. तुमचं सुख तुमच्यापाशीच आहे; पण ते सापडत नाही तुमचं तुम्हाला. तुम्हाला म्हणजे तुम्हाला एकट्यालाच नाही. आपल्या सगळ्यांनाच.

**बाजीराव** : जसं आहे तसं दिसतं. ज्याला सुख म्हणावं असं काय आहे हो या घरात ? तुम्ही या अशा; ती कार्टी तशी; चिरंजीवांच्याबद्दल बोलायलाच नको.

आणि अशा माणसांच्यासाठी आयुष्याचं पोतेरं करून घेतलं आम्ही. सुख–फार सुख ! हः ! कसली स्वप्नं होती माझी. नट व्हावं– परमेश्वरानं कला दिली तिचं चीज करावं– अलम महाराष्ट्रात नाव कमवावं– पैसा मिळवावा...

**विमलाबाई** : मग ? तुमचे कुणी हातपाय बांधून ठेवले होते ? का नाही केलंत हे सगळं ?

**बाजीराव** : गळ्यात तुमची धोंड बांधून घेतली ना ! मुकाट्यानं नोकरी धरावी लागली.

**विमलाबाई** : का बांधून घेतलीत धोंड ?

**बाजीराव** : तुमच्या प्रेमात पडण्याचा गाढवपणा केला– तो निस्तरायला नको होता ?

**विमलाबाई** : पण तो गाढवपणा तरी केलातच का ?

**बाजीराव** : झक मारली !

**विमलाबाई** : आणि हे कळायला तुम्हाला इतकी वर्षं लागली ? त्या वेळी माझ्या मागे मागे गोंडा घोळीत फिरताना ही समज कुठे गेली होती ?

**बाजीराव** : गैरसमजात गेली होती. त्या गोंडा घोळण्यातच सुख वाटलं मला.

**विमलाबाई** : मग आता कुठे गेलं ते सुख ?

**बाजीराव** : अर्धं गेलं लग्न झाल्यावर; आणि उरलेलं गेलं पोरं झाल्यावर.

**विमलाबाई** : हे शहाणपण वेळीं सुचलं नाही तुम्हाला ! का होऊ दिलीत मुलं ?

**बाजीराव** : झक मारली !

**विमलाबाई** : एवढ्यातल्या एवढ्यात दोनदा झक मारलीत तुम्ही. आता आणखी काही वेळ असंच बोलत राहिलात ना, तर आणखी एक मोठी झक मारल्याचं लक्षात येईल तुमच्या !

**बाजीराव** : कोणती ?

**विमलाबाई** : आपण जन्माला आलो हीच एक झक मारली !

**बाजीराव** : ती झक मी नाही मारली. आमच्या तीर्थरूपांनी मारली.

**गजाभाऊ** : बापरे – हा वैताग भलताच डीप रूटेड आहे ! तुला मुलं झाली म्हणून तुला वैताग. तुझ्या वडिलांना तू झालास म्हणून त्यांना वैताग. मी झालो म्हणून माझ्या वडिलांना वैताग. मला मूलच होत नाही म्हणून मला वैताग. तू नट झाला नाहीस म्हणून तुला वैताग. मी नट होऊनही मला वैतागच !

इकडे तिकडे चोहीकडे ! वैतागच वैताग गडे....

[ विमल उठून आत जाऊ लागते. ]

कुठे निघालात वहिनी ?

**विमलाबाई** : तुमच्या या वैतागाचा वैताग आलाय मला. मी चालले मिनीकडे.

**बाजीराव** : आणि येणार केव्हा ?

**विमलाबाई** : हा तुमचा वैतागाचा मूड गेल्यावर. उद्या संध्याकाळी; नाही तर परवा सकाळी.

**बाजीराव** : अहो पण– ( ती फणकाऱ्यानं निघून जाते ) पाहिलंस ?

**गजाभाऊ** : प्राध्यापक, संतापून काही उपयोग आहे का ? उगीच ब्लडप्रेशर वाढेल. त्रास होईल आपले रूळ जसे आहेत तसे ठेवले गेले आहेत. आता त्याच रूळांवरून आपण जाणार. त्याला काही इलाज आहे का ? आपलं तकदीरच असं म्हणून गप्प बसावं, दुसरं काय ! ठेविले अनंते तैसेचि राहावे. लिव्ह ॲज अनंतराव कीप्स यू !

**बाजीराव** : ओ गॉड ! मग हे सगळं असंच चालू राहणार ?

**गजाभाऊ** : हे सगळं आहे तसंच चालू राहणार.... यात बदल होणं शक्य नाही– निदान तसाच काही चमत्कार होऊन आपल्यात आमूलाग्र बदल होईपर्यंत...

[ दारावरची घंटा याच वेळी खणाणते. ] कोण आहे ?

[ दरवाज्याकडे जातो. बाजीराव पेपर गोळा करून ठेवू लागतो. गजाभाऊ एका इसमाला घेऊन येतो. थ्री पीस सूट, छड्याचे घड्याळ, उंची फेल्ट, डोळ्यांवर गॉगल.... एकंदरीत पाहिल्याबरोबर गूढ वाटावा असा इसम. ]

**गजाभाऊ** : या या. ( बाजीरावाकडे हात दाखवीत ) प्रोफेसर बाजीराव पळपुटे.

**इसम** : मी ओळखतो यांना. हलो प्रोफेसर. प्लीज्ड टु मीट यू.

**बाजीराव** : माफ करा– पण मी आपल्याला ओळखलं नाही.

**इसम** : आश्चर्य आहे.... आश्चर्य आहे. सरप्राइझिंग.... अस्टाउंडिंग !

**बाजीराव** : आपली यापूर्वी कधी ओळख झाली होती का ?

**इसम** : ओळख ? नुसती ओळख नाही, घनिष्ठ मैत्री आहे आपली.

**बाजीराव** : आपण मला माफ केलं पाहिजे.... पण अजूनही माझ्या काही लक्षात येत नाही. ही घनिष्ठ मैत्री कधी झाली आपली ?

**इसम** : कित्येक वर्षांपूर्वी.

बाजीराव : ओ, आय सी! म्हणजे मध्यंतरीच्या काळात पुन्हा आपण भेटलोच नाही. म्हणूनच माझ्या काही...

इसम : छे छे– जवळ जवळ रोजच भेटत असू आपण. फक्त गेल्या तीन महि-न्यांतच मी तुम्हाला भेटू शकलो नाही. तेवढ्यात विसरलात ? आश्चर्य आहे ! विसराळूपणाबद्दल प्रोफेसर लोक प्रसिद्ध आहेत. पण धिस इज टू मच.

बाजीराव : नाही– मी जरा गोंधळलोय–

गजाभाऊ : माफ करा– पण आपला पत्ता वगैरे चुकला नाही ना ?

इसम : पार्डन ?

गजाभाऊ : नाही–तशीही शक्यता आहे म्हणून विचारलं.... म्हणजे पलीकडच्या कॉलनीतही एक पळपुटे राहातात. कदाचित त्यांची आपली ओळख असेल— पण चुकून....

इसम : पलीकडच्या कॉलनीत पळपुटे राहातात हे मला माहीत आहे. पण त्यांची माझी ओळख नाही. मी ओळखतो यांना. यांनाच नाही, तर यांच्या बायकोलासुद्धा.

गजाभाऊ : नाही–त्या पळपुट्यांनाही बायको आहे.

इसम : तिचं नाव विमल आहे ?

गजाभाऊ : नाही– म्हणजे मला माहीत नाही.

इसम : तिच्या मुलीचं नाव मीना आहे ? त्या मुलीनं शिखाशी लग्न केलंय ?

गजाभाऊ : आता बरोबर. तुम्ही यांनाच ओळखता.

इसम : मी तुम्हालासुद्धा ओळखतो.

गजाभाऊ : मला ?

इसम : तुम्हालाच नाही, तर तुमच्या बायकोलासुद्धा ओळखतो.

गजाभाऊ : माझ्यासुद्धा बायकोला ओळखता ? म्हणजे सगळ्यांशीच तुमची अगदी सहकुटुंब ओळख दिसते.

इसम : सर्टनली. तुमचं नाव गजानन भिंगारे. करेक्ट ?

गजाभाऊ : एक्सक्यूज मी हं. ( जाऊ लागतो )

इसम : कुठे निघालात ?

गजाभाऊ : थोडं पाणी पिऊन येतो.

इसम : बसा खाली.

गजाभाऊ : हा.

इसम : पाणी प्यायची काही एक गरज नाही. (फेल्ट आणि गॉगल काढतो) आता ओळखलंत ?

गजाभाऊ : नाही.

इसम : प्रोफेसर, तुम्ही ?

बाजीराव : नाही.

इसम : गुड ! आता माझ्या चेहऱ्याकडे नीट निरखून पाहा. तीन महिन्यांत इतका बदल झाला माझ्यात ?

बाजीराव : तीन महिन्यांत ?

इसम : वहिनी कुठे आहेत ?

बाजीराव : आमच्या मुलीकडे राहायला गेली आहे एक दोन दिवसांसाठी.

इसम : गुड ! (काही विचारात गढून हात चोळतो)

बाजीराव : (एकदम चमकतो– निरखून पाहतो– मग) ओ गॉड ! पण ते कसं शक्य आहे ?... शक्यच नाही.... इम्पॉसिबल !

इसम : हां हां हां.... ओळख पटायला लागली... हळूहळू ट्यूब पेटायला लागली डोक्यात.

बाजीराव : नाही– पण ते कसं शक्य आहे !

इसम : शक्य आहे. माझ्या बाबतीत सगळं शक्य आहे. अशक्य हा शब्द खोडलेली डिक्शनरी वापरणारे या जगात फक्त तीनच इसम आहेत. एक नेपोलियन; दुसरा बाळ कोल्हटकरांचा अनंत उत्पात; आणि तिसरा मी. काय गजा, नाटकाचा रेफरन्स बरोबर दिला ना !

गजाभाऊ : अं ! हो...

इसम : मग ? काही पडतोय का डोक्यात प्रकाश ?

गजाभाऊ : नाही. आमचं फ्यूज उडालंय !

इसम : हात् लेका—उगीच नाही मॅट्रिकला तीन वेळा आपटी खाल्लीस !

गजाभाऊ : अं ?

इसम : त्यानंतर इंटरला एकदा आणि बी. ए. ला दोनदा !

गजाभाऊ : तुम्हाला कशी कळली ही खानेसुमारी ?

इसम : अरे, प्रत्येक वेळी आपण जोडीनंच नापास नाही झालो ? या प्रोफेसरानं

मात्र आपल्याला फक्त मॅट्रिकला साथ दिली. अलजिब्र्याच्या पेपरात निबंध लिहिला होता यानं. आठवतंय ना ? ( ते दोघे एकमेकांकडे आ वासून पाहात राहतात. ) अरे, आपण थ्री मस्कीटिअर्स म्हणून प्रसिद्ध नव्हतो का सगळ्या कॉलेजात ? गजा, बाजा आणि राजा....

बाजीराव : हे पहा मिस्टर– कोण असाल ते. प्रॅक्टिकल जोक्स वगैरे मला आवडत नाहीत. थ्री मस्कीटिअर्स म्हणता त्यांपैकी आमचा तिसरा मित्र राजा सरपोतदार म्हणून होता. पण दुर्दैवानं तीन महिन्यांपूर्वीच तो वारला. मघाशीच मल स्ट्राइक झालं. तुम्ही थोडे त्याच्यासारखे दिसता. पण या सारखेपणाचा फायदा घेऊन तुम्ही काही गडबडगुंडा करण्याच्या विचारात असलात तर ते आम्ही होऊ देणार नाही ! मी आत्ता पोलिसांना फोन करतो.

इसम : फोन केलात तरी हरकत नाही. पण एकदा पोलीस मधे आले की सगळा पचका होईल. आणि माझ्या दृष्टीने ते सोईचं नाही. आधी मी काय म्हणतोय ते नीट ऐकून घ्या. हा तुमचा राजा सरपोतदार मेला याबद्दल खात्री आहे तुमची ?

गजाभाऊ : अर्थात ! लक्षाधीश माणूस होता तो. आणि त्यात साधं मरण आलं नाही त्याला. खंडाळ्याच्या टायगर स्लिप पॉइंटवरून उडी घेऊन आत्महत्या केली त्यानं. सगळ्या वर्तमानपत्रांत हेडलायनीत आली होती बातमी.

इसम : त्याचं प्रेत सापडलं ?

गजाभाऊ : अर्थात !

इसम : तुम्ही पाहिलंत प्रत्यक्ष ?

गजाभाऊ : कसं पाहाणार ? खंडाळ्यालाच जाळला त्याला.

इसम : पोलिसांनी रीतसर चौकशी करूनच जाळला असेल ?

बाजीराव : ओ यस्...मी स्वतः रिपोर्ट पाहिला.

इसम : प्रेत ओळखलं कुणी ?

गजाभाऊ : त्याच्या बायकोनं आणि पार्टनरनं. दोघंही बातमी कळल्याबरोबर गेली होती खंडाळ्याला.

इसम : तुम्ही गेला नाहीत ?

गजाभाऊ : नाही. जाण्याचं धाडसच झालं नाही आम्हाला...

इसम : पण बायकोनं आणि पार्टनरनं प्रेत ओळखलं हे नक्की का ?

**बाजीराव** : ओळखलंच असलं पाहिजे.

**इसम** : इतक्या उंचावरून पडल्यानंतरही प्रेत ओळखण्याइतक्या अवस्थेत होतं ?

**बाजीराव** : असलं पाहिजे. नाहीतर ती दोघं गप्प बसली नसती.

**इसम** : बरं...ही आत्महत्याच होती असं कशावरून म्हणता तुम्ही ? अपघात किंवा खुनाचीही शक्यता काही कमी नाही.

**गजाभाऊ** : प्रेताच्या खिशात पत्र सापडलं. राजाच्या सहीचं. आत्महत्या करतोय म्हणून स्पष्ट लिहिलं होतं त्यात.

**इसम** : आय सी...( विचारात गर्क )

**बाजीराव** : गजा, हे सारे प्रश्न हे श्रीयुत आपल्याला का विचारताहेत ? तुला काही समजलं ?

**गजाभाऊ** : नाही—काही समजलं नाही.

**बाजीराव** : मग मलाही समजलेलं नाही.

**गजाभाऊ** : काय हो, तुम्ही काय डिटेक्टिव्ह वगैरे आहात काय ? म्हणजे धनंजय, छोटू अँड को पैकी कुणी ? की जेम्स बाँड आहात ? फ्रॉम इंडिया वुइथ लव्ह वगैरे ?

**इसम** : ( विचारतंद्रीतून जागा होत ) गुड–गूड–गूड ! म्हणजे राजा सरपोतदार आत्महत्या करून मेला ही गोष्ट तुम्ही लोकांनी गृहीतच धरली आहे तर !

**बाजीराव** : गृहीत ? अहो मेलाच आहे ना तो !

**इसम** : पण समजा—तो मेलाच नाही असं मी तुम्हाला सांगितलं तर ?

**गजाभाऊ** : काय ?

**इसम** : राजा सरपोतदार या क्षणाला जिवंत आहे !

**बाजीराव** : अहो, पण त्याचं प्रेत सापडलं ना ?

**इसम** : तरी देखील राजा सरपोतदार जिवंत आहे ! !

**गजाभाऊ** : काहीतरी काय बोलताय ? तीन महिन्यांपूर्वीच त्याचं प्रेतसुद्धा जाळलं-तो मेला–ठार झाला—राख झाली त्याची....

**इसम** : तो मेला हे तुम्हाला जास्त माहीत की त्याला ?

**गजाभाऊ** : अर्थात् ते त्यालाच जास्त माहीत असणार—पण—

**इसम** : तो स्वतः तुम्हाला सांगतोय की तो जिवंत आहे.

**बाजीराव** : यांचं डोकंबिकं फिरलंय काय ?

इसम : वहिनी बाहेर गेल्या म्हणून मघा सांगितलंय तुम्ही. पण जयंत कुठंय ?

बाजीराव : लायब्ररीत गेलाय....

इसम : मग मित्रांनो, जगातलं दहावं आश्चर्य ऐकायला तयार व्हा. तुमचा लंगोटीयार, थ्री मस्कीटिअर्सपैकी मस्कीटिअर द थर्ड–राजा सरपोतदार या क्षणाला जिवंत आहे. इतकंच नाही तर साक्षात तुमच्यासमोर उभा आहे!

गजाभाऊ : बाजा, आ वासून पाहातोस काय ? पोलिसांना फोन कर—

बाजीराव : हो....

इसम : बाजा, फोनला हात लावलास तर मुडदा पाडीन! लक्षात ठेव.

बाजीराव : गजा, मोठ्यानं किंकाळी फोड—चार लोक तरी जमा होतील.

गजाभाऊ : हो. ( किंकाळी फोडण्यासाठी तोंड उघडतो. )

इसम : गजा, घशातून नुसता आवाज तर काढ, बुटासकट पाय घशात घालीन! बूट आत ठेवीन आणि पाय बाहेर काढून घेईन.

बाजीराव : ( एकदम चमकून ) गजा....

गजाभाऊ : ( एक चिरका लावाज चढतो—' ओ 'च्या आसपास ) ओ.

बाजीराव : ही स्टाइल राजाचीच दिसते. बूट आत ठेवून पाय बाहेर काढण्याचा पेटंट त्याचाच.

इसम : करेक्ट! हे कनेक्शन बरोबर जमलं. मेंदूला असाच थोडा ताण दिलात तर बाकी कनेक्शन्सही जमतील आणि स्वच्छ प्रकाश पडेल. अरे, माझ्या चेहऱ्याकडे निरखून पाहा—नाक, डोळे, कान, केस, माझी उंची-रुंदी, माझा आवाज. तीन महिन्यांत मी बदललो हे निश्चित. पण इतका बदललो ? पाहा, नीट पाहा माझ्याकडे.

गजाभाऊ : तसं साम्य पुष्कळच आहे.

बाजीराव : हो– नाही म्हटलं तरी बरंच आहे.

इसम : बरंच काय, ऐंशी टक्के आहे. बदल फक्त वीस टक्क्यांचा आहे. पण तो मला पुरेसा आहे.

बाजीराव : काय हो, तुम्ही राजा सरपोतदारच आहात यावर आम्ही विश्वास ठेवावा असं म्हणायचं तुम्हाला ?

इसम : ठेवावा काय, ठेवलाच पाहिजे! गधड्यांनो, तुमच्या कवटीला सहा इंच कॉंक्रीटचा थर आहे, मला माहीत आहे; पण त्या कॉंक्रीटला थोडा तडा जाऊ

द्या आणि मी काय म्हणतो ते डोक्यात घ्या. मी—मीच सजा सरपोतदार!

**बाजीराव :** म्हणजे तू आत्महत्या केलीच नाहीस?

**इसम :** केली ना!

**बाजीराव :** केलीस?

**इसम :** ऑफ कोर्स केली.

**गजाभाऊ :** याचा अर्थ ते प्रेत....

**इसम :** माझंच.

**गजाभाऊ :** ओ–( डोक्याला हात चोळीत खाली बसतो. हवा गेल्यासारखा )

**इसम :** एवढं कसं कळत नाही? मी आत्महत्या केल्यावर प्रेत काय दुसऱ्याचं सापडणार आहे?

**बाजीराव :** ( हवा गेल्याप्रमाणे बसत ) घोळ आहे– घोळ आहे!

**गजाभाऊ :** नुसता घोळ नाही. प्रचंड घोळ आहे!

**इसम :** ( गजाच्या अंगावर जात ) अरे घोळ कसला आलाय यात?

**गजाभाऊ :** ( एकदम उठून बाजूला जात) दूर दूर–दुरून बोल. प्रोफेसर, गळ्यात जानवं आहे का? ब्रह्मगाठ तरी बाहेर काढ.

**इसम :** ( कपाळावर हात मारून घेत– ) आहे! स्टुपिड! फूल्स्! ( एकदम चिडून ) गजा, माझं ऐकून घे. मी आता डोकं फोडीन दोघांचंही....

**बाजीराव :** ( ब्रह्मगाठ समोर धरून ) त्र–त्रस्त समंधा श–शांत हो!

**गजाभाऊ :** भीमरूपी महारुद्रा वज्रहनुमान मारुती!

[ दोघांची ही त्रेधातिरपीट पाहून तो इसम एकदम खो खो करून हसायला लागतो. दोघेही चमकून त्याच्याकडे पाहात राहतात. ]

**इसम :** ( हसू अनावर ) व्हॉट अ जोक-व्हॉट अ जोक....

**बाजीराव :** म्हणजे हा आतापर्यंत चाललेला सगळा जोक होता?

**इसम :** अ व्हेरी गुड प्रॅक्टिकल जोक....

[ हसत राहतो. त्याचे हसणे पाहून हे दोघेही रिलॅक्स होतात– हसायला लागतात. ]

**गजाभाऊ :** म्हणजे हा जोक–हां हां. ( हसतो–टाळी देतो )

**इसम :** प्रॅक्टिकल जोक. ( हसत प्रोफेसरला )

**बाजीराव :** प्रॅक्टिकल जोक–(हसत टाळी देतो) म्हणजे मला तसा फारसा आव-

डला नसला तरी मजा आला—व्हॉट अ प्रॅक्टिकल जोक....म्हणजे तुम्ही राजा सरपोतदार नाही....तो नुसता प्रॅक्टिकल जोक ?

**इसम** : नाही नाही. तसं नाही...मी राजा सरपोतदारच ! (दोघेही एकदम हसायचं थांबतात) पण मी राजा सरपोतदार असलो तरी राजा सरपोतदार नाही !

**बाजीराव** : हा पुन्हा घोळ....

**इसम** : आणि मी राजा सरपोतदार नसलो तरी देखील राजा सरपोतदार तो मीच ! मित्रांनो, झाला इतका जोक बस झाला. लेट अस बी सीरिअस– विश्वास ठेवा– मी अगदी सत्यवचनी रामाचा नवा अवतार आहे असं समजून विश्वास ठेवा– मी राजा सरपोतदारच ! द थर्ड मस्कीटिअर– तुमचा फ्रेंड, फिलॉसॉफर आणि गाइड ! बावळटासारखे माझ्याकडे पाहू नका. मी भूत नाही; पिशाच्च नाही; कुणी तोतया नाही. मी आत्महत्या केली नाही. मेलो नाही....तुमच्या-समोर उभा आहे इन फ्लेश ॲण्ड ब्लड !

**गजाभाऊ** : आणि ते प्रेत सापडलं ते ?

**इसम** : होतं असंच कुणातरी बेवारस माणसाचं.

**गजाभाऊ** : पण ते तुझं होतं म्हणून जाहीर झालंय.

**इसम** : ते मी मुद्दाम घडवून आणलं. सापडलेलं प्रेत अंगापिंडानं आणि रंगानं माझ्यासारखंच होतं. चेहरा ओळखू न येण्याइतपत बदलण्याची काळजी घेण्यात आली होती. आणि इतक्या उंचावरून खाली आदळल्यानंतर झालेली चेहेऱ्या-तली ठेचाठेच गृहीत धरली पाहणारांनी.

**बाजीराव** : पण या सगळ्याची काही आवश्यकता होती का ?

**इसम** : अर्थात ! मी आत्महत्या केली आणि मेलो असं जगानं गृहीत धरावं अशी इच्छा होती माझी.

**बाजीराव** : पण का ?

**इसम** : पुनर्जन्म घेण्यासाठी.

**बाजीराव** : काय ?

**इसम** : पुनर्जन्म....रिबर्थ–रिबर्थ–रिइनकरनेशन ! नवा जन्म–नवा देह–नवं नाव-नवं गाव ! नवी विटी, नवा दांडू, नवा डाव !!

**गजाभाऊ** : प्रोफेसर, तुला काही..

बाजीराव : विचारू नकोस. मला काहीही समजलेलं नाही!

इसम : अरे, मी तसा भीतभीतच तुमच्यासमोर आलो. मला वाटलं ओळखता की काय? पण तुम्ही दोघांनीही ओळखलं नाही. रिलीफ वाटला. म्हणजे एकंदरीत माझा कायापालट यशस्वी झाला!

बाजीराव : कायापालट?

इसम : सांगा पाहू. मीच तो पूर्वाश्रमीचा राजा सरपोतदार हे सहजासहजी कुणाला ओळखता येईल का? शक्यच नाही! अरे तुम्ही ओळखलं नाहीत तर....

बाजीराव : नाही– मला थोडा तसा संशय आला. पण तू आत्महत्या करून मेलास ही कल्पना डोक्यात इतकी घट्ट बसली होती की—

इसम : दॅटस् इट–दॅट्स इट! हाच सायकॉलॉजिकल इफेक्ट, बरोबर आहे. एकदा तो मेला ही गोष्ट गृहीत धरली गेली की तो म्हणून माझ्याकडे कुणी पाहणार नाही.... आणि एकदा हा म्हणजे तो, या दृष्टीनं माझ्याकडे कुणी पाहिलं नाही म्हणजे माझ्या शरीरात झालेला वीस टक्के बदलही माझा कायापालट यशस्वी व्हायला पुरेसा आहे. वंडरफुल....वंडरफुल.... सपर्ब!

बाजीराव : पण प्रकार काय आहे सगळा?

इसम : प्रकार वगैरे काही नाही. मित्रांनो, मला नवं जीवन मिळालं.. नवा ब्रेक मिळाला...आयुष्य बदलण्याची संधी मिळाली.

गजाभाऊ : म्हणजे काय?

इसम : सांगतो. अरे खुळ्यांनो, मानवी जीवनात एक चमत्कार घडतोय... आहात कुठे? माणसाचं स्वप्न साकार व्हायची वेळ जवळ आलेली आहे. तो उज्ज्वल भविष्यकाळ मला इथून दिसतो आहे.

गजाभाऊ : कुठंय?

इसम : मधे बोलू नकोस माणूस दुःखी का आहे? कारण, जे जीवन तो जगतोय् त्यात तो सुखी नाही. आणि ज्यानं सुख मिळेल असं त्याला वाटतं ते जीवन त्याला जगता येत नाही. करेक्ट, प्रोफेसर?

बाजीराव : करेक्ट!

इसम : पट्टेवाल्याला वाटतं मामलेदार व्हावं; मामलेदाराला वाटतं कलेक्टर व्हावं; कलेक्टरला वाटतं मिनिस्टर व्हावं; मिनिस्टरला वाटतं चीफ मिनिस्टर व्हावं; आणि चीफ मिनिस्टरला वाटतं आपण पट्टेवाला झालो असतो तर किती बरं

झालं असतं! म्हणजे, अशा दुष्ट वर्तुळात माणूस सापडलेला आहे! जो तो ज्याच्या त्याच्या जागेला वैतागलेला असतो!

**बाजीराव** : ॲग्रीड!

**इसम** : पटलं ना? दॅट्स् इट. पटायलाच पाहिजे. पण नुसतं पटून उपयोग काय? हे कोडं सुटत नाही—या दुष्ट वर्तुळाची कोंडी फुटत नाही हीच आपली ट्रॅजडी आहे. वाऱ्यावर बी उधळलं जावं आणि जमिनीवर पडेल तिथे रुजावं, वाढावं आणि मरावं, तशी आपली अवस्था आहे. परिस्थितीच्या वाऱ्यावर आपण उधळतो – ती नेईल त्या दिशेला जातो; पाडील तिथे पडतो; रुजतो; वाढतो. मग तीच जागा आपल्या सवयीची होते. आपली दुसरी कुठली दिशा होती, दुसरं कुठलं क्षेत्र होतं याचाही हळूहळू विसर पडतो. मिळाली तीच जागा आपली. सुख मिळो न मिळो, तिथेच आपण जगायचं आणि मरायचं, हीच आपल्या आयुष्याची मुर्दाड इतिकर्तव्यता होऊन बसते! माणूस स्थितप्रज्ञ होतो!

**गजाभाऊ** : म्हणजेच कोडगा होतो!

**इसम** : अर्थ तोच. मी सभ्य शब्दात सांगितलं. तू ग्राम्य शब्द वापरलास. पण अर्थ दोन्हीचा एकच. अनर्थही एकच. आणि सगळ्यांत वाईट हे आहे की हा अनर्थ टाळणं आपल्या हातात नसतं. म्हणजे टाळणं शक्यच नसतं असं नसतं; पण असतंच असंही नसतं.

**गजाभाऊ** : म्हणजे काय?

**इसम** : म्हणजे हा अनर्थ टाळण्याची संधी आपल्याला मिळतच नाही असं नाही. पुष्कळ संध्या मिळतात. पण त्या घेण्याचे गट्स् आपल्यामधे नसतात. आणि गट्स् असले तरी बायका–पोरं–संसार–त्यांच्यासाठी आपणच निर्माण केलेलं स्थैर्य– त्या स्थैर्यातून हळूहळू अंगात शिरलेला आळस– आणि त्या आळसापोटी उपजलेली निष्क्रियता हे मार्गातले दगडधोंडे इतके अक्राळविक्राळ वाटायला लागतात आपल्याला की असतील नसतील ते गट्स् जागच्याजागी जिरून जातात आणि आपण मुकाट्यानं खाली मान घालून जैसे थे राहतो. पण समजा, एखाद्यानं अलगद हवेत उचलून आपल्याला या दगडधोंड्यांच्या पलीकडे नेऊन ठेवलं....नको असलेलं अलगद तुटलं आणि हवं त्यापाशी आपण येऊन पोचलो—वैताग संपला आणि नवं हवं ते जीवन आपल्याला मिळालं तर?

काय ! कल्पना कशी काय वाटली ?

गजाभाऊ : कल्पना चांगली आहे. पण एकदम हवेतला बुडबुडा ! वाऱ्यात मिसळलेले पाणी ! वॉटर मिक्स्ड विइथ एअर !

इसम : व्हॉट डू यू मीन ?

गजाभाऊ : क्रेननं इकडून तिकडे अलगद उचलून ठेवायला माणसं म्हणजे काय निर्जीव मालाचे गठ्ठे वाटले तुला ? नॉन्सेन्स !

इसम : नॉन्सेन्स नाही. ग्रेट सेन्स आहे यात !

गजाभाऊ : कुठला कपाळाचा सेन्स ! असं शक्य तरी आहे ?

इसम : शक्य तरी आहे काय–शक्य झालंय ! मी नाही बदललो ? तुम्हाला सुद्धा ओळखू येऊ नये इतका बदललो. पूर्वीचं नाव गेलं....गाव गेलं.. सर्व दोरखंड तुटले. हवं ते करायला...हवं तसं जगायला मोकळा झालो !

बाजीराव : ते सगळं खरं– पण राजा....

इसम : झकास. राजा म्हणून हाक मारलीस....शेवटी ओळख पटल्याची कबुली दिलीस. आनंद वाटला. पण ही हाक शेवटची. यापुढे मी राजा सरपोतदार नाही. आता माझं नाव रघुनाथ सबनीस ! वाटल्यास तुमच्या सोईला येईल तसा या नावाचा शॉर्ट फॉर्मही चालेल....नाथ–नाथा, किंवा रघू वुइल बी गुड इनफ !

बाजीराव : पण रघ्या—

इसम : रघ्या इज बेटर स्टिल ! पुढे बोल. मला थांबायला वेळ नाही.

बाजीराव : अरे, ही सगळी काय भानगड आहे, नीट समजावून सांगशील का !

इसम : ( घड्याळात पाहून ) बापरे–ठरलेल्या वेळेपेक्षा फार उशीर झाला. (घाईने) मित्रांनो, मधे एक शब्दही न बोलता, मी काय म्हणतो ते फक्त ऐकून घ्या. गजा, तोंड वासून बसू नकोस तोंड मीट. ( तो मिटतो ) हां.

इसम : मला माहीत आहे, तुम्ही दोघेही आहात त्या परिस्थितीत सुखी नाही आहात. वैतागलेले आहात. पण घाण्याला जुंपले गेलेले आहात, म्हणूनच घाण्याच्या बैलासारखे डोळ्यावर झापडं बांधून नाइलाजानं त्याच त्या चाकोरीत पायपीट करता आहात. खरं ना ? आय नो– आय नो. पाहा. मी तुमच्यासाठी हा सुखी माणसाचा सद्रा घेऊन आलोय. फक्त हो म्हणा. जुना सद्रा फाडायचा कसा, हा नवा घालायचा कसा, सगळं माझ्यावर सोडा. मी योगिराजांच्या जवळ

तुमच्यासाठी सूतोवाच करून ठेवलेलं आहे. सुदैवानं त्यांनीही मान्यता दिलेली आहे. आणि एकदा योगिराजांनी मनात आणलं की त्यांना जगात अशक्य असं काही नाही.

गजाभाऊ : हे काय आणखी नवंच ? हा योगिराज कोण काढलास मधेच ?

इसम : योगिराज मुकेश. वन्डर ऑफ द वर्ल्ड. लिबरेटर ऑफ मॅनकाइंड.... फाऊंटन ऑफ जॉय.... मुकेशयोगी !

[ याच वेळीं दरवाज्यात एक भव्य पुरुष उभा राहातो. दाढी व डोकीचे केस वाढलेले. भगवी सिल्कची कफनी. भगवी लुंगी. वरती बुलनचा नक्षी असलेला पायघोळ झगा. थोडा फार येशू ख्रिस्तासारखा दिसणारा ]

योगिराज : हरि ॐ तत्सत् !

इसम : योगिराज– आपण स्वतः आलात ! ( त्या दोघांना ) पाहिलंत ? नुसतं नाव काढताच योगिराज तुम्हांला दर्शन देण्यासाठी धावत आले. दाराची घंटी वाजली नाही–कुणी दरवाजा उघडला नाही–तरी योगिराज तुमच्यासमोर प्रकट झाले !

योगिराज : बेटा रघुनाथ, तुला माहिती आहे, अतिशयोक्ती आम्हांला अप्रिय आहे. चमत्कारादी ढोंगबाजीचे प्रकार आम्हांला वर्ज्य आहेत. या सज्जनांना भेटण्यासाठी तू इथे आलास. आम्ही तुझी वाट पाहात गाडीतच थांबलो. अपेक्षित वेळेपेक्षा जास्त वेळ घेतलास म्हणून गाडीतून उठून इथे आलो. घराचा दरवाजा उघडा होता. म्हणून घरात आलो. मनाचा दरवाजा उघडा ठेवा....आम्ही मनात येऊ. बुद्धीचा दरवाजा उघडा ठेवा....बुद्धीत येऊ. जिथे जिथे उघडा दरवाजा तिथे तिथे आम्ही !

इसम : क्षमा असावी योगीराज...

योगिराज : हरि ॐ तत्सत् !

इसम : योगिराज, हे माझे मित्र ( गजाकडे हात करून ) हे–

योगिराज : हे मिस्टर गजानन भिंगारे आणि हे प्रोफेसर बाजीराव पळपुटे.

बाजीराव : आश्चर्य आहे !

योगिराज : आश्चर्य नको. हा चमत्कार नाही. साधं तर्कज्ञान. रघुनाथानं तुमची माहिती आम्हांला आधीच सांगितलेली होती. गजानन भिंगारे प्रसिद्ध कलावंत. त्याचा फोटोही वर्तमानपत्रातल्या जाहिरातीत पाहण्यात आला. तेव्हा त्याला

ओळखलं. उरलेले तुम्ही प्रोफेसर पळपुटे, हा साधा निष्कर्ष.

रघुनाथ : योगिराज, मी या दोघांशी बोललो. मोठ्या उत्साहानं नवजीवनाचा प्रयोग करून घ्यायला तयार आहेत हे...

दोघेही : (चमकून) काय ?

रघुनाथ : (त्यांना दाबीत) श्र्श्र्श्र् !

योगिराज : रघुनाथ !

रघुनाथ : योगिराज !

योगिराज : दोघांना आपल्या प्रयोगाची संपूर्ण कल्पना दिलीस ?

रघुनाथ : संपूर्ण नाही—थोडी ओझरती कल्पना दिली.

योगिराज : मग इतका वेळ काय करीत होतास इथे ? नुसती शब्दांची उधळपट्टी आण वेळेचा अपव्यय ?

रघुनाथ : क्षमा असावी – योगिराज.

योगिराज : नुसती क्षमा मागू नकोस. स्वतःच स्वतःला दंडन करून घे. आमचा संवाद संपेपर्यंत त्या कोपऱ्यात शीर्षासन कर !

रघुनाथ : जशी आपली आज्ञा.

[कोपऱ्यात शीर्षासन करून राहतो.]

योगिराज : तुम्ही दोघांनी आमच्या या नवजीवनाच्या महान प्रयोगात सहभागी होण्याचा कल्याणप्रद निर्णय घेतला हे ऐकून परमसंतोष झाला.

गजाभाऊ : नाही नाही; तसं नाही. खरं सांगायचं म्हणजे–

योगिराज : (हात वर करून त्याला थांबवीत) आता झाला त्यापेक्षा वेळेचा जास्त अपव्यय नको. फक्त आम्ही बोलतो ते ऐका. नवजीवन प्राप्त करून घेण्यासाठी तुम्हांला तुमच्या सांप्रतच्या जीवनाचा त्याग करणं आवश्यक आहे !

गजाभाऊ : म्हणजे मरावं बिरावं लागणार आहे की काय आम्हांला ?

योगिराज : लौकिक अर्थानं. प्रत्यक्ष नव्हे. तूर्त तुम्ही इतकंच सांगा. कोणत्या प्रकारचं मरण पसंत कराल तुम्ही ?

गजाभाऊ : खरं म्हणजे मरणाची आयडियाच नापसंत आहे आपल्याला.

योगिराज : आम्हांला विनोद वर्ज्य आहे. पूर्वजीवनाचे पाश तोडण्याचा मरण हाच बिनतोड मार्ग आहे. प्रश्न एकच – मरण कोणत्या प्रकारचं – ए क्लास....बी क्लास...की सी क्लास....

बाजीराव : योगिराज, मरण म्हणजे मरण. त्यात ए क्लास... बी क्लास... कशाचा आणखी ?

योगिराज : आधुनिक मानवी जीवनच इतकं गुंतागुंतीचं झालेलं आहे की, मरणसुद्धा सरळ साधं मरण राहिलेलं नाही. फार कॉम्प्लिकेटेड झालंय. उदाहरणार्थ– ए क्लास मरणाला खर्च बराच येतो. ते फक्त श्रीमंतासाठी. श्रीमंत माणूस अमुक एका अपघातात मेला असं नुसतं जाहीर होऊन चालत नाही. त्याचं प्रेत सापडावं लागतं. ते त्याचंच म्हणून ओळखलं जावं लागतं....अनेक गुंतागुंती....त्या आकाराचं प्रेत मिळवणं, त्यावर प्लॅस्टिक सर्जरी करून ते मूळ माणसाबरहुकूम बदलणं....अपघात घडवून आणणं....जेमतेम ओळख पटावी इतपतच प्रेताची अवस्था ठेवणं....वगैरे वगैरे....

बाजीराव : गुड हेवन्स !

योगिराज : बी क्लासमध्ये प्रेत सापडणं आवश्यक असतं. पण चेहऱ्याची ओळख पटण्याची आवश्यकता नसते. आगीत जळून म्हणा.... रेल्वेखाली सापडून म्हणा....किंवा एखाद्या कड्यावरून कोसळून म्हणा, ते छिन्नविच्छिन्न झालेलं असलं तरी चालतं. ओळख पटेल अशी एखादी वस्तू किंवा एखादं पत्र प्रेताच्या खिशात सापडलं म्हणजे कार्यभाग होतो. याला खर्च कमी. हे बिन-चेहऱ्याचं मरण हायर मिडल क्लाससाठी. कारण, या मध्यम वर्गाला चेहरा नसतो.

गजाभाऊ : वा भाई वा !

योगिराज : सी क्लास मृत्यू हा सामान्य माणसासाठी. असा माणूस जिवंत असून मेल्यात जमा असतो. आणि मेला तरी कुणाच्या खर्ची पडत नाही. असा माणूस जगलामेल्याचा हिशेब कुणी ठेवीत नाही. म्हणून हे मरण सगळ्यांत सोपं....नदीत बुडून मेला–प्रेत सापडलं नाही.

बाजीराव : पण योगिराज, हे सगळं आवश्यकच आहे का ?

योगिराज : अर्थात ! एकदा तुमच्या कुटुंबीयांनी आणि संबंधितांनी तुमचा मृत्यू गृहीत धरला की तुमचं हे चालू जीवन संपुष्टात येईल. तुम्हीही ते विसरायचं. मग तुम्ही म्हणाल त्या शहरी....तुम्ही पसंत कराल ते नवं जीवन नव्या नावानं सुरू करून देण्याची सर्व व्यवस्था आम्ही करू. प्रोफेसर, तुम्हांला नट व्हायचं होतं ना ? आम्ही तुम्हाला नट होण्याची संधी देऊ.

बाजीराव : कधी काळी नट होण्याची माझी महत्त्वाकांक्षा होती हे खरं. पण योगिराज, हे पोट – हे टक्कल–कोण नाटकात काम देईल मला ?

योगिराज : तुमचा कायापालट होईल. नटाला योग्य अशीच काया तुम्हांला लाभेल. ( गजाला ) आणि तुम्ही....पुत्रसंतान नाही म्हणून या जीवनात तुम्ही दुःखी आहात. नवजीवनात तुम्हांला संततिसुख मिळेल.

गजाभाऊ : योगिराज, पण माझी बायको या जीवनातच राहील ना ! बायको इकडे राहिल्यावर संतती कशी काय होणार तिकडे ?

योगिराज : नवजीवन सुरू होताच या जीवनातल्या पत्नीचा संबंध आपोआपच संपतो. नव्या जीवनात तुमच्या पसंतीची नवी बायको करून देण्यात येईल. संतती होईल ती तिच्यापासून.

गजाभाऊ : हिच्यापासून झाली नाही. तिच्यापासून होईल ?

योगिराज : ते सर्वस्वी तुमच्यावर अवलंबून आहे. आणि नाहीच झाली तरी तेवढ्यानं दुःखी होण्याचं कारण नाही. मूल असलेल्या एखाद्या होतकरू बाईशीच तुमचं लग्न लावून देऊ !

गजाभाऊ : म्हणजे सवत्स धेनू गळ्यात घ्यायची. बापरे !

योगिराज : अशा रीतीनं तुम्हांला तुमचं हरवलेलं सुख सापडेल. आमचा प्रयोग यशस्वी होईल. आणि मानवाला सुखाची गुरुकिल्ली सापडेल. हरि ॐ तत्सत् !

[ योगिराज डोळे मिटून घेतात. या वेळी रघुनाथ शीर्षासन सोडून येतो. ]

बाजीराव : योगिराज—

रघुनाथ : शूः ! योगिराज समाधिस्थ झाले.

गजाभाऊ : अरेरे !

रघुनाथ : अरेरे काय !

गजाभाऊ : च्‌ च्‌ च्‌ ! एकदम कसं झालं हो असं ?

रघुनाथ : गाढवासारखं बोलू नकोस ! तसलं काही झालं नाही. योगिराज फक्त समाधी अवस्थेत गेलेले आहेत. ते पुन्हा सावध होईपर्यंत तुम्हांला तुमचा निर्णय घेतला पाहिजे. बोला...

बाजीराव : म्हणे बोला. काय बोला ?

रघुनाथ : अशी संधी पुन्हा येणार नाही.

बाजीराव : आत्महत्या वगैरे म्हणजे टू मच झालं.

रघुनाथ : अरे, प्रत्यक्ष थोडंच मरायचंय– खोटं मरायचं.

गजाभाऊ : मी खोटा मरेन; पण माझी बायको खरी विधवा होईल त्याचं काय?

बाजीराव : पोरं निराधार होतील त्याचं काय?

रघुनाथ : अरे, या बायकापोरांच्या कटकटीलाच वैतागला होतास ना तू?

बाजीराव : हो. पण– आता मरायचं म्हणजे त्यांचा विचार नको करायला?

रघुनाथ : समज, हार्टफेल होऊन खराच मेलास, तर त्यांचा विचार करायला फुरसत मिळणार आहे तुला?

बाजीराव : पण माझ्या मागे त्यांचं काय होईल?...

रघुनाथ : काय होईल? चार दिवस रडतील आणि गप्प बसतील. विसरतील. काही कुणाचं अडणार नाही. तान्ह्या मुलाचंसुद्धा अडत नाही या जगात. खरं ना? मग इतरांची पर्वा आपल्याला कशाला? आपण मेलो, जग बुडालं!

बाजीराव : मी खराखुराच मेलो तर हे बरोबर. पण मी खरा मरणार नाहीच ना! जिवंतच राहणार. जिवंत डोळ्यांनी त्यांचे हाल बघवतील?

रघुनाथ : हाल बघायला तू कुठे असणार आहेस त्यांच्या जवळ?

बाजीराव : अरे, दुरून का होईना, पण—

रघुनाथ : माणसानं स्वतःपुरतं पाहावं. अशी संधी पुन्हा पुन्हा येत नाही. विचार करा. झटपट........

गजाभाऊ : झटपट काय? माझ्या नव्या नाटकाची तालीम—जुन्या नाटकांच्या डेट्स—

रघुनाथ : अरे, नटसम्राट मेला तरी रंगभूमी त्याच्यासाठी खोळंबून राहात नाही. तू तर विदूषक लेका. दोन दिवसांत रिप्लेस होशील!

गजाभाऊ : घोळ आहे.

रघुनाथ : एकदा ही संधी हातची घालवलीत की– पाहा– पुन्हा तेच —नको तेच! अखेरपर्यंत तेच.......

बाजीराव : अरे पण—

रघुनाथ : प्रयत्न करून पाहायला काय हरकत आहे? एक गॅंबल .. एक जुगार.

[ तिघांचे हे आर्ग्युमेंट वाढत वाढत एका परमोच्च बिंदूला जाते. सर्व दिवे मंद होत जातात. फक्त या तिघांवर प्रकाशझोत आहे. पार्श्वसंगीत शिगेला पोचत असताच पडदा पडतो. ]

# आश्चर्य नंबर दहा

आश्चर्य नंबर दहा

## अंक दुसरा

[ महाबळेश्वर येथील मुकेश योग्याचा 'योगाश्रम'. आश्रमाचा विस्तार मोठा आहे. आवारातील बंगल्याचा दिवाणखाना. पडदा वर जाताना रंगमंचावर कुणीही नाही. क्षणभराने आतून गजाभाऊ व त्याच्या पाठोपाठ रघुनाथ प्रवेश करतात. ]

**गजाभाऊ** : नो–नो–नो मीन्स नो !

**रघुनाथ** : अरे, माझं ऐकून तरी घेशील की नाही ?

**गजाभाऊ** : वन्स नो ऑलवेज नो. मला काही एक ऐकायचं नाही !

**रघुनाथ** : तुला ऐकायचं नसलं तरी मला सांगायचंय ना....

**गजाभाऊ** : मग तू इथे सांगत बैस. मी बाहेर जातो. ( उठून जाऊ लागतो )

**रघुनाथ** : गजा, फॉर हेवन्स सेक, इथे बैस आणि मी काय म्हणतो ते ऐकून घे थोडंसं.

**गजाभाऊ** : थोडं नाही आणि जास्त नाही. योगिराजांच्या या आश्रमात येऊन आपल्याला जवळजवळ चार महिने होत आले. आतापर्यंत शंभर वेळ तुला सांगितलंय. मला तुमचा तो कायापालट नको आणि ऑपरेशन तर त्याहून नको. साधं दाढी करताना ब्लेड लागलं तर मला चक्कर आल्यासारखं होतं– आणि ऑपरेशन !

रघुनाथ : अरे पण—

गजाभाऊ : सुऱ्या—कात्र्या-–क्लोरोफॉर्म ? नो—आऊट ऑफ क्वेश्चन !

रघुनाथ : गजा, हे तसलं ऑपरेशन थोडंच आहे ? साधी प्लॅस्टिक सर्जरी.

गजाभाऊ : प्लॅस्टिक असो, नाही तर इलॅस्टिक असो, आपल्याला नाय पाहिजे.

रघुनाथ : तुला माहिती नाही. हे ऑपरेशन करणारा डॉक्टर अमेरिकेतला मोठा तज्ज्ञ आहे. अशी संधी पुन्हा मागून मिळणार नाही !

गजाभाऊ : मग संधी सोडू नकोस. तूच करून घे ऑपरेशन.

रघुनाथ : मी करून घेतलंय, तुला दिसत नाही ? प्रोफेसरनंसुद्धा करून घेतलं. इतर नऊ जणांनी करून घेतलं. आता फक्त तू राहिला आहेस.

गजाभाऊ : मग आपण ऑनरेबली रिटर्नड्. त्या तज्ज्ञाला सांग, दुसरा काही उद्योग नसेल तर ते प्लॅस्टिकचे चाकूसुरे स्वतःवर चालव. आपल्या अंगाला हात लावायचा नाही ! सांगून ठेवतो. विनयभंगाची आणि वर आणखी बलात्काराची फिर्याद ठोकीन ! नो लाउस...

रघुनाथ : इडियट ! तुला कसं समजावून सांगू ? गजा, अरे योगिराजांच्या नव-जीवनाच्या प्रयोगात कायापालट हा फार महत्त्वाचा टप्पा आहे.

गजाभाऊ : हे पाहा रघू, योगिराजांना सांग, तुमचं हे नवजीवनाचं सगळं नाटक आपल्याला पास आहे. फक्त एवढी ही कायापालटाची एंट्री सेन्सॉर करा. माझ्या आहे त्या शरीरात कुठलाही बदल झालेला मला चालणार नाही. मी जसा आहे तसा आणि तसाच असायला पाहिजे. जसा आईच्या कुशीत जन्माला आलो– जसा वयाबरोबर वाढलो तसाच. त्यात काही कमी होता कामा नये; वाढता कामा नये; इकडचं तिकडे होता कामा नये. ज्याचं जे जे जिथल्या जिथे आहे, ते ते तिथल्या तिथेच राहिलं तर तो मी, माझा मी राहणार आहे.

रघुनाथ : तेच तेच, नेमकं तेच तुला विसरायला पाहिजे. अरे बिनडोक, आता तू तो पूर्वीचा गजा राहिला नाहीस. तो गजा भिंगारे चार महिन्यांपूर्वीच आत्महत्या करून मेला. वर्तमानपत्रात बातम्या आल्या. श्रद्धांजल्या झाल्या. लोक विसरले देखील त्याला. आता तूही त्याला विसरलं पाहिजेस. अरे, नवजीवन प्राप्त करून घेण्यासाठी तू आमच्याबरोबर महाबळेश्वरच्या या आश्रमात आलास ना ?

गजाभाऊ : मला नवजीवन हवं आहे. पण ते असलं नको. नवं जीवन माझं मला

हवं आहे. माझ्यातला मीच बदलता कामा नये.

रघुनाथ : तुझा तूच राहणार आहेस. फक्त बाहेरचा चेहरा–मोहरा बदलेल. आतलं तेच राहील.

गजाभाऊ : आतलं सगळ्यांचं तेच असतं. माणूस अमुक म्हणून ओळखला जातो तो त्याच्या चेहऱ्यामोहऱ्यावरूनच.

रघुनाथ : गजा, माझ्या राजा, इट वुइल बी नथींग बट द सेम ओल्ड वाईन इन न्यू बॉटल ! बाटली फक्त नवी–मद्य जुनंच !

गजाभाऊ : जुन्या रापलेल्या मद्याला त्याची स्वतःची एक विशिष्ट चव असते. नवी बाटली आली की ती चव मचूळ झाल्यासारखं त्या दारूलासुद्धा वाटायला लागतं. छ्याः ! कायापालट म्हणे. अरे, देवानं इतकं सुंदर शरीर दिलंय...

रघुनाथ : माय गॉड ! तू स्वतःला सुंदर समजतोस ?

गजाभाऊ : समजायला कशाला पाहिजे ? आहेच मी सुंदर !

रघुनाथ : (मोठ्याने हसत) ओ गॉड....ओ गॉड... गजा, तुझा सेन्स ऑफ ह्यूमर बाकी एकदम तगडा हं–तू सुंदर ?....(हसत राहातो)

गजाभाऊ : हसायला काय झालं ? तुला नाही मी सुंदर वाटत ?

रघुनाथ : ओ ! शट् अप्...डोंट बी सिली !

गजाभाऊ : हं. याचा अर्थ, तुला सेन्स ऑफ ब्यूटी नाही.

रघुनाथ : सेन्स ऑफ ब्यूटी नसेल, पण सेन्स आहे. म्हणून सेन्सिबल वाटतं ते सांगतो. देवानं सौंदर्य वाटलं तेव्हा तू हजर असावास असं तुझ्याकडे पाहून वाटत नाही !

गजाभाऊ : ठीक आहे. तुझ्या दृष्टीनं कुरूप आहे ना मी ? असू दे. पण तो माझा मी आहे. जे आहे ते माझं आहे. ते देवानं दिलंय मला. ते टाकता येणार नाही. दुसरं कुणाचं उसनं घेता येणार नाही. जे जन्माचं सोबती होण्या साठीच बरोबर आलंय, त्याचा कंटाळा कशासाठी करायचा ? आपल्याला नाही असला कर्मकरंटेपणा जमणार. आणि खरं सांगू ? या कुरूपतेनंच सम्राटाचा मुकुट ठेवला ना माझ्या मस्तकावर ? विनोदाचा सम्राट ! महाराष्ट्राचा लाडका विदूषक ! हास्याचा धबधबा ! अरे, ज्यानं या किताबतींची खैरात केली माझ्या- वर त्याच शरीराचा पालट करू मी ? दिनकर कामण्णा काय मदनाचा अवतार होता ? पण एके काळी फिदा होतास ना तू त्याच्यावर ? दामूअण्णांचे डोळे–

एक उत्तरेला एक दक्षिणेला. पण त्याच डोळ्यांवर लट्टू होतास ना तूच ? याच लायनीतला मीही एक. ज्या कुरूपतेनं आम्हाला सुंदर केलं, तिच्यावरच सुरी चालवू म्हणतोस ? यासारखा कृतघ्नपणा नाही दुसरा !

रघुनाथ : काहीतरी गाढवासारखं बोलू नकोस. कृतघ्नपणा कसला आलाय त्यात ? योगिराजांच्या प्रयोगाच्या यशाच्या दृष्टीनं ही एक आवश्यक गोष्ट आहे. गरज म्हणून करायची.

गजाभाऊ : गरज कसली आली ? बोडक्याची ? फाजील चोचले आहेत हे. लाज वाटते ना आपली आपल्यालाच आपल्या कुरूपतेची. कुणाला टक्कल पडल्याची लाज वाटते....कुणाला काळ्या कातडीची..नकट्या नाकाची....आखूड केसांची.. तर कुणाला वेढव शरीराची. माझी खात्री आहे, सहज शक्य झालं तर नव्वद टक्के स्त्रीपुरुष स्वतःचा कायापालट करून घ्यायला तयार होतील. पण मला हा वेडेपणा साफ नामंजूर आहे.

रघुनाथ : हा वेडेपणा ? अरे, एवढा विद्वान प्रोफेसर, पण त्यानंसुद्धा...

गजाभाऊ : तोही त्यातलाच. डोक्याचा टार रोड झाला; हे बसले झुरत. पोटाचा घेर फूटभर वाढला; यांचं काळीज इंचभर आखडलं. अरे, वाढलेल्या पोटाची लाज वाटून व्यायचं ठरलं तर मातृत्वाचीसुद्धा लाजच वाटायला हवी. पोट वाढू नये म्हणून संततिनियमन ? मुलं होणंच बंद ! असा बोंबलत !

रघुनाथ : त्याचा याचा काय संबंध आहे ? मातृत्व ही स्त्रीची शोभा आहे. पुरुषाचं वेगळं. शिवाय मातृत्व ही एक प्रासंगिक घटना आहे. पण पुरुषानं नऊ महिने भरल्यासारखं पोट घेऊन फिरायचं सतत म्हणजे लाज आहे ! शास्त्रीय उपायांनी ते कमी केलं तर बिघडलं कुठे ?

गजाभाऊ : तुम्ही करा. माझ्या पोटाला हात लावायचा नाही. ती माझी खाजगी प्रॉपर्टी आहे. स्ट्रीक्टली प्राइव्हेट...ट्रेसपासर्स नॉट अलाऊड ! समजलं ?

रघुनाथ : असा वेडेपणा करू नकोस गजा. योगिराज केवढे संतप्त होतील याचा विचार कर...

गजाभाऊ : त्यांना उगीच डाफरायला काय झालंय ? मी कायापालट केला नाही, तर काय कुणी फिर्याद करणार आहे त्यांच्यावर ?

रघुनाथ : अरे, तू आणि प्रोफेसर, दोघांनी मिळून आत्महत्या केलेली आहे ना !

गजाभाऊ : आयला ! तो एक गाढवपणा !

**रघुनाथ** : 'आम्ही संसारातल्या कटकटींना कंटाळून, गळ्यात धोंडा बांधून घेऊन समुद्रात जीव देत आहोत' अशी तुमच्या सह्यांची पत्रंही गेली आहेत तुमच्या दोघांच्या घरी. वर्तमानपत्रात तशा बातम्याही छापून आणलेल्या आहेत योगिराजांनी. ठणाणा झालाय सगळीकडे. गळ्यात धोंडा असल्यानं तुम्ही समुद्राच्या तळाशीच आहात या समजुतीत आहेत सगळे. आता इतकं सगळं झाल्यावर तुला तुझ्या पूर्वीच्याच अवतारात कुणी पाहिलं आणि ओळखलं तर ? त्यातून तुला तर रस्त्यावरचं पोर देखील सहज ओळखील...

**गजाभाऊ** : ओळखलं तर ओळखलं. होऊन होऊन काय होईल ? फार झालं तर म्हणतील—स्टेजवर विदूषकी करतोच, प्रत्यक्ष जीवनातही केली ! एक प्रॅक्टिकल जोक !

**रघुनाथ** : पण यातून फार घोटाळे निर्माण होतील. योगिराजांचा हा प्रयोग...

**गजाभाऊ** : योगिराजांना सांग—माझ्यापुरता हा प्रयोग फसला म्हणून समजा. पण धीर सोडू नका. ट्राय अॅण्ड ट्राय अगेन, बॉइज. यू वुइल सक्सीड अॅट लास्ट !

**रघुनाथ** : आता कसं सांगू तला ? अरे, हा प्रयोग शंभर टक्के यशस्वी झालाच पाहिजे. त्याला दुसरा पर्याय नाही. या यशावरच योगिराजांचे पुढचे प्लॅन्स अवलंबून आहेत....

**गजाभाऊ** : कसले प्लॅन्स ?

**रघुनाथ** : योगिराजांच्या परवानगीशिवाय मला काही एक सांगता येणार नाही; पण एकच लक्षात ठेव. ही भानगड दिसते तितकी सोपी नाही. फार मोठं प्रकरण आहे हे....

**गजाभाऊ** : कसलं प्रकरण ? काय भानगड आहे ही रघ्या ?

**रघुनाथ** : या क्षणी काहीही सांगू शकणार नाही मी. पण गजा, तुझ्यामुळे हा प्रयोग कुठे काही घोटाळ्यात पडला तर—तर काय होईल माहिती आहे ?

**गजाभाऊ** : काय होईल ?

**रघुनाथ** : आत्ता तू कुठे आहेस ?

**गजाभाऊ** : कुठे म्हणजे काय ? इथेच आहे....

**रघुनाथ** : नाही—इथे नाहीस. गळ्यात धोंडा बांधून समुद्राच्या तळाशी पडलेला आहेस !

गजाभाऊ : हां—हां—म्हणजे जगाच्या दृष्टीनं.

रघुनाथ : पण आता तुझ्या स्वतःच्या दृष्टीनंसुद्धा समुद्राच्या तळाशीच जाशील--गळ्यात धोंडा बांधून !

गजाभाऊ : म्हणजे खून-बीन—

रघुनाथ : होय. आत्महत्या नव्हे !--खून ! हा नवजीवनाचा प्रयोग अगदी शंभर टक्के खरा असला तरी त्यामागचा योगिराजांचा हेतू....ओ सॉरी. यापेक्षा जास्त काही एक सांगता येणार नाही मला. पण तूर्त इतकंच लक्षात घे--हे योगिराज फार महत्त्वाकांक्षी आहेत. फार मातब्बर आहेत. या प्रयोगात थोडाही व्यत्यय आपल्यामुळे आला तर सहज काटा काढू शकतील ते आपला !

गजाभाऊ : बापरे ! रघ्या लेका, भलतीच रहस्यमय भानगड दिसते ही !

रघुनाथ : तशी ती काही फार रहस्यमय नाही. सगळं सुरळीत झालं तर योगिराज देवमाणसासारखे आहेत. त्यांचा हा प्रयोग म्हणजे तर सुखाची गुरुकिल्लीच आहे. प्रयोगाच्या यशापयशावर योगिराजांच्या महत्त्वाकांक्षेचे मनोरे उभे आहेत. तेव्हा माझ्या सोन्या, ते म्हणतात तसं करायला तयार हो. सुखाची गुरुकिल्ली हस्तगत करुन घे. मग ते त्यांच्या वाटेला--आपण आपल्या वाटेला...

गजाभाऊ : घोळ—प्रचंड घोळ आहे. हे बघ रघू, माझ्या डोक्यात पार गुंता झालाय—तो आधी सोडव.

रघुनाथ : मला यापेक्षा जास्त काही एक सांगता येणार नाही.

गजाभाऊ : ठीक आहे ! मग हा घोळ सुटेपर्यंत जैसे थे ! काय व्हायचं असेल ते होऊन जाऊ दे. हंः ! खून करतील म्हणे. खून करणं म्हणजे प्लॅस्टिक सर्जरी करण्याइतकं सोपं वाटलं यांना...( उठून दरवाज्यापर्यंत जातो. थबकतो. वळतो–) घ्या. हे आले महाराष्ट्राचे भावी नटसम्राट ! होशिय्यार ! नजरबर कदम, होशियार ! कदम, निगाह रक्खो ! हिज एक्सहोस्टेड हायनेस दि गणपतराव जोशी ऑफ महाराष्ट्र ! ( नाटकी आविर्भावात वाकून उभा राहतो. ) [ प्रा० बाजीराव प्रवेश करतो. तो आपादमस्तक ' नट ' झालेला आहे. ]

बाजीराव : ( त्याला वाकलेला पाहून ) काय शोधतो आहेस, गजा ? काही पडलंय का खाली ?

गजाभाऊ : हो. माझं नाक गळून पडलंय— ते शोधीत होतो !

बाजीराव : असं ? अरे, मग पडलं तर पडलं. त्या नाकाला गोळी मार. दुसरं

असवून घे—प्लॅस्टिकचं !

गजाभाऊ : अहो प्लॅस्टिक हीरो....

बाजीराव : अं ? मला काही म्हणालास ?

गजाभाऊ : हो—दुसरा कोण प्लॅस्टिक सर्जरीवाला हीरो आहे इथे ? वा: बाकी आता ऐकत नाही हां तुम्ही बाजीराव ! नॉट हिअरिंग. साली प्लॅस्टिकनं कमाल केली. ( रघूकडे पाहून ) काय दिसतोय गडी—आहा ! नुसता सौंदर्याचा ॲटम बॉंब ! रंगभूमीवर पहिलं पाऊल टाकलं रे टाकलं की धडामधूम ! बाकी सगळे हीरोलोक आडवे—पार जमीनदोस्त !

बाजीराव : इतका इंप्रेसिव्ह दिसायला लागलो मी ? वा वा ! कॅपिटल कॅपिटल ! सौंदर्याचा ॲटमबॉंब काय—वा वा ! एक्सलंट—सूपर्ब—मार्व्हलस ! पण गजा, काय रे, सौंदर्याचा ॲटमबॉंब मला वाटतं ऑलरेडी कुणाला तरी म्हणतात. कोण बरं तो....वेट वेट—काय नाव...इटस् ऑन द टिप ऑफ द टंग.

गजाभाऊ : काही आठवायचा प्रयत्न करू नका. डोक्याला शीण देऊ नका. आम्हाला माहिती आहे कुणाला म्हणतात ते. फक्त एवढंच लक्षात ठेवा. सौंद-र्याचा ॲटमबॉंब म्हणतात तो ‘ तो ’ नाही; ‘ ती ’ आहे.

बाजीराव : मग इनकरेक्ट ! शून्य मार्क ! उपमा चुकली. उपमान आणि उपमेय यांच्या लिंगांची गल्लत झाली. ‘ ती ’ म्हणजे स्त्रीलिंगी आणि ॲटमबॉंबचं लिंग कोणतं ?

गजाभाऊ : ॲटमबॉंबलाच विचारून सांगतो.

बाजीराव : विचारायला कशाला पाहिजे ? मी सांगतो. पुल्लिंग ! स्त्रीलिंगाला पुल्लिंगाची उपमा देणं चूक. पुन्हा लिंगाची अशी गल्लत होता कामा नये.

गजाभाऊ : यस् प्रोफेसर !

बाजीराव : प्रोफेसर ? कोण प्रोफेसर ? तो प्रोफेसर गेला समुद्राच्या तळाशी. आता इथे उभा आहे तो फक्त एक मुक्त कलावंत !

गजाभाऊ : हो—अभिनयाचा चारमिनार—रसिकांचा दिलप्यारा पासिंग शो !

बाजीराव : तू चेष्टा कर, पण लक्षात ठेव. असली सर्व विशेषणं एक दिवस माझ्याही नावामागे लागतील.

गजाभाऊ : लागतील का ? मी लावतो ना आत्ताच. ही दोन झालीच ! आणखी तिसरं एक पेटंट—सौंदर्याचा....

बाजीराव : नो नो. ते सेकंडहँड हँडल आपल्याला नको. दुसरं काहीतरी चटक-दार असं आत्ताच शोधून ठेव. काहीतरी....

गजाभाऊ : दुसरं कशाला ? हेच आजचं चलतं नाणं आहे !

बाजीराव : अरे पण एक ॲटमबॉंब आहे ना आधीचा....

गजाभाऊ : त्याच्या जोडीला आणखी एक. असू दे स्पेअरमधे. स्टेपनी.

बाजीराव : व्हॉट डू यू मीन ? मी स्टेपनी ?

गजाभाऊ : छे छे...तू फ्रंट व्हील. स्टेपनी ती.

बाजीराव : हां. असं. असं बोल.

गजाभाऊ : काही काळजी करू नका. तुमचा प्लॅस्टिक ॲटम एकदा स्टेजवर फुटू द्या...तो बॉंब टिकलीसारखा फुसका वाटेल लोकांना ! आयडिया...तू सौंदर्याचा ॲटमबॉंब-ती सौंदर्याची टिकली.

बाजीराव : आणि तू विनोदाचा फुरनळा. कॅपिटल-कॅपिटल -कॅपिटल ! आपल्या पहिल्या नाटकाची कास्ट ठरली.

गजाभाऊ : नको. तेवढं नको. तुमच्या या आतषबाजीपासून मला दूरच ठेवा.

बाजीराव : नो-नो. डॅट डोंट डू. या आनंदाच्या पहिल्या दिवाळसणात तू पाहिजेसच. यू आर अ मस्ट !

गजाभाऊ : मग मी होतो पणती. कुरूप बेढब पणती. कोपऱ्यात बसून आतष-बाजी पाहाणारी.

बाजीराव : करेक्ट युवरसेल्फ-करेक्ट युवरसेल्फ....पुन्हा गल्लत केलीस.

गजाभाऊ : काय झालं ?

बाजीराव : पणतीचं लिंग कोणतं ? तुझं कोणतं ?

गजाभाऊ : लिंगभेदाची गल्लत होऊ दे. अर्थाची गल्लत न करता तो लक्षात घे म्हणजे झालं. फटाकडे फुटतात; फुरनळे उडतात; क्षणभर चकचकाट करतात; आवाज करतात; पण दुसऱ्या क्षणाला कोळसा होऊन - मुके होऊन मातीत पडतात. मंद असली तरी कोपऱ्यातली पणती तेवत राहाते.

बाजीराव : हे कोणत्या नाटकातलं वाक्य ?

गजाभाऊ : ‘ दिवा जळू दे सारी रात. ’ लेट लॅम्प बर्न ऑल नाइट ! फक्त दिव्याच्या ठिकाणी पणती घालायची.

बाजीराव : हं. पण गजा, पणती तेल संपल्यावर विझतेच ना ! विझणं, कोळसा

होणं हा प्रकाशाचा शेवट तर अटळच आहे; पण विझेपर्यंत कोपऱ्यात जळत राहायचं की, क्षणमात्रच का होईना, विजेच्या तेजानं चमकायचं . मेघगर्जनेसारखा गडगडाट करायचा ... पाहाणाराचे डोळे दिपवून टाकायचे.... ऐकणाराच्या कानठळ्या बसवायच्या आणि दुसऱ्या क्षणाला राख होऊन पडायचं ....हाच खरा वादाचा मुद्दा आहे. अरे, आयुष्याची इतकी वर्षे सांदीकोपऱ्याच्या काळोखात मिणमिण जळत होतोच की. आता मला ओढ लागलेली आहे नेत्रदीपक प्रकाशाची – सबंध महाराष्ट्राचे कान खेचून घेईल अशा आवाजाची मला ओढ लागलेली आहे—

**रघुनाथ** : ( डोकं दाबीत ) गजा—गजा अरे याला आवर !

**गजाभाऊ** : कॉलेजसारखी घंटा नाही का इथे कुठे ? ती जाऊन वाजव. म्हणजे आपोआप थांबेल ! नाहीतर तब्बल पन्नास मिनिटं लेक्चर झोडल्याशिवाय तास संपवणार नाही हा ! वाघ्याचा पाग्या झाला तरी त्याचा येळकोट थांबणार नाही –मूळ स्वभाव जाणार नाही !

**रघुनाथ** : झक मारली आणि तुम्हा दोघांना या भानगडीत पाडले. तू तुझा अडेलतट्टूपणा सोडू नकोस ! हा याचा मूळ स्वभाव सोडायला तयार नाही ! योगिराजांच्या समोर माझा मात्र मधल्यामधे चुराडा ! ह्याः ! ( जाऊ लागतो )

**गजाभाऊ** : कुठे निघालास आता ?

**रघुनाथ** : तुम्ही बसा पणतीच्या वाती वळीत. मी तेल आणून घालतो. आणि योगिराज लावतील काडी ! ( पाय आपटीत जातो. )

**बाजीराव** : हा असा एकदम निघून का गेला ? आय डिड नॉट आस्क हिम टु क्विट द क्लास.

**गजाभाऊ** : नाही प्राध्यापक, तुम्ही क्विट नाही केलं त्याला. तो आपण होऊनच क्विट झाला ! आणि मीही आता आपली परवानगी न घेता एक्झिट घेणार आहे ! असं डोकं तापलंय ! एक छोटीशी, छानशी, सुंदरशी झोप काढतो जाऊन.

**बाजीराव** : झोप ? छोटीशी–छानशी–सुंदरशी ? ओः पॅरडाइज लॉस्ट ! ( खचून बसतो. )

**गजाभाऊ** : का रे काय झालं ?

**बाजीराव** : छोटीशी – छानशी – सुंदरशी....ओः गॉन आर द डेज !

गजाभाऊ : बाज्या...लेका झटका वगैरे आला काय एकदम ?

बाजीराव : ती झोप गेली. मित्रा, गेली. छोटीशी – सुंदरशी.–छानशी. कायमची गेली. दॅट ब्यूटी स्लीप – स्लीप ऑफ द इन्नोसन्ट ! बिछान्याला नुकतीच कुठे पाठ लागलेली आहे....शेजारी बायकोनं नुकतीच कुठे आपली नेहमीची निरर्थक असंबद्ध बटबट करायला सुरुवात केलेली आहे....की आली. पिसावर बसून आली. अलगद – कळत न कळत आली. पाकळीवर पाकळी पडावी तशी पापणी पापणी भिडली–खोल गाभाऱ्यातून यावा तसा माझ्याच घोरण्याचा आवाज स्पष्ट अस्पष्ट माझा मलाच ऐकू आला न आला –आणि सगळं शांत–निवांत ! ( क्षणभर सुखद स्मृतीत तल्लीन. मग एकदम वैतागून ) छ्यः ! आणि आता झोपेच्या गोळ्या काय– ट्रँक्विलायझर्स काय–तरी सिग्नल पडत नाही. झोप येत नाही. गजा, आमच्या हिची किंमत आता मला कळते आहे. काय शब्दात ताकद होती हिच्या ! व्ही. टी. ला पहिला शब्द तोंडातून बाहेर पडला हिच्या, तर दहावा शब्द पुरा व्हायच्या आत मी खंडाळ्याच्या घाटात पोचलेला असायचो !

गजाभाऊ : मी निघतो.

बाजीराव : कुठे निघालास ?

गजाभाऊ : थोडा खंडाळ्याच्या घाटात फेरफटका मारून येतो.

बाजीराव : बैस. मित्रा, असा इथेच बैस. आज बायकोची फार आठवण येते.

गजाभाऊ : असं ? मग मला निघायलाच पाहिजे.

बाजीराव : का ?

गजाभाऊ : बायकोची आठवण झालेल्या नवऱ्याजवळ कुणीही थांबू नये ! डेंजरस !

बाजीराव : गंमत सोड. मी सीरियसली बोलतोय. खरंच, हिची फार फार आठवण येते. जीव गलबलून गेलाय सकाळपासून...

गजाभाऊ : का ? इतक्या दिवसांत आजच आठवण आली ?

बाजीराव : खरं सांगू ? तशी रोजच यायची...पण या प्रयोगाच्या एक्साइटमेंटमधे विचार करायला फुरसतच मिळाली नाही. पण हे दोनतीन दिवस उसंत मिळाली आणि मीच माझं काळीज कुरतडून खायला लागलो. कासावीस झालो. भांबावून गेलो.

गजाभाऊ : तू आता प्रांजळपणानं कबूल करतो आहेस म्हणून सांगतो. आपलीही तीच गत आहे यार...

बाजीराव : मग मी काय म्हणतो ते तुला समजेल. घायल की गति घायल जाने. दूजा न जाने कोई. रघ्याजवळ मी थोडं मन मोकळं करायचा प्रयत्न केला. पण त्यानं माझी चेष्टा केली. फार वाईट वाईट बोलला. माझं काळीज उंदराचं आहे म्हणाला. सशाचंसुद्धा नाही...उंदराचं! माझ्यात गट्स नाहीत म्हणाला. प्रोफेसर मी. पण त्यानंच माझ्यावर पुरा साठ मिनिटांचा तास घेतला.

गजाभाऊ : या प्रयोगाची झापडं बांधलेली आहेत ना त्याच्या डोळ्यावर! त्याला दुसरं दिसणार काय!

बाजीराव : तो उगीच्च जास्त भडकू नये म्हणून मी त्याच्यासमोर उत्साह दाखवला मघा—पण तो सगळा बेगडी उत्साह. बेगडी निर्धार. खरं म्हणजे पायाखालची जमीन सरकते आहे माझ्या. हे सगळं काय करून बसलो रे आपण! खरंच, नवं जीवन अंगवळणी पडणार आहे का आपल्या? आणि पडलं तरी त्यात सुख सापडणार आहे का आपल्याला? नव्याची नवलाई नऊ दिवस. पण दहाव्या दिवशी?

गजाभाऊ : हा सगळा विचार आधीच करायला पाहिजे होता आपण....

बाजीराव : भुरळ पडली—भुरळ पडली, त्यावेळी. शब्दांना फसलो—मृगजळावर भाळलो.

गजाभाऊ : तुला ही अक्कल आत्ता सुचते आहे. पण इथे आल्या दिवसापासूनच्च माझे पाय लटपटायला लागले होते.

बाजीराव : मग त्याच वेळी का नाही बोललास मला?

गजाभाऊ : कसं बोलणार? त्या वेळी तुमचं डोकं स्वर्गाला लागलेलं! पाय जमिनीवर होते कुठे? तुम्हाला वाटलं—झालं. आता 'हा स्वर्ग सात पावलांचा.' सात पावलं टाकली की आला सुखाचा स्वर्ग! तोंडातून ब्र काढला असता मी, तर तुम्ही लोकांनी कच्चं खाल्लं असतं मला! रघ्यानं तुझं एकच्च तास लेक्चर घेतलं. माझं अख्खा दिवस घेतलं असतं! शिवाय वर इंपोझिशन आणि होमवर्क!

बाजीराव : गजा—हा नवजीवनाचा प्रयोग म्हणजे एक भ्रमाचा भोपळाच असेल का रे?

गजाभाऊ : कुणास ठाऊक, काय आहे आणि काय नाही!

बाजीराव : पण मला अजूनही वाटतं गजा—वाटतो तितका भंपकपणाचा नसावा हा प्रकार. नाही म्हटलं तरी थोडा अर्थ आहे याच्यात.

गजाभाऊ : हं. लेट अस् वेट अँड वॉच !

बाजीराव : पाहूया ! तशी मलाही उत्सुकता आहेच. आणखी थोडे दिवस कळ काढावी लागेल. काढू या. नाहीच काही निष्पन्न झालं, तर आपल्याला काय, बॅक टु पॅव्हेलियन ! दि प्रॉडिगल रिटर्नस् होम !

गजाभाऊ : वाटतं तितकं सोपं नाही मेहेरबान ते ! या चक्रव्यूहात आपल्या पायांनी शिरलो आपण. आता त्यातून बाहेर पडणं आपल्या हातात नाही !

बाजीराव : व्हॉट डू यू मीन ?

गजाभाऊ : एक तर, आपण मेलो असं जाहीर झालेलं आहे. दुसरं म्हणजे, तू तुझा चेहरामोहरा बदलून घेतलेला आहेस. माझ्यापुढे तो प्रश्न नाही. पण तुला त्याचा विचार नक्कीच केला पाहिजे. आणि या दोन्ही अडचणी सुटल्या तरी योगिराज आहेतच मधे. रघू सांगत होता, हा प्रयोग शंभर टक्के यशस्वी करायचाच, असा निश्चय आहे त्यांचा. प्रयोगाच्या यशाला आपल्यामुळे थोडाही व्यत्यय येणार असेल तर योगिराज खूनसुद्धा करून टाकतील आपला !

बाजीराव : खून ? यू मीन मर्डर ?

गजाभाऊ : मर्डर !

बाजीराव : म्हणजे खून ?

गजाभाऊ : खून !

बाजीराव : आपला ?

गजाभाऊ : यस !

बाजीराव : तो योगिराज ?

गजाभाऊ : होय !

बाजीराव : रास्कल ! असं म्हणाला तो योगड्या ?

गजाभाऊ : असं रघूनं मला सांगितलं.

बाजीराव : मग उगीच आपल्याला दम भरण्यासाठी खोटं बोलला तो.

गजाभाऊ : रघू खोटं कधी बोलत नाही, तुला माहिती आहे.

बाजीराव : हो. तेही खरंच. ( क्षणभर स्तब्ध ) याचा अर्थ, हा आश्रम म्हणजे कैदखानाच झाला एक प्रकारचा !

गजाभाऊ : हं !

बाजीराव : आपली अक्कल आपल्याच बोकांडावर बसली. येग म्हशी, घाल पाठीत शिंग आणि कर मिरमिरं, तसं झालंय हे.

गजाभाऊ : झालंय खरं.

बाजीराव : मग आता ?

गजाभाऊ : आता काय ? संत म्हणतात ते पंतांनी ऐकावं....उगी राहावे आणि इथून सुटण्याची संधी मिळेपर्यन्त जे जे होईल ते ते पहावे !

बाजीराव : छ्या :! आगीतून निघालो आणि फुफाट्यात पडलो निष्कारण ! (वैतागाने उठतो आणि जाऊन टेलिफोन उचलतो) हलो, एक्स्चेंज–ट्रंक बुकिंग प्लीज...

गजाभाऊ : कुणाला फोन करतो आहेस ?

बाजीराव : हलो, ट्रंक बुकिंग–मला बॉम्बेला ट्रंक कॉल करायचाय. इथला नंबर ३०२....बॅाबेचा ५०६३१२ पी. पी. श्रीमती विमलाबाई पळपुटे.

गजाभाऊ : गाढवा, काय करतो आहेस हे ?

बाजीराव : बायकोला फोन करतो आहे.

गजाभाऊ : घोळ होईल–प्रचंड घोळ होईल ! त्या योम्याला कळलं तर...

बाजीराव : मी तिच्याशी काही बोलणार नाही....मला फक्त आवाज ऐकायचाय तिचा.

गजाभाऊ : बाज्या, प्रोफेसर झालास, पण अक्कल नाही तुला कवडीची ! (त्याला बाजूला करून घेतो) हलो एक्स्चेंज–गिव्ह मी ट्रंक बुकिंग प्लीज.

बाजीराव : नुसता आवाज ऐकायला काय हरकत आहे ? एक शब्द बोलणार नाही मी. आणि बोललो तरी मी कोण ते सांगणार नाही. नुसते चार शब्द ऐकायचे आहेत मला तिचे– झोप तरी लागेल निवांत.

गजाभाऊ : झोपेच्या गोळया घे दोन. (फोनमध्ये) हलो, ट्रंक बुकिंग ? हे पाहा. मी ३०२ वरून बोलतोय. आत्ताच बुक केलेला बॉंबेचा ट्रंक कॅन्सल करा, प्लीज. बॉम्बे नंबर ५०६३१२. थॅंक यू. (रिसीव्हर ठेवतो) मठ्ठ !

बाजीराव : गजा, मी तुला वाटतो तितका मठ्ठ नाही....मी मुद्दामच फोन करणार होतो तिला....कारण...

गजाभाऊ : झाला इतका ताप पुरा नाही झाला ? ब्लडप्रेशर होतं त्यात आणखी

डायबिटिस कशाला ?

बाजीराव : अरे, डायबिटिक कोम्यात जायची पाळी आलेली आहे म्हणून तर मी...

गजाभाऊ : म्हणजे काय ?

बाजीराव : तीन दिवसांपूर्वीच बायकोला एक पत्र पाठवलं...

गजाभाऊ : पत्र ?

बाजीराव : एक्सप्रेस डिलिव्हरी.

गजाभाऊ : कुणाची–मीनाची ?

बाजीराव : नाही–पत्राची. स्टुपिड! डोंट इंटरप्ट. मी स्वतः स्टेशनवर जाऊन रेल्वेच्या डाकेत पोस्ट केलं पत्र.

गजाभाऊ : घोळ आहे...घोळ आहे.

बाजीराव : ते एव्हाना मिळालं देखील असेल तिला.

गजाभाऊ : बापरे! म्हणजे सगळं कळलं असणार वहिनींना.

बाजीराव : काय ?

गजाभाऊ : की तू आत्महत्या केली नाहीस. जिवंत आहेस.

बाजीराव : डोंट वरी. पत्र वाचून, मी मेलेला आहे की जिवंत आहे, हे कळायला काही मार्गच नाही तिला.

गजाभाऊ : तुझं पत्र वाचूनसुद्धा ?

बाजीराव : अरे, मी जिवंत आहे असं थोडंच लिहिलंय पत्रात ?

गजाभाऊ : मग ?

बाजीराव : मी मेलेला आहे असंच लिहिलंय.

गजाभाऊ : आणि मेलेला असून पत्र लिहितो आहेस ? इथे ओशाळला मृत्यू! हियर डेथ टू....ओशाळ याला इंग्रजी शब्द काय ?

बाजीराव : ओ शट मी! मला काय मूर्ख समजलास तू ? मी पत्र स्वतःच्या नावावर थोडंच लिहिलंय ?

गजाभाऊ : मग ?

बाजीराव : माझा एक आतेभाऊ हॉंगकॉंगला असतो–मोठा व्यापारी आहे. बलवंत दुधाट....

गजाभाऊ : म्हणजे आपला बंड्या—

बाजीराव : हं. आमचं लग्न होण्यापूर्वीपासून हाँगकाँगलाच आहे. बायको त्याला नुसतं नावानं ओळखते. प्रत्यक्ष पाहिलेला नाही.

गजाभाऊ : त्याच्या नावानं लिहिलंस?

बाजीराव : ऑफ कोर्स. पण घोटाळा पुढेच आहे.

गजाभाऊ : नुसता घोटाळा आहे की ब्रह्मघोटाळा आहे?

बाजीराव : ब्रह्मघोटाळा विथ अ कॅपिटल 'ब्र'. जयंतला घेऊन तावडतोब इकडे महाबळेश्वरला ये, असं लिहिलंय मी पत्रात.

गजाभाऊ : मेलो!

बाजीराव : मी—मी म्हणजे कोण? वंड्या दुधाट.

गजाभाऊ : आलं लक्षात. पुढे बोल.

बाजीराव : मी हाँगकाँगहून नुकताच परत आलोय. मोठ्या आजारातून नुकताच उठलोय. म्हणून हवा बदलासाठी इथे या आश्रमात येऊन राहिलो आहे. इथे आल्यावर एकुलत्या एक मित्राच्या—म्हणजे 'माझ्या—मृत्यूची बातमी समजली. वास्तविक मीच तिकडे येऊन भेटायला पाहिजे होतं. पण प्रकृती एकाएकी बिघडल्यानं येऊ शकत नाही. तुम्हीच इकडे या....तावडतोब या. जेवत असलात तर हात धुवायला या. माझा भरोसा नाही. हार्टचं दुखणं आहे. तुमच्याशी फार महत्त्वाचं बोलायचं आहे. माझ्या दिवंगत मित्राच्या मुला-बाळांच्यासाठी मला काही करायचं आहे...

गजाभाऊ : बापरे—ही एक्प्रेस डिलिव्हरी कसली! डबलफास्ट एक्स्प्रेस झाली ही! असला मोस्ट अर्जंट खलिता वाचून खरंच यायला निघतील ना वहिनी इकडे—

बाजीराव : तीच भीती आहे. म्हणूनच फोन लावीत होतो मी....

गजाभाऊ : तावडतोब लाव. आणि अजून इकडे यायला निघाल्या नसल्या तर निघू नका म्हणून सांगून टाक त्यांना.

बाजीराव : पण कारण काय सांगणार?

गजाभाऊ : काय वाटेल ते सांग—सांग, एकाएकी हार्ट फेल होऊन मी वारलो.

बाजीराव : कोण वारलं?

गजाभाऊ : मी म्हणजे तू.

बाजीराव : मी ?

गजाभाऊ : तू म्हणजे बेंड्या दुधाट.

बाजीराव : हां-हां. असं नीट सांग ना. आधीच माझ्या डोक्यात गोंधळ झालाय. (फोन उचलून) हलो ऑपरेटर, गिव्ह मी ट्रंक बुकिंग प्लीज.

गजाभाऊ : बापरे-माकडाला चढली भांग-त्यात चावला विंचू!

बाजीराव : ट्रंक बुकिंग ? हा यस. माझा नंबर ३०२; बॅाबेचा एक कॉल बुक करा.

गजाभाऊ : मोस्ट अर्जंट-एक्स्प्रेस-डबलएक्स्प्रेस कॉल.

बाजीराव : हो. अर्जंट कॉल, प्लीज. नंबर ५०६३१२. पी. पी. श्रीमती विमलाबाई पळपुटे.

[याच वेळी मागे योगिराज व रघुनाथ येऊन उभे]

योगिराज : हरि ओम् तत्सत्!

गजाभाऊ—
बाजीराव : } योगिराज!

योगिराज : बेटा रघुनाथ, प्रथम तो ट्रंक कॅन्सल करा.

रघुनाथ : (रिसीव्हर उचलून) हॅलो ऑपरेटर-ट्रंक बुकिंग प्लीज-ट्रंक बुकिंग? ३०२ हिअर. आत्ता बुक केलेला मुंबईचा कॉल कॅन्सल करा, प्लीज-काय? दोनदा कॅन्सल ?....माकडचेष्टा ? शट् अप्-डू युअर ड्यूटी....(रिसीव्हर आदळतो. त्या दोघांना) तुम्ही लोकांनी काय, मांडलंय काय हे ?

योगिराज : लेट मी हॅन्डल धीस, माय सन.

रघुनाथ : पण योगीराज, यांना मी इथं आणलंय. शेवटी त्यांच्या मूर्खपणाला जबाबदार तुम्ही मलाच धरणार.

योगिराज : ज्याच्या कर्माचं फळ शेवटी त्यालाच चाखावं लागतं. दुसऱ्याला नाही. ते मूर्खपणा करतील तर परिणामही तेच भोगतील. आम्ही यांच्याशी संवाद करतो तोपर्यंत तू बाजूला शवासन कर... शरीर आणि मनावरचा ताण आपोआप सैल होईल.

रघुनाथ : जशी आपली आज्ञा! (बाजूला जाऊन शवासन घालतो)

योगिराज : भ्रांत चित्ताला स्थिरता आणि श्रांत शरीराला विश्रांती मिळविण्याचा मार्ग म्हणजे शवासन असं हटयोगप्रदीपिकेत म्हटलेलं आहे. आजपासून तुम्ही

दोन्हेही दिवसातून तीन वेळा शवासन करीत चला.

**बाजीराव** : जशी आपली आज्ञा!

**योगिराज** : प्रोफेसर, आम्ही अजूनही तुमचं गतजीवनातलंच संबोधन वापरीत आहोत याचा अर्थ लक्षात यावा इतके तुम्ही बुद्धिमान आहात, ही गोष्ट आम्ही गृहीत धरतो. नवजीवन सुरू करताना गतजीवनाचे पाश संपूर्णतया तोडणं आवश्यक आहे. पाश जुने, घट्ट, अतूट असतात म्हणूनच सहजासहजी तुटत नाहीत ...यातना होतात....कष्टप्रद प्रयत्न करावे लागतात—तुटायला उशीर लागतो. क्वचित तुटणं अशक्यप्राय होऊन बसतं. पण मानवी जीवन-प्रवासातला एक अशक्य प्रवास शक्य करण्याच्या इच्छेनेच तुम्ही बुद्धिपुरःसर या नौकेत पाऊल ठेवलेलं आहे. आता किनाऱ्याचे दोरखंड तोडणं हे तुमचं कर्तव्य आहे. नव्हे जबाबदारी आहे....ज्या जागी जाण्याचं धाडस क्वचितच कुणी करील, अशा जागी जाण्याचं धाडस तू केलंस तर, क्वचितच कुणाच्या हाती लागेल असं काही तुला गवसेल, असं गौतमबुद्धानं म्हटलेलं आहे; आणि आत्ता आम्ही तेच म्हणतो. आमच्या योग फॉर टुडे ॲण्ड टु-मॉरो या इंग्रजी ग्रंथात आम्ही म्हटलेलं आहे... इफ यु गो व्हेअर फ्यू हॅव गॉन.... (टेलिफोनची घंटा वाजते)

**बाजीराव** : घंटा वाजली....

**योगिराज** : यू वुइल फाइंड....

**बाजीराव** : योगिराज, घंटा वाजली.

**योगिराज** : यु वुइल फाइन्ड व्हॉट फ्यु हॅव फाऊंड....

[ रघुनाथ शवासन मोडून फोन घेतो. ]

**रघुनाथ** : हॅलो- योगाश्रम हिअर. हां - हां - होल्ड ऑन. योगिराज, ऑफिसचा फोन आहे.

**योगिराज** : (फोन घेतो) यस... हं- व्हू ? बंडा दुधाटे ? आश्रमात ? होल्ड ऑन (रघूकडे पाहात) व्हू इज धिस बंडा दुधाटे ? नेव्हर हर्ड ऑफ हिम...

[ बाजीराव व गजा चमकून एकमेकांकडे पाहातात. ]

**बाजीराव** : ओ- आय नो हिम.

**योगिराज** : व्हू द हेल इज ही ?

**बाजीराव** : माझा पूर्वाश्रमीचा मित्र.

योगिराज : त्याचा या आश्रमाशी काय संबंध ?

बाजीराव : न – नाही – म्हणजे—

योगिराज : त्याची चौकशी या आश्रमात होण्याचं काय कारण ?

बाजीराव : त्याची चौकशी ?

योगिराज : त्याला भेटण्यासाठी एक बाई आणि एक तरुण मुलगा आलेली आहेत. तो या आश्रमात आहे असं त्यांचं म्हणणं आहे.

गजाभाऊ, बाजीराव : हरे राम ! ( दोघेही मटकन् बसतात. )

रघुनाथ : प्रोफेसर, ही काय भानगड आहे ? बंड्या दुधाट तिकडे हाँगकाँगमध्ये आहे. त्याचा शोध करीत इथे कोण आलं ? का आलं ?

योगिराज : रघुनाथ, शवासन. ( तो वैतागून शवासन करतो. ) हॅलो—तू स्वतः त्या दोघांना घेऊन आश्रमात ये. त्यांना बाहेरच्या वेटिंगरूममध्ये बसव.... रघुनाथ !

रघुनाथ : योगिराज–

योगिराज : वेटिंगरूममध्ये जाऊन थांब. त्या दोघांना तिथेच आणायला सांगितलंय आम्ही. त्यांच्यावर सक्त नजर ठेव. आमची आज्ञा होईपर्यंत त्यांना हालू देऊ नकोस तिथून.

रघुनाथ : जशी आपली आज्ञा. ( रघू जातो )

योगिराज : ( फोन ठेवतो ) व्हॉट इज द मीनिंग ऑफ ऑल धिस, प्रोफेसर ? ती दोघे कोण आहेत ?

बाजीराव : म – माझी बायको आणि मुलगा.

योगिराज : गुड हेवन्स ! तुम्ही त्यांना इथे बोलवून घेतलंत ? तुम्ही जिवंत आहात हे कळलंय त्यांना ? यू– यू– ( संतापाने थरथरत ) आय वुइल किल यू ! आय वुइल– आय वुइल—

बाजीराव : प्लीज– प्लीज– योगिराज– तुम्ही दोन मिनिटं शवासन करा. नंतर मी तुम्हाला सगळं समजावून सांगतो.

योगिराज : आय वुइल स्ट्रॅन्गल यू ! आय वुइल ईट यू !

बाजीराव : योगिराज.... शवासन...

योगिराज : हेल वुइथ शवासन ! आय वुइल...

म. श्री. सं. ठाणे, वाचनालय ठाणे.
प्र. क्र. 20602 नों. दि ..................

बाजीराव : योगिराज, तुम्ही उगीच संतापताय. त्यांना काहीही माहीत नाही. मी मेलोय याच समजुतीत आहेत ती.

योगिराज : मग ती इथे कशासाठी आली?

बाजीराव : मीच बंड्या दुधाटच्या नावानं पत्र लिहिलं आणि त्यांना बोलवून घेतलं. ती भेटायला आली ते बंड्या दुधाटला.

योगिराज : म्हणजे तुम्हालाच.

बाजीराव : हो. पण मी त्यांना भेटणार होतो तो बंड्या दुधाट म्हणूनच.

योगिराज : आणि त्यांनी तुम्हाला ओळखलं असतं म्हणजे?

बाजीराव : हायूली इम्प्रॉबेबल! मी वारलो ही गोष्ट आता गृहीत धरली गेलेली आहे; शिवाय माझा कायापालट झालेला आहे.

योगिराज : पण ती तुमची बायको आहे!

बाजीराव : म्हणूनच तिनं ओळखण्याची शक्यता नाही. बायका जिवंत नवऱ्याला धड ओळखत नाहीत... मेलेल्या नवऱ्याला काय ओळखणार!

योगिराज : हं– हं– देअर इज सम सेन्स इन दॅट. आणि मुलगा?

बाजीराव : त्याचा प्रश्नच सोडा. अहो, स्वतःची स्वतःला ओळख नाही त्याला.... तो बापाला ओळखील?

योगिराज : (डोळे मिटीत) हरि ओम् तत्सत्!

बाजीराव : योगिराज.... असे एकदम समाधिस्थ होऊ नका.... माझी एक विनंती ऐका.... मला फक्त एकदा– फक्त एकदाच त्यांना भेटू द्या... मी माझी ओळख त्यांना देणार नाही... मला फक्त त्यांचे चार शब्द ऐकायचेत– त्यांना डोळ्यांनी पाहायचंय– माझं मन खंबीर आहे... बाकी सगळे साखळदंड... पण हे रेशमाचे धागे आहेत.... तुटता तुटत नाहीत. ही भेट झाल्यावर तेही तोडीन मी... खरंच तोडीन. वर्ड ऑफ ऑनर योगिराज– योगिराज—

योगिराज : (डोळे उघडीत) हरि ओम् तत्सत्! जन्टलमेन, केअरफुली लिसन टु व्हॉट आय से... प्रोफेसर, तुमची नवजीवनाची पूर्वतयारी पूर्ण झालेली आहे– शारीरिक तयारीबद्दल आम्ही बोलत आहोत. मानसिक तयारी करणं केवळ तुमच्या हाती आहे. तुम्हाला अभिनेता म्हणून प्रस्थापित करण्याची सर्व व्यवस्था झालेली आहे. आजचे आघाडीचे नाटककार प्रा. वसंत कानेटकर यांचं नवं नाटक आम्ही मिळवलेलं आहे... दिग्दर्शनाची जबाबदारी पुरुषोत्तम

दारव्हेकर यांच्याकडे सोपवलेली आहे ..प्रमुख भूमिका तुम्ही. अन्य भूमिकांची निवड दिग्दर्शक करतील. तुमची मानसिक तयारी समाधानकारक वाटताच तालमी—जाहिरात वगैरे आवश्यक गोष्टी केल्या जातील.

**योगिराज** : आता मिस्टर गजानन, तुमच्या बाबतीत. आजपर्यंत अत्यंत विवेकानं आम्ही कायापालटाबाबत तुमचा मूर्ख हट्टवादीपणा चालवून घेतला. आज ना उद्या तुमच्या डोक्यात प्रकाश पडेल या आशेनं. आता तुम्हाला निर्वाणीची सूचना देत आहोत. तुम्ही स्वखुषीने सहकार्य देणार नसलात तर तुमच्यावर बलप्रयोग केला जाईल. दुर्दैवानं, बलप्रयोगाचाही उपयोग झाला नाही, तर केवळ नाइलाजानं तुमचं अस्तित्व आम्हाला नष्ट करावं लागेल !

**गजाभाऊ** : योगिराज– आपण खुनाची धमकी देता आहात.

**योगिराज** : त्यजेदेकं कुलस्यार्थे, ग्रामस्यार्थे कुलं त्यजेत् ।
ग्रामम् जनपदस्यार्थे, आत्मार्थे पृथिवीं त्यजेत् ॥

माझ्या या प्रयोगामागे अनेक वर्षांचा अविश्रांत उद्योग—चिंतन आणि पाण्यासारखा पैसा, किंबहुना आमचं सर्वस्व पणाला लावून आम्ही उभे आहोत. भविष्यातल्या फार मोठ्या गोष्टी या प्रयोगाच्या यशावर अवलंबून आहेत. तुमच्यासारख्या एका क्षुद्र निर्बल मनाच्या माणसाच्या हट्टवादीपणामुळे आमच्या पूर्ण यशाला बाधा येत असेल, तर हा अपयशाचा जिवंत पुरावा समूळ नष्ट करण्याशिवाय आम्हाला गत्यंतर नाही ! या क्षणापासून तुम्ही दोघेही या आश्रमात नजरकैदेत आहात....आमच्या सेवकांची तुमच्यावर सक्त नजर राहील. आश्रमाबाहेर पाऊलही टाकण्याचा प्रयत्न केलात तर ते पाऊल मृत्युमुखातच पडेल याबद्दल निःशंक असा !'

**गजाभाऊ** : हा म्हणजे अगदी जुल्म झाला.

**योगिराज** : फक्त तुमच्या आणि आमच्या हितासाठी. प्रोफेसर, तुमच्या पत्नीला आणि मुलाला तुम्ही भेटू शकता. फक्त एकाच अटीवर. त्या क्षणापासून ती दोघेही या आश्रमात नजरकैदेत राहातील.

**बाजीराव** : व्हॉट ?

**योगिराज** : प्रयोग संपूर्ण यशस्वी होताच आम्ही भारत कायमचं सोडणार आहोत. त्यावेळी त्यांना सुखरूप त्यांच्या घरी पोचविण्यात येईल.

**बाजीराव** : पण–

योगिराज : शब्दच्छळ नको. एका शब्दात उत्तर द्या. त्यांना आता पाठवू की नको ?

बाजीराव : बट आय से...

योगिराज : हरि ओम् तत्सत् ! ( उठून जाऊ लागतो )

बाजीराव : योगिराज–

योगिराज : यस् ?

बाजीराव : पाठवा त्यांना आत....

योगिराज : तथास्तु ! तुमच्या कायापालटाची कसोटी लागेल. मन स्थिर ठेवा. एक चुकीचा शब्द तुमच्या सर्वनाशाला कारणीभूत होईल ! बिअर इन माइंड, यू आर बिइंग व्हिजिलियंटली वॉच्ड ! ( जातो )

गजाभाऊ : महामूर्खा, काय केलंस हे ?

बाजीराव : जे मनानं सांगितलं ते केलं. ओबेड द इंस्टिंक्ट–दॅटस ऑल.

गजाभाऊ : मी जातो. ( घाईने जाऊ लागतो. )

बाजीराव : गजा, थांब. डोंट डेझर्ट मी. मॉरल सपोर्टची मला या क्षणाला अत्यंत गरज आहे.

गजाभाऊ : गधड्या, वहिनी ओळखतील ना– त्याचं काय ? तुझा कायापालट झालाय– पण माझा ? मी जातो. ( घाईने निघून जातो. )

बाजीराव : हेल्प मी–हेल्प मी. ओ गॉड, गिव्ह मी करेज– शांताकारं भुजगशयनं पद्मनाभम्....

[ जयंत व विमलाबाई प्रवेश करतात. जयन्त पूर्वीचाच. पण विमलाबाई मात्र बदललेली आहे. मलूल–भकास चेहरा, शून्य दृष्टी. जयंत हाताला धरून तिला घेऊन येतो. प्राध्यापक जागच्या जागी खिळून जातात. जयंत पुढे येतो. विमलाबाई यंत्राप्रमाणे येऊन बाजूला उभी राहाते. ]

जयंत : एक्स्क्यूज मी–हॉंगकॉंगहून आलेले मिस्टर बळवंत दुधाट–

बाजीराव : अं ?

जयंत : हॉंगकॉंगचे मिस्टर बळवंत दुधाट–

बाजीराव : हो मीच.

जयंत : प्लीज्ड टु सी यू ! मायसेल्फ इज जयंत पळपुटे... ( स्टाइलीत शेकहॅंड करतो ) व्हेरी व्हेरी प्लीज्ड टु सी यू. मीट माय मॉम विमलाबाई पळपुटे– द

लेट वाइफ ऑफ द प्रोफेसर....

**बाजीराव :** द लेट वाइफ ?

**जयंत :** ओ, आय मीन, द वाइफ ऑफ द लेट प्रोफेसर. स्लिप ऑफ टंग, यू नो. ( हसतो )

**बाजीराव :** आपण मराठीत बोललात तरी मला समजेल.

**जयंत :** इटस् ओ. के. विइथ मी. आपलं पत्र मिळालं. मॉमच्या नावावर होतं.... पण मीच फोडलं.

**बाजीराव :** तुम्हीच फोडलंत ?

**जयंत :** हो. म्हणजे सर्व पत्रं हल्ली मीच फोडतो. नाही....तशी दुसऱ्यांची पत्रं फोडून वाचण्याची रॉटन सवय नाही मला. पण त्याचं काय झालंय, की मॉम हल्ली—( प्रोफेसर आणि विमलाबाई एकमेकांकडे रोखून पाहात असतात. जयंतच्या ते लक्षात येतं. तो बोलायचा थांबतो. ) अंकल....

**बाजीराव :** अं ?

**जयंत :** तुम्हाला अंकल म्हटलं तर चालेल ना, अंकल ?

**बाजीराव :** हं.

**जयंत :** अंकल, तुम्ही थोडे नर्व्हस दिसताय.

**बाजीराव :** या– या माझ्याकडे रोखून पाहाताहेत सारख्या....

**जयंत :** कोण ? मॉम ? ओ नो, डोंट वरी. ती तुमच्याकडे नाही पाहात.

**बाजीराव :** माझ्याकडे पाहात नाही ?

**जयंत :** म्हणजे पाहाते तुमच्याकडेच पण ' तुमच्याकडे ' पाहात नाही.

**बाजीराव :** म्हणजे ?

**जयंत :** म्हणजे दृष्टी तुमच्याकडे आहे, पण तुम्ही दिसत नाही तिला.

**बाजीराव :** ओ गॉड– म्हणजे यांची दृष्टी....

**जयंत :** ओ नो. दृष्टी गेली नाही. दृष्टी आहे. पण दृष्टीचा अर्थ गेलाय.

**बाजीराव :** म्हणजे ?

**जयंत :** म्हणजे आता मॉम तुमच्याकडे पाहाते आहे ना, तरी तिची दृष्टी तुमच्यावर आहे असं नाही. कुठंतरी शून्यात आहे. एकदा एका दिशेला पाहायला लागली ना, की तासभर त्याच दिशेला पाहात राहील. म्हणजे उगीचच्या उगीच. तुम्ही नर्व्हस होऊ नका उगीच. ( विमलाबाईला ) मॉम,

प्लीज, जरा तू अशी बस हं.... आणि आता त्या कोपऱ्यात पाहा (तिला तशी बसवतो) दॅटस इट (प्रोफेसरला) आता तासभर तिकडेच...(आईला) मॉम, बी कंफर्टेबल हां. (प्रोफेसरकडे) ह्यः! आमचे डॅडी साले ग्रेटच!

बाजीराव : का?

जयंत : आयला, एकदम वारले हो!

बाजीराव : हां हां—वारले म्हणून ग्रेट?

जयंत : अहो, वारून वारायचं ते चारचौघांसारखं वारायचं की नाही? समुद्रात जाऊन पालथे पडले. पोहायलासुद्धा येत नव्हतं त्यांना.

बाजीराव : समुद्रात पोहायला नव्हते गेले ते. जीव द्यायला गेले होते.

जयंत : अहो, पोहता येत असतं तर जीव गेलाच नसता मुळी. हातपाय हालवले नसते तरी तरंगले असते. पण नाही. मी हजार वेळा त्यांना म्हणालो—डॅडी, पोहायला शिका; पोहायला शिका. ऐकलं नाही. उलट, मी शिकलो तर.... माझ्यावरच उखडले...'पाण्यात बुडून मरायचंय का?' आणि स्वतः काय केलं? हे साले सगळे वडील लोक असेच. होपलेस! स्वतः सगळं करायला पाहिजे. पण आम्ही थोडं काही केलं की बोंबाबोंब....अंकल, जगातल्या सगळ्याच बापलोकांचं गाठोडं बांधलं आणि समुद्रात नेऊन बुडवलं तर काय होईल हो?

बाजीराव : काय होईल— जगाचं कल्याणच होईल.

जयंत : दॅट्स् इट. जगाचं कल्याण होईल; पण समुद्रातल्या बिचाऱ्या माशांचं काय? फूड पॉयझन होऊन मरतील ना पटापट! गाढव साले!

बाजीराव : कोण गाढव साले? समुद्रातले मासे?

जयंत : हे सगळे बापलोक हो....

बाजीराव : तुमच्यासारखे कुलदीपक जन्माला घालण्याचा गाढवपणा केला तेव्हा त्यांना हीच शिक्षा योग्य!

जयंत : स्वतः जीव देऊन मेले. त्यांनी जीव दिल्यापासून मॉम ही अशी झाली. आणि आमचा वाजलाय बोऱ्या. साला वैताग फुकट! [प्रोफेसर दीर्घ निःश्वास सोडून मान खाली घालतो.] डॅडींनी ऑथेल्लो करून टाकलाय माझा! टु बी ऑर नॉट टु बी!

बाजीराव : ऑथेल्लो नाही—हॅम्लेट.

जयंत : तोच तो. व्हूएव्हर द भंकस फेलो ही इज.

बाजीराव : आपण स्वच्छ मराठीत बोललात तर जास्त आवडेल मला.

जयंत : ओ सॉरी. बाप इंग्रजीचे प्रोफेसर होते ना आमचे! गुण नाही पण वाण लागलाय. मराठी मदर टंग असली तरी इंग्रजी फादर टंग आहे आमची....

बाजीराव : म्हणूनच आपल्या वडलांनी जीव दिलाय! पण आई आहे अजून. मदर टंगमधेच बोललात तर ते वस्तुस्थितीलाही जास्त धरून होईल. आपलं काय मत आहे?

जयंत : अंकल, मघापासून पाहातोय, तुम्ही मला चक्क आहोजाहो म्हणताय! तुम्ही–आपण–आपलं त्यापेक्षा एकवचनातच–

बाजीराव : मुद्दाम बहुवचन वापरतोय मी. आदरार्थी बहुवचन.

जयंत : मेलो. आदरार्थी बहुवचन. आमचे वडील करायचे आमचा असा आदर-सत्कार. पण बाय गॉड, अंकल, ते असं आदरार्थी बहुवचनात बोलायला लागले ना, की पॅंटमध्ये गांधीलमाशी शिरल्यासारखं व्हायचं...मला. त्यांनी या चिरंजीव म्हटलं की एक ठणका. जा चिरंजीव म्हटलं की दुसरा ठणका. घरातल्या घरात ठीक आहे; पण चारचौघात सुद्धा हेच. गांधीलमाशी कधी निघाली नाही. आणि मलाही चारचौघांत पॅंट काढून कधी ती झटकता आली नाही.

बाजीराव : आता निघाली ना? कटकट गेली एकदाची.

जयंत : हो. पण कटकटीबरोबर तेही गेले ना! आणि गेले ते धड नाही गेले. आमच्या बोकांडावर हजार गांधीलमाशांचं बोचकं टाकून गेले! नाच लेका आता किती नाचतोस ते! (प्रोफेसर मुकाट्याने उठून विमलाबाईकडे जाऊ लागतो.) का–आमची कर्मकटकट ऐकून वैतागलात वाटतं?

बाजीराव : नाही. आपली काही हरकत नसेल तर थोडं यांच्याशी बोलेन म्हणतो.

जयंत : आयला – अंकल, तुमची बोलायची स्टाइलही एकदम आमच्या तीर्थ-रूपांच्या सारखीच आहे! आपली काही हरकत नसेल तर – वगैरे....

बाजीराव : फार जिवाभावाचे मित्र होतो ना आम्ही. वाण नाही पण गुण लागला. (वळतो.)

जयंत : अंकल, मॉमशी बोलण्याच्या भानगडीत पडू नका. काही उपयोग नाही. ...तुम्ही माझ्याशी बोला. मी आहे ना.

बाजीराव : यांच्याशी बोलू नको का?

जयंत : ती तुमच्याशी बोलणार नाही.

बाजीराव : माझ्याशी बोलणार नाही ? का ?

जयंत : आता का ! डॅडी गेल्यापासून मॉमनं बोलायचंच सोडलंय. म्हणजे तसं बोलते. लहर लागली तर दोनदोन तास बोलतच राहते. मग एकदम गप्प की गप्पच. एकदा हसायला लागली की हसतच राहते. एकदा रडायला लागली की रडतच राहते. राग आला तर कपबशा फोडते...एकदा तर घासलेटच ओतून घेतलं अंगावर...नशीब, कपड्यांची पेटी हिसकावून घेतली मी वेळीच...

बाजीराव : ओ गॉड, ओ गॉड !

जयंत : अहो, आमच्या वडिलांची बातमी आली तेव्हा तर – बापरे ! नॉर्मली नवरा मेला तर बायका रडतात ना, पण ही रडली नाही. अजिबात पाण्याचा थेंब नाही डोळ्यांत. नुसती तारवटलेल्या डोळ्यांनी कुणीकडे तरी पाहातच राहिली अर्धा तास. आणि मग एकदम स्फोट झाला.... संताप– संताप–नुसता संताप. डॅडींना काय तोंडाला येईल ते म्हणाली. भेकड – पळपुटे – नामर्द ! नुसता भडिमार ! ते सगळं ऐकायला डॅडी असते ना, तर दुसऱ्यांदा जाऊन जीव दिला असता त्यांनी. अहो, मी सुद्धा ते सगळं पाहून रडायचं विसरलो तर...

बाजीराव : आपण रडलात ? आश्चर्य आहे !

जयंत : रडलो म्हणजे काय ? रडलोच. एकुलता एक बाप वारल्यावर रडायला नको ?

बाजीराव : दोन अश्रू बापाच्या नावानं ढाळलेत हे बरं केलंत. त्याच्या आत्म्याला तेवढंच समाधान वाटेल.

जयंत : छे – छे – समाधान वाटायचं काही कारण नाही. रडलो म्हणजे काय, रडू आलं म्हणून रडलो. पण ते तेवढ्यापुरतं तेवढं. अंकल, गैरसमज करून घेऊ नका. पण खोटं बोलायला आपल्याला आवडत नाही म्हणून खरं सांगतो. डॅडी गेले, दुःखाचा पहिला भर ओसरला आणि मनातल्या मनात रिलीफच वाटला मला. एकदम पिंजरा उघडा पडल्यावर पाखराला वाटत असावा तसा रिलीफ.

[ प्रोफेसर पाहातच राहतो ]

आमचे डॅडी तसे चारचौघांसारखेच होते–मोस्ट ऑर्डिनरी. पण मला मात्र

त्यांची भीती वाटायची. थोडा आदरही वाटायचा. पण प्रेम ? ऊं हूं !

बाजीराव : कधीच प्रेम वाटलं नाही तुम्हांला त्यांच्याबद्दल ?

जयंत : लहानपणचं टाऊक नाही. पण मोठा झाल्यापासून फक्त भीती–थोडा आदर. पण आयला ! गंमत पाहा कशी. अगदी शेवटच्या दिवशी मात्र एकदम फार प्रेम वाटलं हं मला डॅडींबद्दल. मॉमनं सांगितलं. डॅडींनीही मॅट्रिकला अल्जिब्र्याचा पेपर कोरा दिला. कोरा म्हणजे कोरा नाही, पण अल्जिब्र्यावर निबंध लिहून. एक पेपर आणि तीन सप्लीमेंट्स्. जस्ट इमॅजिन. अल्जिब्र्याच्या पेपरात इंग्रजीत निबंध ! अल्जिब्रा इज नॉट अ झीब्रा बट अ कोब्रा टु मी. आयला ! बाय गॉड, आपण फिदा झालो एकदम डॅडींवर त्या दिवशी. माझ्यातलं आणि डॅडीतलं अंतर एकदम कमी झालं. माझ्यासारखेच रक्तामांसाचे डॅडी वाटायला लागले मला ते.

बाजीराव : आणि नेमके त्याच वेळीं ते गेले.

जयंत : हो ना. तसं व्हायला नको होतं. तसं व्हायला नको होतं. डॅडी जायला नको होते. ( डोळे पाणावल्यासारखे होतात. )

बाजीराव : जयंत, अरे तुझ्या डोळ्यांत पाणी पाहातोय मी ?

जयंत : एकेरीवर आलात. जवळ आलात. अंकल, असं व्हायला नको होतं. नको होतं....

बाजीराव : व्हायला नको होतं ते झालं ! पण तसं का झालं यावर कधी विचार केलास शांत बसून तू ?

जयंत : आता काय झालं ? अंकल, माझ्याबद्दल तुमचं काय मत झालंय ?

बाजीराव : मी – मी आताच पाहातोय तुला....

जयंत : पण शितावरूनसुद्धा भाताची परीक्षा करता येते. मी अगदी टाकाऊ – बेजबाबदार – मूर्ख – दुष्ट – वाईट मुलगा आहे असं वाटलं तुम्हाला ? [ तो गप्प ] समजा, तुम्ही माझे डॅडी असता तर मला कसं वागवलं असतंत ?

बाजीराव : तुझ्या डॅडींनी वागवलं असेल तसंच !

जयंत : डॅडींना कधीपासून ओळखता तुम्ही ?

बाजीराव : तुझ्या जन्माच्या आधीपासून. किंबहुना त्याच्या जन्मापासून.

जयंत : म्हणजे तुम्ही बूझम फ्रेंड....आणि तुम्हाला मुलं किती ?

बाजीराव : दोन...एक मुलगी, एक मुलगा.

जयंत : मग करेक्ट. तुम्ही डॅडींसारखेच वागणार! आयला! सगळे बाप सारखेच....

बाजीराव : ते जाऊ दे. मीना काय म्हणते?

जयंत : ती काय म्हणणार? फॅक्टरी घालून बसली आहे.

बाजीराव : फॅक्टरी?

जयंत : दि पंजाब महाराष्ट्र को–ऑपरेटिव्ह फॅक्टरी. पहिलंच प्रॉडक्शन असं दण-दणीत झालं की डोळे पांढरे होऊन गेले सगळ्यांचे....

बाजीराव : म्हणजे?

जयंत : पहिले छूट एकदम जुळं झालं!

बाजीराव : जुळं?

जयंत : ती गरोदर होती तेव्हाच मी मॉमला सांगितलं होतं की असं काहीतरी होणार! फुगली होती केवढी मिनी! एकदम डब्बल डेकर बस!

बाजीराव : सगळं व्यवस्थित पार पडलं ना? काही त्रास वगैरे झाला नाही ना तिला?

जयंत : आयला! तिला कसला आलाय त्रास? त्रास झाला मला...

बाजीराव : तुला?

जयंत : मग? दहा दिवस दवाखान्यात खेट्या मारायला दुसरं कोण होतं? अमुक आण – तमुक घेऊन जा. साला वैताग फुकट. शेवटी शेवटी तर वाटायला लागलं, मिनीच्या ऐवजी मलाच जुळं झालं असतं तरी परवडलं असतं. दहा दिवस आरामात खाटेवर पडून तरी राहाता आलं असतं. साली या पोरींची मजा असते. मनात येईल तिथपर्यंत शिकावं; नाहीतर एखादा सरदारजी गाठून त्याच्याबरोबर पळून जावं. लग्न होईपर्यंत आईबाप जपतात. लग्न झाल्यावर सरदारजी जपतो. मधल्या बाळंतपणातली हमाली करायला आमच्यासारखे भाऊ आहेतच!

बाजीराव : जयंत—

जयंत : हंऽऽ चलता है! अपना तकदीर ही ऐसा है! बरं अंकल, एखाद्या बऱ्या-पैकी हॉटेलचं नाव सांगा. रूम बुक करून घेतो.

बाजीराव : छे छे—हॉटेल कशाला. मी बोलवलंय ना तुम्हाला. माझे पाहुणे आहात तुम्ही. इथंच व्यवस्था केलेली आहे...तुमची.

जयंत : ओ. के. कुठे केली आहे व्यवस्था ?

बाजीराव : आश्रमाच्या आवारातच. फक्त मी योगिराजांना विचारून जागा निश्चित करतो. तोपर्यंत वाटल्यास तू थोडा पाय मोकळा करून ये.

जयंत : शुअर—पण मॉम—

बाजीराव : त्यांना बसू दे इथेच.

जयंत : पण ती—

बाजीराव : मी आहे. काही काळजी करू नकोस.

जयंत : ओ. के. डोकं सणकलंच आहे. मोकळ्या हवेत थोडं थंड तरी होईल.

बाजीराव : पण आश्रमाच्या आवाराबाहेर जाऊ नकोस. आवार खूप मोठे आहे. आतल्या आतच फीर.

जयंत : हं. ( जायला निघतो. थांबतो. ) मॉम, मी जरा राउंड मारून येतो. तू बैस इथेच. अंकल आहेत हं. ( जातो )

[क्षणभर शांतता. बाजीराव जयंत गेलेल्या दिशेने पाहात असतो. मग एकदम—]

बाजीराव : विमल, मला वाटलं तितका हा जयंत— ( एकदम थांबतो. 'विमल' हा शब्दोच्चार होताच विमलनं श्वास रोखलेला आहे. ) माफ करा विमलाबाई. चुकून एकेरी नावानं हाक मारली तुम्हाला. म्हणजे मी जरा गोंधळून गेलोय.

विमल : ( दृष्टी त्याच्याकडे स्थिर— पण शून्य ) गोंधळून गेलाय ?

बाजीराव : मन ताळ्यावर नाही माझं.

विमल : मन ताळ्यावर नाही ? ( उगाच मंद हसते. )

बाजीराव : हे पाहा; प्लीज, तुम्ही अशा हसू नका.

विमल : मी हसते आहे ? ( किंचित् मोठ्यानं हसते. )

बाजीराव : पाहा, पुन्हा हसता आहात तुम्ही.

विमल : पुन्हा हसते आहे ? ( खळखळून हसते. मग एकदम गंभीर होते. ) का हसते मी ? हसण्यासारखं काय उरलंय आता ?...खरं म्हणजे रडायला हवं मला—ऊर फुटेपर्यंत रडायला हवं ... पण रडायला जाते आणि हसू फुटतं ...असं का होतं ?...शरीरातला कण न् कण रडतोय—टाहो फोडून रडतोय....पण डोळ्यांत मात्र पाण्याचा थेंब नाही.... रडू येतच नाही— म्हणून हसते. ( मंद स्मित )

बाजीराव : अशा हसू नका. प्लीज, अशा हसू नका. तुमचं हसणंही रडण्यापेक्षा भयंकर वाटतंय मला !

विमल : मग रडू ? खोटं, खोटं ? नाटकात रडतात तसं ?

बाजीराव : नाही– तसं नाही– माझ्या म्हणण्याचा अर्थ....

विमल : कळला मला. मी मोठ्यांदा हंबरडा फोडून रडल्याशिवाय...गरजल्याशिवाय, माझा नवरा मेलाय, हे समजणार नाही तुम्हाला! मी विधवा झाले याचं खरंच दुःख होतंय मला, याची खात्री पटणार नाही तुमची....खरं ना ?

बाजीराव : ओ गॉड .. तसं नाही– तसं नाही.

विमल : तसंच आहे. मोठा गोंगाट केला, तरच जगाला तुमचं दुःख खरं वाटतं! हे गेल्याची बातमी आली तरी, का कुणाला ठाऊक, माझ्या डोळ्यांतून पाण्याचा थेंब आला नाही की तोंडातून हुंदका बाहेर पडला नाही! म्हणजे रडावंसं वाटलं नाही असं नाही– पण रडू येतच नव्हतं. खरं म्हणजे असं वाटलं की आता रडण्याला, हसण्याला, जगण्याला कशाला काही अर्थच उरलेला नाही... सगळं निरर्थक– शून्य! पण शेजारणीपाजारणी काय म्हणाल्या माहीत आहे! 'काय हो बाई– एवढा नवरा मेला तरी डोळ्यांत पाण्याचा थेंब नाही! अगदी दगडाच्या काळजाची हो! असली उलट्या काळजाची बायको असल्यावर का नाही नवरा जीव देणार!' (हसते)

बाजीराव : पाहा— पाहा; पुन्हा हसायला लागलात तुम्ही –

विमल : हसू नको ? ठीक आहे. निर्जीव पुतळ्यासारखी बसून राहते अशी — (त्याच्याकडे रोखून पाहात बसते.)

बाजीराव : प्लीज फॉर हेवन्स सेक, तुम्ही अशा रोखूनही पाहू नका माझ्याकडे.

विमल : मी कुठे तुमच्याकडे रोखून पाहते आहे ?

बाजीराव : नाही—मलाच तसं वाटतंय—म्हणजे काहीतरी असं भयंकर.

विमल : तुम्हाला भयंकर वाटतं म्हणून तुमच्याकडे पाहू नको ?

बाजीराव : अं ? हो—

विमल : तुम्हाला भयंकर वाटतं म्हणून हसू नको ?

बाजीराव : हो. नका हसू.

विमल : तुम्हाला भयंकर वाटतं म्हणून रडूही नको ?

बाजीराव : नको.

विमल : श्वास तरी घेऊ ना ?

बाजीराव : नको—अं ? नाही—श्वास घ्या. श्वास घ्या.—माफ करा विमलाबाई.

मी जरासा गोंधळून गेलोय.

विमल : जरासे गोंधळून गेलाय ?

बाजीराव : जरासा म्हणजे खूपच.

विमल : का ?

बाजीराव : खरं म्हणजे हादरूनच गेलोय.

विमल : का ?

बाजीराव : का ते आता काय सांगू मी ? कोणत्या शब्दांत सांगू ? अशा वेळी सगळे शब्द कोते, निरर्थक वाटायला लागतात... विमलाबाई, मघाशी जयंत म्हणाला ना तसंच —अगदी तसंच वाटलंय मलाही.

विमल : काय म्हणाला मघाशी जयंत ?

बाजीराव : असं व्हायला नको होतं—असं व्हायला नको होतं.

विमल : असं म्हणजे कसं व्हायला नको होतं ?

बाजीराव : म्हणजे बाजीरावानं आत्महत्या करायला नको होती.

विमल : हं, व्हायला नको होतं पण ते झालं. झालं ते चांगलंच झालं. ज्याला जगण्याचं धाडस नाही त्यानं मरायलाच हवं. ते सोपं असतं. लढण्यापेक्षा पळून जाणं सोपं. तुम्हालासुद्धा फार गोंधळल्यासारखं होत असेल ना, तर इथे थांबू नका. माझं ऐका–पळून जा. ते सोपं. फार फार सोपं.

बाजीराव : मरण ही चूक अशी आहे विमलाबाई, की जी एकदाच माणसाच्या हातून होऊ शकते. आणि झाली की ती सुधारूनही घेता येत नाही. इच्छा असली तरी हातात काही राहात नाही. मागाहून, उगीच मेलो, असा कितीही पश्चात्ताप झाला तरी त्याचा काही उपयोग नसतो. व्हाट इज डन, क्यान नॉट बी अनडन.

विमल : छे छे. चूक सुधारू नका–ती सुधारण्याची इच्छा देखील मनात आणू नका. पश्चात्ताप तर मुळीच नको. हे सगळं फार अवघड असतं. फार फार अवघड असतं. तुम्ही फक्त पळून जा. पळून जाणं अवघड नाही. सोपं. खूप सोपं. एकदम एके दिवशी उठायचं. आणि पळून जायचं. बायकोला सांगायचं नाही–मुलांना सांगायचं नाही– कुण्णा कुण्णाला सांगायचं नाही. गुपचुप उठायचं आणि पळून जायचं. पाठीला पाय लावून धूम पळत सुटायचं. सारखं पळत राहायचं. बस ! आणि पळून कुठं जायचं सांगू ? हे गेले ना तिथे

समुद्राच्या तळाशी. तिथे जाऊन लपून बसायचं. तिथे संसाराचा ताप नाही.... बायकोची कटकट नाही....पोरांचा वैताग नाही.. काही नाही की काही नाही!

**बाजीराव :** काही नाही–खरंच, खरंच तिथे काहीही नाही.

**विमल :** सगळं शांत–निवांत–थंड–शून्य–बर्फाचं कवच असलेलं शून्य–थडग्या-सारखं! म्हणूनच हे तिथे गेले. शेवटच्या पत्रात लिहिलंय त्यांनी मला तसं– संसाराचा ताप – बायकोची कटकट – पोरांचा वैताग! भ्याड – नामर्द, षंढ! पुरुषासारखा पुरुष संसाराला भ्याला. एम. ए. झालेला माणूस, पण आड-गावच्या एका अशिक्षित बाईला जे समजलं ते याला नाही समजलं. बहिणाबाईची कविता ऐकलीय कधी? 'अगा संसार संसार, जसा तवा चुलीवर, आधी हाताला चटके, मग खाया मिळे भाकर'...पण हे चटक्यांना घाबरले–चटक्यांना घाबरले! (एकदम आठवण येऊन) हे गेल्याच्या तिसऱ्या चौथ्या दिवशी मी एक स्वप्न पाहिलं. तशी त्यानंतर रोजच स्वप्नं पडतात मला. पाहाते आणि सकाळी विसरून जाते. पण हे लक्षात राहिलं....एक प्रचंड वटवृक्ष – अक्राळविक्राळ – खूप पारंब्या – एक एक पारंबी म्हणजे एकएक वेगळा वृक्षच. अजस्र फांद्या – जगाच्या पसाऱ्यासारख्या पसरलेल्या – आणि पालवीचा घुमट आकाशाएवढा....कॉलिजमधे शिकत असताना वाचल्याचं आठवतंय मला – हे जगसुद्धा वटवृक्षासारखंच आहे. ऊर्ध्वमूल अधःशाख. मूळ वर, फांद्या खाली. तर तसा हा जगासारखा वटवृक्ष. या वृक्षाच्या पसाऱ्यात कुठे तरी कोपऱ्यात – एका फांदीवर पानाआड दडलेलं चिमणीचं घरटं. त्या घरट्यात एक चिमणा, एक चिमणी आणि त्यांची पिलं. वर तळपता सूर्य, पण घरट्यावर दाट पानांची शीतल छाया. मजेत चालला होता चिमणा–चिमणीचा संसार. निदान चिमणीला तसं वाटत होतं. आणि – एकदम वणवा पेटला. वणवा दूर होता – वटवृक्षाला स्पर्श होत नव्हता ज्वालेचा. पण दुरून येणारी झळ मात्र चटका देणारी होती. चिमणीला वाटलं, आपला निवारा भक्कम आहे....जंगलात वणवे पेटतच असतात. पेटतात तसे विझूनही जातात. रोजच्या वणव्याला काय घाबरायचं....पण चिमणा घाबरला. नुसत्या दुरून येणाऱ्या आगीच्या झळीला घाबरला. आणि भेदरून जो उडाला तो पाण्यात जाऊन बुडाला. चिमणी मात्र घरट्यातच राहिली. घाबरली नाही.... कुठे उडाली नाही ....पाण्यात बुडाली नाही....आगीनं भाजली नाही....तरी देखील करपून गेली.

बिनमरणानं मेली... जिवंत जळाली...पण आगीनं नाही जळाली....तिला पाण्यानं जाळली. तशी मी जळाले... तशी मी जळाले...मला पाण्याने जाळलं!
[ डोळ्यांतून टपटपा टिपं गळतात. तो काही बोलण्याचा प्रयत्न करतो. मग गप्प बसतो. ती एकदम ]
काहो, पाण्यात बुडताना फार त्रास झाला असेल ना?

बाजीराव : छे छे. मुळीच नाही.

विमल : अं?

बाजीराव : तुम्ही त्याची काळजी करीत बसू नका उगीच. त्रास वगैरे काही झाला नाही. [ ती विचित्र नजरेने त्याच्याकडे पाहू लागते. ती नजर लक्षात येताच ] नाही – त्रास झाला – तसा थोडासा त्रास झाला. पण त्यासाठी तुम्ही उगीच खंत करीत बसू नका. आधीच खूप मनस्ताप झालाय तुम्हाला. त्यात ही भर नको. मी सांगतो तुम्हाला – तुम्ही समजता तितका त्रास मुळीच झाला नाही.

विमल : ( विचित्र नजर कायम ) तुम्हाला कसं कळलं हो हे?

बाजीराव : ( गोंधळून ) मला? म – मला कसं कळणार? मला आपलं तसं वाटलं – उगीच – उगीच वाटलं – म्हणजे मला त्रास झाला नाही ना, म्हणून.

विमल : तुम्हाला पोहता येतं?

बाजीराव : नाही.

विमल : पाण्यात पडला होतात कधी?

बाजीराव : तसा पाय घसरून वगैरे पडलो अनेक वेळा – पण पाण्यात असं क्वचित.

विमल : पाण्यात पडून मेला होता?

बाजीराव : एकदाही नाही.

विमल : मग बुडणाऱ्याच्या यातना तुम्हाला कशा कळणार हो?

बाजीराव आपण कल्पना करू शकतो ना! पाण्याखाली गेल्यावर मिनिटभरात माणूस मरत असावा. म्हणजे आपल्याला यातना होताहेत हे कळायच्या आधीच तो मरत असावा. आणि पुढे एकदा मेला की मग यातना झाल्या काय आणि न झाल्या काय सारखंच—

विमल : पण त्या आधीचा तो एक मिनिट– साठ सेकंद... एक एक सेकंद एक-

एक तपासारखं वाटलं असेल. यांना तर पोहताही येत नव्हतं. दगडासारखे सरळ तळाशी गेले असतील. नाकातोंडात पाणी शिरलं असेल– ठसका लागला असेल....

**बाजीराव** : छे छे. ठसका बिसका काही नाही.

**विमल** : नाही कसा ? लागलाच असेल. नाकातोंडात पाणी शिरल्यावर ठसका नाही लागणार ?

**बाजीराव** : नॉर्मली लागेलही– पण....

**विमल** : नुसता ठसका नाही, जीव गुदमरला असेल– प्राण कासावीस झाले असतील– ब्रह्मांड आठवलं असेल !

**बाजीराव** : नाही हो–तसं काही एक...आता कसं सांगू तुम्हाला ?

**विमल** : काही सांगू नका. हे सगळं झालंच असलं पाहिजे...या साठ सेकंदाच्या यातना भोगल्याच असतील आणि शेवटी जीव सोडण्याआधी एक क्षण तरी त्यांना वाटलं असेल–आपण असं करायला नको होतं. ज्यांना भिऊन ज्यांना वैतागून आपण हे मरण जवळ केलं, त्या जगण्याच्या यातना असल्या मरणाच्या यातनांपेक्षा लॅाख लाखपटीनं जास्त सुसह्य होत्या–सुंदर होत्या !

**बाजीराव** : खरं आहे. अगदी खरं आहे.

**विमल** : तसं वाटणं हीच त्यांना शिक्षा. त्यांच्या अपराधाला दुसरी शिक्षा नाही !

**बाजीराव** : मघाशी जयंत म्हणाला, तुम्ही फारशा बोलत नाही. पण आता बोललात. फार काही बोललात. पण अर्थाचं बोललात. तो अर्थ कुणीतरी सांगायलाच हवा होता. एरव्ही आपण निरर्थकाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करतो आणि अर्थाचे अनर्थ होतात. आज तुम्ही बोललात....

**विमल** : हो बोलले–खूप दिवसांनी बोलले. पण फार बोलले का हो ? बोलले असेन. का कुणाला ठाऊक, आज बोलावंसं वाटलं. मनातलं सगळं भडाभडा ओकून टाकावंसं वाटलं....इतके दिवस शांत राहून सहन केलं सगळं....आज वाटलं बोलावं– नुसतं बोलू नये –ओरडावं.... टाहो फोडून ओरडावं.... खूप मोठा आवाज करावा....त्या आवाजानं तरी कुणी जागं होईल– कुणाची तरी काळझोप मोडेल – कुणाला मनातलं दुःख कळेल ! ( क्षणभर थांबून ) जगात खूप आवाज असतात; पण काही आवाज एकमेकांना ओळखतात. माझा आवाज ते ओळखतील. नक्की ओळखतील. ओळखतील ना ?

बाजीराव : ओळखतील. कदाचित ओळखलाही असेल....पण—पण त्याचा आवाज तुम्ही ओळखू शकाल ?

विमल : हो — शंभर मैलांवरूनसुद्धा ओळखेन.

बाजीराव : ( हसतो ) शंभर मैलांवरून ? बापरे ! इतक्या लांब ऐकू ,जाईल असं बोलायचं म्हणजे नुसत्या लाऊडस्पीकरनं भागणार नाही. वायरलेसच वापरावा लागेल त्याला !

विमल : ( हसून ) तसला वायरलेस नाही काही. मनाचा वायरलेस.

बाजीराव : हो. पण मनाच्या वायरलेसचीसुद्धा वेव्हलेंग्थ जमली पाहिजे. तरच स्टेशन लागतं. नाहीतर नुसती खडखड घडधड...

विमल : हो— नुसता खडखडाट— गोंगाट— निरर्थक गोंगाट. मधूनच दुरून कुठूनतरी एखादा शब्द येतो — कानांना आवाज ओळखीचा वाटतो. . पण मनाला ओळख पटत नाही. ( मधेच थांबून ) एक गंमत सांगू ? तुमचा आवाज ऐकला आणि वाटलं, त्यांचाच हा आवाज...पण आवाजासारखे आवाज पुष्कळ असतात.. तो नुसता गोंगाट....त्यांचा आवाज संपला....हवेत विरला.... पाण्यात विरघळला. असं का झालं ?...असं का झा झालं ?.... असं तुम्ही का केलंत ?

बाजीराव : मी ?

विमल : हो. तुम्ही—तुम्ही—तुम्ही ( भावनातिरेकानं थरथरते आहे )

बाजीराव : ( तिला सावरीत ) विमलाबाई— तुम्ही—

विमल : का केलंत असं —का केलंत—का केलंत ? भरल्या ताटावरून का उठून गेलात ? काय चुकलं आमचं म्हणून ही शिक्षा आम्हाला दिलीत ? असा काय मोठा अपराध केला होता आम्ही तुमचा ? नवराबायकोच्या छोट्या कुरबुरी काय संसारात होत नाहीत ? भांड्याला भांडं लागत नाही? मुलं नापास होत नाहीत ? मुली आईबापांच्या इच्छेविरुद्ध लग्न करीत नाहीत ? किती छोट्या गोष्टी...आणि त्यांची केवढी मोठी शिक्षा ही.... का केलंत हो असं — का केलंत ? [ मुसमुसून रडू लागते. तो खिळून गेल्यागत उभा आहे. ती शांत होते. ] क्षमा करा— वेड्यासारखं बोलले मी तुम्हाला. तुमचा काय दोष ? करणारा ,करून गेला....भोग मात्र आमच्या कपाळी आले... माझं मन असंच भरकटतं... कुणाला काय बोलावं याचं भानच राहात नाही.— म्हणून मी बोलत

नाही. आज बोलले – पण वेड्यासारखं बोलले. मला वेड लागलंय का हो ?

**बाजीराव** : नाही – नाही. वेड कशानं ?

**विमल** : हो. वेडच लागलंय मला. नाहीतर तुम्हाला विनाकारण असं बोलले नसते मी. तुमचा काय संबंध ? तुम्हाला बोलायचं कारणच नव्हतं काही. पण मुद्दाम नाही हो बोलले. माझं डोकंच भ्रमिष्ट झालंय. पण आता नाही बोलणार. एक शब्द नाही. एक–एक शब्द सुद्धा नाही. ( गप्प बसून राहाते )

**बाजीराव** : काही–नाही. बोलत राहा. हे सगळं कुणीतरी बोलायलाच पाहिजे. हा आरसा कुणीतरी तोंडासमोर धरायलाच पाहिजे. त्याशिवाय आपण गाढव असल्याचं लक्षात येत नाही माणसाच्या !

[ ती गप्पच ]

मी–मी – आता काय बोलू–कसं सांगू.. मी – मी ( एकदम थांबून ) नको. कुणी तरी ऐकत असेल – पाहात असेल – योगिराजांना सगळं कळेल – ओ गॉड.... मनावर भीतीचं पोलादी कवच बसलंय. तुम्ही – तू बोलत राहा – शब्दांनी घणाचे घाव घालीत राहा. इतकं बोल– इतकं बोल की भीतीच्या कव-चाला तडे गेले पाहिजेत –सत्य सांगण्याचं धाडस माझ्या भित्र्या मनाला झालं पाहिजे ! [ ती गप्प ]

ठीक आहे. ठीक आहे. बोलू नकोस. मीच बोलतो. मला बोललंच पाहिजे. काय वाटेल ते होवो, सांगितलंच पाहिजे. सहनशक्तीच्या पलीकडे गेलंय सगळं हे.

[ ती गप्प ]

तू ऐकतेस ना ? नीट ऐक. विमल, मार्ग चुकलेला तुझा नवरा....

[ आतून एकदम गोंगाट ऐकू येतोय. कुणीतरी ओरडतो. ]

[ ' खामोश ! आवाज करायचा नाही. परत असली मुजोरी केली तर खिमा करून टाकू. ! ' आणि अस्ताव्यस्त जयंत बाहेरून आत फेकला जातो. त्याचा ओठ फुटलेला आहे. त्यानं हातांनी पोट घट्ट आवळून धरलेलं आहे. ]

**बाजीराव** : काय झालं ?

**जयंत** : आई ग ऽऽऽऽऽ

**विमल** : ( भानावर येऊन उठत ) जयंत ! काय झालं – काय झालं बेटा ?

**जयंत** : भेकड साले ! चार जणांनी मिळून एकट्याला मारलं ! अरे, हिंमत असेल

तर एक एक जण या ना....

**बाजीराव** : अरे, पण झालं काय ?

**जयंत** : काही नाही हो. थोडं फिरून यावं म्हणून आश्रमाच्या बाहेर पडायला लागलो तर अडवलं मला. म्हणे आश्रमाच्या बाहेर जायचं नाही. योगिराजांचा हुकूम आहे. आयला ! आपली कघटी गेली सरकून....म्हटलं, 'कोण साला हा योगिराज ! कुणाला हुकूम करतो आहे ? त्या योगिराजाला सांगा पाहिजे तर तू बस आश्रमात अंडी घालीत. मी चाललो.' तर एकदम चार जण मिळून अंगावर आले. आपण साले एकटे. काय करणार ? शेपूट घालून बसलो. चिखलासारखं तुडवलं भडव्यांनी !

**बाजीराव** : जयंत, कायरे तुझी ही भाषा !

**जयंत** : भाषा गेली तेल लावीत. इथं मार खावा लागलाय मला ! परत हातात सापडू दे एकएक सुटासुटा – साला बॉडीतला प्रत्येक पार्ट सुटा करून हातात नाही दिला तर बाप म्हणून डॅडीचं नाव सांगणार नाही ! अंकल....

**विमल** : जयंत, काय झालं रे हे असं ?

**जयंत** : मॉम, तू कशाला फिकीर करतेस उगीच ? मारामारी काय आजच केली मी ? वाईट सालं एकच झालं. मारामारी झाली ती एकतर्फी झाली. आमच्यावरच मारा झाला. आमची उलट मारी झालीच नाही. चलो, फिर देख लेंगे. मॉम, डोळे पूस पाहू. ऐसा तो चलताही है. कम ऑन. सिट डाऊन !

**बाजीराव** : ( संतापानं ) याचा सोक्षमोक्ष मला लावलाच पाहिजे. चल जयंत, ( त्याचा हात धरतो. ).

**जयंत** : कुठे ?

**बाजीराव** : त्या योगिराजाकडे. ( त्याला घेऊन दरवाज्याकडे जाऊ लागतो तोच दरवाज्यात रघू दिसतो ) रघू, अगदी वेळेवर आलास...

[ पण रघूचं कशाकडेच लक्ष नाही. डोळे विस्फारलेले – चेहेऱ्यावर प्रेतकळा – ]

**रघुनाथ** : ओ गॉड – ओ गॉड ! टेरिबल – भयानक झालं – हे भयानक झालं –

**बाजीराव** : ( दिङ्मूढ होऊन ) रघू, काय झालं ?

**रघुनाथ** : आता यातून सुटका नाही–आता सुटका नाही–

**बाजीराव** : ( त्याच्या जवळ जात ) रघू–

**रघुनाथ** : सुटकेचा शेवटचा मार्गही निरुपयोगी ठरला.

बाजीराव : रघू, अरे, काय झालं, काही सांगशील की नाही!

रघुनाथ : काय झालं? काय व्हायचं राहिलंय? ती इथे आली...

बाजीराव : ती?

रघुनाथ : मी प्रत्यक्ष पाहिलं–

बाजीराव : कुणाला पाहिलं?

रघुनाथ : तोही आलाय...

बाजीराव : तो?

घुनाथ : दोघांना पाहिलं–उघड्या डोळ्यांनी पाहिलं! असं हातभराच्या अंतरावरून पाहिलं–ओ गॉड–ओ गॉड!

बाजीराव : रघू, जरा वर पहा तर असा माझ्याकडे. काय प्रकार आहे हा? ती कोण? तो कोण? रघू....

रघुनाथ : रघू संपला. मी संपलो–सगळं संपलं....परमेश्वरा, पुनः पुन्हा या यातना का देतो आहेस मला? त्याच नरकात पुन्हा का ढकलतो आहेस? का का का!

बाजीराव : रघू, माझं ऐकतोस का जरा?

रघुनाथ : एक क्षण–संतापाचा, मत्सराचा, अविचाराचा एक क्षण–सरळ साध्या निष्कलंक माणसाला खुनी गुन्हेगार करून सोडणारा एक क्षण– त्या क्षणाला मी घाबरलो–त्यापासून पळून इथे आलो–ते नाव सोडलं; गाव सोडलं. जीवन सोडलं–पण इथेही तोच क्षण पुन्हा आला. का का का?

[ तोंड झाकून घेतो. योगिराज दरवाज्यात येऊन उभे राहातात. ]

योगिराज : हरि ओम् तत्सत्।

[ रघू धावत जाऊन त्यांचे पाय घट्ट धरतो. ]

रघुनाथ : योगिराज–क्षमा करा. मी स्वतःला विसरू शकलो नाही. नवजीवन मला पचवता आलं नाही. जुन्या जीवनाचे दोर मी तोडू शकलो नाही. मला वाचवा–माझा उद्धार करा!

योगिराज : (त्याच्या मस्तकावर हात ठेवीत) हरि ओम् तत्सत्!

[ सर्व जागीच खिळून हा प्रकार पाहात राहातात. पडदा पडतो. ]

आ श्च र्य नं ब र द हा
आ श्च र्य नं ब र द हा
आ श्च र्य नं ब र द हा

# अं क ति स रा

[ योगाश्रम. दुसऱ्याअंकातील हॉल. बाजीराव ज्ञानेश्वरांची समाधीची पोझ घेऊन मधल्या आसनावर आसनस्थ आहे. गंजाभाऊ हळूच आत येतो. दरवाज लावून घेतो. बाजीरावापाशी येऊन बसतो. ]

**बाजीराव** : ( डोळे मिटलेले, गंभीर आवाजात ) ओम् !

**गजाभाऊ** : अं ?

**बाजीराव** : ओऽऽम् !!

**गजाभाऊ** : ओ ! शट अप् !

**बाजीराव** : ओ ऽऽ म् !!!

**गजाभाऊ** : च्याः ! सारखे सारखे ढेकर काय देतो आहेस ?

**बाजीराव** : स्टुपिड ! हे ढेकर आहेत ?

**गजाभाऊ** : मग ?

**बाजीराव** : मनाच्या गाभाऱ्यात घुमणारा ओम्कार आहे.

**गजाभाऊ** : काय ?

**बाजीराव** : डिस्टर्ब करू नकोस. दिसत नाही मी समाधी लावण्याची प्रॅक्टीस करतो आहे ती ?

गजाभाऊ : समाधी ? च्यामारी ! हा काय घोळ आहे आणखी ?

बाजीराव : ज्ञानेश्वरीचा सहावा अध्याय वाचलास ?

गजाभाऊ : मी ? मला इंग्रजी धड समजत नाही. ज्ञानेश्वरांचं मराठी समजणार आहे ?

बाजीराव : पहिल्यांदा मलासुद्धा समजलं नाही ते प्राचीन मराठी. पण योगिराजांशी मी चर्चा केली. त्यानी अर्वाचीन मराठीत समजावून सांगितलं मला.

गजाभाऊ : अणि तुला समजलं ?

बाजीराव : नाही. पण योगिराजांनी इंग्रजीत भाषांतर करून सांगितलं तेव्हा समजलं.

गजाभाऊ : लॉंग लिव्ह द क्वीन – आमेन !

बाजीराव : इथून चालायला लाग – नो डिस्टर्बन्स ! ( डोळे मिटून ) ओ ऽऽ-ऽऽ म् !

गजाभाऊ : माऊली, डोक्याची ताटी उघडा. तो चांगदेवाचा वाघ आश्रमाच्या दाराशी खडा पहारा देतोय. त्याला चुकवून इथून सटकायचं पाहा. नाहीतर एखादी पडकी भिंत शोधून काढा. सगळ्यांच्या बोडख्यावरून उडून जाता येईल !

बाजीराव : इट्स ऑफ नो यूज, गजा. आता आपल्या हातात काहीही राहिलेलं नाही. उगीच वसल्या जागीच बूड आपटीत बसण्यात काय अर्थ आहे ? त्या-पेक्षा मन शांत ठेवून जे पुढे येईल ते पाहावं हे उत्तम. म्हणूनच समाधी लावण्याचा प्रयत्न करतोय मी. ओ ऽऽऽ म्.

गजाभाऊ : असं वश्या बैलासारखं फतकल मारून ओम् ओम् 'करीत हंबरत बसलास म्हणजे वाट सापडणार आहे ?

बाजीराव : वाट ? वाट लागली केव्हाच. आपण इथे आलो त्यादिवशीच. आणि आता तर वाट किती लागायची यालाही सीमा राहिली नाही. इथे आल्यापासून आमच्या सौभाग्यवतीचं मन थोडं ताळ्यावर आल्यासारखं झालं. म्हटलं चला, तेवढंच दुःखात सुख. तर आता त्या परत घरी जायचं म्हणताहेत. योगिराज त्यांना सोडायला तयार नाहीत. चिरंजीवांचं तर काही माणसात जमा नसतंच कधी. आश्रमात योगिराजांकडे ते अमेरिकन हिप्पीज आलेत ना ? त्यांच्या तांड्यात मुक्काम ठोकून आहेत ! ट्रिपावर ट्रिपा काढताहेत तिकडे !

गजाभाऊ : म्हणजे ?

बाजीराव : म्हणजे गांजा ओढायला लागला गांजा. तर्रर्र असतात. ट्रिप म्हणजे ट्रिप. सगळं झालं. हे राहिलं होतं. आता तेही झालं !

गजाभाऊ : च्यामारी ! ते कार्टं आता हिप्पी झालं ?

बाजीराव : अजून तुला पत्ता नाही ?

गजाभाऊ : कसा असणार ? वहिनींनी आणि त्यानं ओळखू नये म्हणून दडी मारून बसतो मी. त्यांचं तोंड तरी पाहिलंय का इतक्या दिवसांत ? ते नाहीत याची खात्री करून घेऊनच इथं तुला भेटतो.

बाजीराव : गजा, कोणत्या मुहूर्तावर ही अवलाद जन्माला आली एक परमेश्वर जाणे ! अरे, त्याच्या या अवतारात पाहिलास ना, तर ओळखणारसुद्धा नाहीस. वाढलेली दाढी....अंगात पायघोळ कफनी....पॅंट वगैरे काही नाही. नुसती– हनुमान चड्डी–गळ्यात रंगीबेरंगी मण्यांच्या माळा ... आ रा रा रा ! ओंगळ– ओंगळ ! अरे, काल तर त्यानं कमालच केली. कफनी नाही आणि हनुमान चड्डीसुद्धा नाही !

गजाभाऊ : बापरे ! म्हणजे ?

बाजीराव : तसाच. दिगंबर.

गजाभाऊ : कुठे इथे ?

बाजीराव : नाही. योगिराज राहतात त्या बंगलीसमोर. मांडी ठोकून बसलेला आणि गळ्यात पुठ्ठ्याची पाटी. त्यावर कोळशानं लिहिलेलं.... 'हा आश्रमच काय; पण हे जग म्हणजेच एक मोठा तुरुंग आहे. कुटुंबसंस्था–नीतिनियम– समाज, या त्या तुरुंगातल्या छोट्या छोट्या कोठड्या आहेत. आम्हाला या बंदीखान्यातून मुक्ती पाहिजे. आम्हाला निर्वाणाची ओढ लागलेली आहे. मुक्ती मिळेपर्यंत आम्ही असेच राहणार !'

गजाभाऊ : म्हणजे बिनकपड्याचे ?

बाजीराव : हो ना. दादापुता करून ऐकेना, तेव्हा बखोटीला धरला आणि इथे घेऊन आलो. कपडे घालायला लावले आणि झोपवला. गांजाच्या गुंगीतच होते. झोपले. पण सकाळी मी उठायच्या आधी सटकले. पुन्हा मीही म्हटलं, जाऊ द्या; काय मनाला येईल तसं करू देत.

गजाभाऊ : आणि हे सगळं होईपर्यंत वहिनी कुठे होत्या ?

**बाजीराव :** तिला योगिराजांनी उपचार केन्द्रात ठेवलंय- तिथे होती. हाही योगिराजांचाच एक डाव. उपचाराच्या नावाखाली डांबवून ठेवली की उपचारही होतो आणि सतत नजरेखाली राहते. जाऊ द्या झालं. विचार तरी कुठपर्यंत करायचा. शेवटी या सर्वाला कारण होणारे गाढव आपणच !

**गजाभाऊ :** हे गाढव आता कुठे जाऊन थांबणार आहे देवाला माहीत.... ( वैतागून ) काही सुचत नाही. ( अस्वस्थ फेऱ्या मारीत ) सगळेच कसे रे आपण शेळपट ? एवढ्याशा पिंजऱ्यातून सुटता येईना आपल्याला ? शिवछत्र-पतींच्या या महाराष्ट्रात....

**बाजीराव :** गजा, अरे शिवछत्रपतींचा महाराष्ट्र आता राहिलाय कुठे ?...नाव राहून गेलं; गाव वाहून गेलं. शिवरायाचं नाव सांगायची तरी आपली लायकी आहे का ? कुठे ऐरावत, कुठे शामभटाची तट्टाणी ? छत्रपती शिवराय.... ओ हो हो—किती थोर ! आठ बायका होत्या त्यांना.

**गजाभाऊ :** म्हणून काय झालं !

**बाजीराव :** हे तू विचारतोस ? अरे, एकुलत्या एक बायकोच्या वैतागाला भिऊन पळालास ना शेपूट घालून ?

**गजाभाऊ :** हो. मी शेपूट घातलं....आणि तुमच्या शेपटाचा बावटा अगदी फडफडत होता की नाही पळताना !

**बाजीराव :** मीही शेपूट घातलंच. मग उगीच आपली तुलना छत्रपतींशी कशाला ? आठ बायका....आठ जणींचा संसार...त्यात शंभूराजे म्हणजे आमच्या जयंताचेच पूर्वज ! आता दाढी वाढल्यावर जयंत डिट्टो संभाजी ! काय कमी वैताग असेल त्यांच्यामागे ?

**गजाभाऊ :** माहीत आहे मला. नाटक पाहिलंय मी—व्हेन रायगड वेक्स फ्रॉम स्लीप. त्यात दाखवलंय सगळं. रिअली, शिवाजी वॉज अ मॅन ! हो. पण शिवाजी मॅन तर श्रीकृष्ण सुपरमॅन. मोजून सोळा हजार एकशे आठ बायका ! आणि सगळ्या मिळून मुलं झाली फक्त दोन ! निदान पुराणात पुरावा दोन-चाच आहे. म्हणजे एकीला एक अशा दोन बायका बाद केल्या तरी उरलेल्या सोळा हजार एकशे सहा बायकांनी केवढं डोकं खाल्लं असेल रोज ! पण पठ्ठा डगमगला नाही ! सगळ्यांना तोंड दिलं !

**बाजीराव :** मग ? उगीच नाही कुरुक्षेत्रावर अर्जुनाला सांगितलं त्यानं – माम्

अनुस्मर युद्धच ! – ल्ढाऊ होता बेटा. नाहीतर आपण. बायकोनं नगारा वाजवला...पोरांनी शंख फुंकला आणि आपण टिऱ्यांना पाय लावून पळालो ! एकूण काय, रणमर्द आता संपले. आता शिल्लक उरलाय फक्त रणछोडदास. आता हेच पाहा ना... त्या कृष्णानं गीतेत समाधीचं केवढं वर्णन केलंय ! आणि आम्ही जंग जंग पछाडतोय; पण एक सेकंदभर समाधी लागत असेल तर शपथ !

[ रघुनाथ प्रवेश करतो. ]

**गजाभाऊ** : घ्या...हे आले रणछोडदास द थर्ड. सगळे एका माळेचे मणी.

**रघुनाथ** : गजा, चालायला लाग बघू इथून. मला स्वस्थ पडू दे जरा ...

**गजाभाऊ** : हॉ ! स्वतःबरोबर आम्हाला या गाळात ओढलंस. कृतकृत्य झालास. आता राहा. स्वस्थ पडून रहा !

**रघुनाथ** : शट् अप् !

**गजाभाऊ** : यू शट् अप ! तुझ्यामुळं झालं हे सगळं. पण झालं हे पुष्कळ झालं. नरड्याशी पाणी आलं. नाऊ नो मोअर ऑफ धिस. इनफ् !

**रघुनाथ** : गजा तू ...( संताप अनावर )

**गजाभाऊ** : इनफ् इज इनफ्. आम्ही इथून सुटणार आहोत. तुला यायचं तर ये. नाही तर तुझा तू गाढवी त्रागा. ( जाऊन फोन उचलतो )

**रघुनाथ** : काय करतो आहेस ?

**गजाभाऊ** : फोन करतोय.

**रघुनाथ** : कुणाला ?

**गजाभाऊ** : पोलिसला.

**रघुनाथ** : पोलिस ?

**गजाभाऊ** : हो पोलिस. खरं म्हणजे यापूर्वीच पोलिसांना कळवायला पाहिजे होतं. पण फुकट घाबरून गप्प बसलो. आता आपण डेस्परेट झालोय. काय तो योगिराज करील ते करू दे. मी सर्व प्रकार पोलिसांना कळवणार आहे.

**रघुनाथ** : नाही, नाही. पोलिस नको. प्लीज, प्लीज. गजा, प्लीज.

**गजाभाऊ** : का ? तुला एवढं घाबरायला काय झालंय ?

**रघुनाथ** : गजा, गजा, मी तुझे पाय धरतो. दाढी धरतो. पण ... पोलिसांना कळवू

नकोस. मला भीती वाटते.

गजाभाऊ : अरे भीती त्या योग्याला. तू मधल्यामधे कशाला...

रघुनाथ : मधल्यामधे माझाच चुराडा होईल बाबा! शेपटाचा केस हाताशी लागला तर हत्ती बाहेर ओढून काढणारी जात असते पोलिसांची. सी. आय. डी. डिटेक्टिव्ह...त्यांचे कुत्रे—बापरे! नाही—गजा, माझ्या राजा, मी हात जोडतो; पण पोलिसांना बोलवू नकोस इथे. त्या योग्याचं काय व्हायचं ते होईल; पण कदाचित मी फासावर जाईन. पाहिजे तर पदर पसरतो...

बाजीराव : तू पदर पसरणार? (कपाळावर हात मारून घेतो)

रघुनाथ : हो हो. हे बघ (ओपन शर्टाचा एक पदर पसरतो)

बाजीराव : रघ्या गाढवा—

रघुनाथ : तुझ्यापुढेही पसरतो. (शर्टाचा दुसरा पदर त्याच्यासमोर पसरतो)

बाजीराव : हेल विथ पदर! तू शांत हो पाहू. इथे बैस असा.

रघुनाथ : तो फोन खाली ठेवायला सांग त्याला आधी.

बाजीराव : गजा, रिसीव्हर ठेव.

गजाभाऊ : पण काय, भानगड काय आहे ही?

बाजीराव : रघू, काय प्रकार आहे हा सगळा?

रघुनाथ : प्लीज—प्लीज, मला काही विचारू नका—मला काही सांगता येणार नाही. मी सांगणार नाही.

गजाभाऊ : तू काही तरी लफड्यात अडकलेला दिसतो आहेस, रघ्या! त्याशिवाय असा बावळचल्यासारखा वागणार नाहीस.

बाजीराव : त्या दिवशी 'ती' आली, 'तो' आला, असं काही तरी असंबद्ध बरळलास...नंतर जो गप्प झालास...तो फारसा कुणाशी बोललाच नाहीस. रात्रीसुद्धा नीट झोपत नाहीस. सारखा फेऱ्या मारीत असतोस अंधारात. आणि मधे दोन रात्री इथे नव्हतासच तू. काय भानगड आहे ही?

रघुनाथ : मला तेवढं विचारू नका. प्लीज—फॉर हेवन्स सेक. विचारू नका काही.

गजाभाऊ : विचारू नका काय? त्याशिवाय आम्हाला कळणार कसं? तू कसल्या संकटात पडला आहेस का? तोंडानं काहीतरी सांग, म्हणजे काही करता तरी येईल आम्हाला.

रघुनाथ : काही करण्याच्या पलीकडे गेलंय सगळं...संपलंय...सगळं संपलंय आता!

बाजीराव : तरी पण मित्र म्हणून आम्हाला काही तरी केलंच पाहिजे ना ?

गजाभाऊ : काहीतरी करून उपयोग नाही. व्यवस्थितच केलं पाहिजे. नाही तर –करायला गेलो एक–असं व्हायचं. म्हणजे, वेन्ट टू डू वन, अँड हॅपन्ड अनदर, असं व्हायला नको. रघ्या, आम्ही तुझे जिगरदोस्त ना ? मग आम्हाला सांगायला काय हरकत आहे ?

बाजीराव : हं चल; बोल. मनात असेल नसेल ते ओकून टाक सगळं...

रघुनाथ : प्रोफेसर...

बाजीराव : यस–बोल बोल—

रघुनाथ : मी जरा जाऊन येऊ का ? ( उठू लागतो )

बाजीराव : ( त्याचा हात धरीत ) कुठे ?

रघुनाथ : ( करंगळी दाखवतो )

बाजीराव : ( त्यास खेचून बसवीत ) नो आफ्टर धिस पिरियड. सिट डाऊन. ( तो बसतो ) बोल.

रघुनाथ : ओ गॉड–ओ गॉड !

गजाभाऊ : रघ्या, तू मुकाट्यानं बोलणार आहेस, की फोन करू पोलिसांना ? ( जाऊन रिसीव्हर उचलतो )

रघुनाथ : नको नको–प्लीज...

गजाभाऊ : मग सांग- हा काय गुंता आहे ?

रघुनाथ : सांगतो. पण फोन खाली ठेव आधी.

गजाभाऊ : त्या आधी तू सांगायला सुरुवात कर...( नंबर फिरवू लागतो )

रघुनाथ : ( गांगरून ) प्रोफेसर...

बाजीराव : गजा–

गजाभाऊ : ऑल राईट ! ( रिसीव्हर ठेवतो ) हं. बोल आता. एकदम आत्म-चरित्राला सुरुवात कर– 'असा मी, असामी !'

रघुनाथ : मला थोडं पाणी देणार का ? एक घोटभर...?

गजाभाऊ : आत्ता आणतो–( जातो. )

बाजीराव : रघू, थोडं शवासन करतोस का ? नर्व्हज् रिलॅक्स होतील...

रघुनाथ : मित्रा, आता तीच पाळी आहे. शवासन. कायमचं !

गजाभाऊ : हं. हे पाणी. ( ग्लास देतो. )

रघुनाथ : थँक यू.

गजाभाऊ : मेन्शन करण्यात टाइम पास करू नकोस...पाणी पी.

रघुनाथ : (पाणी पिऊन) तुम्ही कुणाजवळ चुकूनसुद्धा काही बोलणार नाही?

बाजीराव : एक शब्द नाही. वर्ड ऑफ ऑनर!

गजाभाऊ : आपला पण वर्ड ऑफ ऑनर!

रघुनाथ : हं (आवंढा गिळून) मी इथे का आलो—नवजीवनाच्या मागे का लागलो, याचं कारण माहीत आहे तुम्हाला? (ते गप्प) नाही. कसं माहित असणार? मी तुम्हाला सांगितलंच नाही कधी. कोणत्या तोंडानं सांगू? लाज वाटली...लाज वाटली माझी मलाच. काय कमी होतं मला? घरदार, व्यापार, पैसा, प्रतिष्ठा, काय म्हणून कमी होतं मला? गजान्त लक्ष्मी होती... एक भला माणूस म्हणून समाजात स्थान होतं...तुमच्यासारखे मित्र होते... स्वर्गातल्या देवांनीही हेवा करावा अशी अप्सरा बायको म्हणून घरात नांदत होती...सुख पाणी भरीत होतं दोन्ही दारात....आणि एक दिवस जादूची कांडी फिरल्यासारखं ते सारं एकदम नाहीसं झालं!

बाजीराव : का? काय झालं?

रघुनाथ : त्या दिवशी धंद्याच्या कामासाठी विमानानं गोव्याला जाणार होतो मी. पण फ्लाइट कॅन्सल झाली आणि विमानतळावरून परत आलो. मी येईन अशी कुणालाच कल्पना नव्हती घरात. सरळ वरच्या मजल्यावर गेलो... बेडरूमच्या दरवाज्यापाशी पोचलो आणि जागच्याजागी थिजून गेल्यासारखा उभा राहिलो. आतून हसण्याबोलण्याचा आवाज येत होता. त्यातला एक आवाज पुरुषाचा होता. मी की-होलला डोळा लावून पाहिलं... माझी बायको एका पुरुषाच्या गळ्यात गळा घालून माझ्याच पलंगावर अस्ताव्यस्त पडलेली दिसली मला! हॉरिबल—हॉरिबल! तो एक क्षण—तो एकच भयानक क्षण—आयुष्यात कधी विसरणार नाही मी तो. (थोडा शांत होऊन) आणि तो पुरुष कोण होता माहीत आहे? दुसरा तिसरा कुणी नाही. मी धाकट्या भावासारखा मानलेला माझा धंद्यातला भागीदार. पक्का भागीदार निघाला.... पलंगापर्यंत भागीदारी केली त्यानं! (खाली मान घालतो. प्रोफेसर त्याच्या खांद्यावर हात ठेवतो) तिनं असं का करावं? गरीब, असहाय, दारिद्र्यानं पिचलेल्या एका गाणार-णीची पोर ही. उकिरड्यावर पडलेल्या रत्नासारखी! मी उचलून तिला सोन्याच्या

कोंदणात बसवली. जगात कुणीही दिली नसती अशी माया तिला दिली... विश्वास दिला... वैभव दिलं...किती सुखी होतो आम्ही लग्नानंतरची सात वर्षे. कैक वेळा म्हणालो असेन माझ्या भागीदाराला... 'अरे, एक वेळ पृथ्वी सूर्याभोवतीचं रिंगण सोडून बाहेर पडेल; पण माझ्या विश्वासाची मर्यादा ती ओलांडणार नाही. तिची माझ्यावरची निष्ठा ढळणार नाही!' आणि प्रत्येक वेळीं मनातल्या मनात तो मला हसला असेल! माझी कीव केली असेल त्यानं...असेच दिवसांमागून दिवस जात होते. वरून शांत. पण आतून ज्वालामुखीसारखा धुमसत होतो. मनात योजना आखली जात होती. दोघांच्या खुनाची. (क्षणभर भावनातिरेकानं थांबतो) मनाच्या या अवस्थेत होतो मी; आणि योगिराज भेटले. देवदूत भेटल्यासारखं वाटलं. पैशांचे व्यवहार मला पाहिजे तसे करून घेतले आणि लगेच्च हे नवजीवन स्वीकारलं. वाटलं, ते लाजिरवाणं जिणं आता संपलं...आता आपण नव्यानं जन्माला आलो. पण नाही—पूर्वजन्मीचं पाप या जन्मीही हात धुऊन मागे लागलं!

**बाजीराव** : म्हणजे?

**रघुनाथ** : ती दोघं राजरोस इथे महाबळेश्वरला येऊन राहिली आहेत. मी त्यांना पाहिलं. हातात हात घालून फिरताना पाहिलं—मी वारल्याची बातमी कानावर येऊन वर्ष देखील झालं नाही— आणि हा निर्लज्जपणा— ही बेमुर्वतखोरी— बेशरमी! ओ गॉड! पुन्हा त्याच यातना-तेच भयानक विचार—ओ गॉड—ओ गॉड! (डोकं घट्ट दाबून अस्वस्थपणे उठून फेऱ्या मारू लागतो.)

**बाजीराव** : हे बघ रघू, मन थोडं काबूत आण. शांत हो. आणि शक्य झालं तर निर्विकल्प समाधी लावण्याचा प्रयत्न कर. या यातनांतून निश्चित तुला मुक्ती मिळेल. ज्ञानेश्वराच्या सहाव्या अध्यायात भगवंत अर्जुनाला म्हणतात.... हे किरीटी...

**गजाभाऊ** : भगवंतराव, ज्ञानेश्वरी सांगायची का वेळ आहे ही? हा किरीटी मूडमधे आहे का समाधी लावायच्या? (रघूला) रघू, तू मन मोकळं केलंस... बरं झालं. असले विचार मनातल्या मनांत कोंडून राहिले तर त्या कोंडमाऱ्यानं पिसाळून चांगला शहाणा माणूस सुद्धा नको ते करून बसतो. पुन्हा ते खुनाबिनाचे विचार तुझ्या डोक्यात यायला लागले असतील तर ते काढून टाक. अरे बाबा, आपण साधी सरळ माणसं. खुनाबिनाचं झंझट आपल्या उपयोगाचं

नाही. फार घोळाचं प्रकरण आहे ते...तू नाटक पाहिलंस ना सरिता पत्कीनं लिहिलेलं! 'खून पाहावा करून'. कुठल्यातरी इंग्रजी नाटकावरून घेतलंय—म्हणजे खरंच असलं पाहिजे त्यात दाखवलेलं. कोणतं इंग्रजी नाटक ते?...ह आठवलं...लूक अॅट डुइंग मर्डर.

**बाजीराव** : स्टुपिड! नॉट इन द बूकचं रूपांतर आहे ते.

**गजाभाऊ** : कुणाचं का असेना, पण आहे ते खरं आहे. खुनाचा घोळ नाय पायजे. समजलं रघू?

**रघुनाथ** : हं. (मान वळवीत) पण आता काय उपयोग आहे त्याचा?

**गजाभाऊ** : म्हणजे?

**रघुनाथ** : मी देऊन बसलोय ना.

**गजाभाऊ** : काय?

**रघुनाथ** : सुपारी.

**बाजीराव** : सुपारी? कुणाला दिली सुपारी?

**रघुनाथ** : त्यांना...

**बाजीराव** : त्यांना म्हणजे तुझ्या बायकोला आणि भागीदाराला?

**रघुनाथ** : त्यांना नाही. गाढव!

**बाजीराव** : मग?

**रघुनाथ** : आता कसं सांगू तुम्हाला—

**बाजीराव** : ठीक आहे...सांगण्याची गरज नाही. कुणाला तरी सुपारी दिलीस एवढंच ना? मग त्यात काय आहे? सुपारीची काय किंमत आहे...

**रघुनाथ** : पाच हजार रुपये!

**बाजीराव** : क—काय? एका सुपारीची किंमत पाच हजार रुपये? ऑफ वन सिंगल बीटलनट? दिस इज टू मच—आय से.

**गजाभाऊ** : प्राध्यापक, ही साधी सुपारी नाही.

**बाजीराव** : चिकणी असली म्हणून काय झालं? पण एका सुपारीची किंमत फाइव्ह थावजंड बक्स? नेव्हर हर्ड ऑफ सच अ थिंग! इतकी महागाई... म्हणजे सुपारी खायचं सोडूनच दिलं पाहिजे!

**गजाभाऊ** : ही खुनाची सुपारी आहे प्राध्यापक!...

**बाजीराव** : व्हॉट?

गजाभाऊ : आता आपण थोडे गप्प बसा हं ! ( रघूला ) रघ्या, कुणाला दिलीस सुपारी ?

रघुनाथ दोन गुंडांना.

गजाभाऊ : कधी दिलीस ?

रघुनाथ : काल रात्री. मी भित्रा– माझ्यात ते धाडस नाही. माझ्या हातून ते झालं नसतं.

गजाभाऊ : म्हणून हे केलंस तू ?

रघुनाथ : मग काय करू–काय करू ? मनाला कसा बांध घालू ?

गजाभाऊ : बापरे बाप ? गधड्या, खरंच खून पाडतील ना आता ते ?

[ आतून 'सेन्सेशनल सेन्सेशनल' असे शब्द ऐकू येतात. ]

गजाभाऊ : ( आवाज ऐकून ) बापरे ! जयंताचा आवाज ! मी सटकतो.

[ उठून आत जाऊ लागतो ]

बाजीराव : आत कुठे चाललास ? तिथून बाहेर पडायला रस्ता नाही.

[ जयंत आणि टेलर प्रवेश करतात. टेलर हा हिप्पी आहे. जयंतही 'हिप्पी' पंथातच जमा आहे. ]

जयंत : व्हॉट डू यू से, मिस्टर टेलर ? खून ? आयला ? कमाल झाली ! बॉंबेत खूनबीन फार पॉप्युलर आहेत. पण इथे मर्डर इन महाबळेश्वर ? फार झपाट्यानं सुधारणा व्हायला लागली ही आपल्या देशात !

[ सर्व दचकून जातात. गजा जयंताचा प्रवेश होताच तोंड वळवून उभा राहतो. ]

बाजीराव : जयंत, शुद्धीवर आहेस का तू ? कुणाचा खून ? कुणी केला खून ?

[ इतक्यात कावराबावरा झालेला रघू घाईने बाहेर जाऊ लागतो. ]

कुठे निघालास रघू ?

रघुनाथ ! सोड– सोड – सोड ! ( प्रोफेसराने त्याचा दंड धरलेला आहे. )

बाजीराव : थांब. वेट...जयंत, कुणाचा खून झाला ?

जयंत : असेल कुणीतरी तुमच्या आमच्यासारखा 'मिस्टर नोबडी' ! एक शून्य बाजीराव ! व्हाय बॉदर ?

रघुनाथ : ओ गॉड, ओ गॉड ! ( प्रोफेसराचा हात झटकून निघून जातो. )

बाजीराव : रघू – रघू – रघू, माझं ऐक – रघू....

जयंत : यांना वैतागायला काय झालं ? आयला ! ग्रेट ! ज्याचा खून झाला तो

तिकडे ' बरं झालं, मेलो ' म्हणून खुशीत असेल, आणि यांना इकडे डोक्यात राख घालायला काय झालं ?

बाजीराव : जयंत, एका माणसाचा खून झालाय !

जयंत : नानाची टांग ! त्यात काय वाईट झालं ? शून्यातून आला...शून्यात गेला. त्याला जन्माला घालून तरी आईबापांनी चूकच केली... ती उशिरा का होईना कुणी तरी सुधारली. बेटर लेट दॅन नेव्हर.

[ गजा तोंड भिंतीकडे करून हळूहळू दरवाज्याकडे सरकून आलेला आहे. जयंत एकदम त्याला पाहतो. ]

जयंत : ( गजाला पाहताच दचकून स्तब्ध होतो. मग टेलरला ) टेलर, यार, मला चिमटा घे तर...

टेलर : व्हॉट ?

जयंत : टेक चिमटा — पंच मी.

[ तो एक गुद्दा ठेवून देतो ]

पंच नाही — पिंच म्हणायचं होतं मला. आयला ! अफू, गांजा ग्रेट आहे हा ! मेलेली माणसंसुद्धा दिसायला लावतो !

बाजीराव : जयंत, जयंत...तू माझं ऐकतोस का जरा...

[ त्याला धरून स्वतःकडे वळवतो. तेवढ्यात गजा चटकन बाहेर जातो. ]

जयंत : अंकल, आत्ता गजाकाकाला पाहिल्यासारखं वाटलं मला.

बाजीराव : गांजाच्या धुंदीत आहेस तू. भास झाला तुला...

जयंत : म्हणजे मी गजाकाकाला पाहिलंच नाही ?

बाजीराव : कसं शक्य आहे ते ?

जयंत : तो नुसता भास झाला ?

बाजीराव : नाही — भास नाही. तो माझा इथला एक मित्र होता. गजाकाका-सारखा दिसतो. पण...

जयंत : दिसतो ? नुसता दिसतो कसला ? डिट्टो गजाकाकाच !

बाजीराव : हो — हो ना. मीसुद्धा फसलो एकदोनदा. पण तो गजाकाका नाही.

जयंत : ओह ! थँक गॉड.

बाजीराव : का ?

जयंत : अहो, केवढा भेदरून गेलो मी ! म्हटलं, गजाकाका आले की त्यांच्या-

पाठोपाठ आमचे तीर्थरूप आलेच!

बाजीराव : जयंत!

जयंत : ओह! अंकल, ओळख करून द्यायची राहिलीच. हा माझा नवा मित्र. व्हिकी टेलर, माय अंकल मिस्टर बलवंत दुधाट.

टेलर : हाय...

बाजीराव : काय?

जयंत : हाय म्हणजे हलो...

बाजीराव : ओ, आय सी! (शेक हँड करतो) जयंत, अरे ते खुनाचं अर्धवटच सांगितलंस.

जयंत : अंकल, मी अर्धवट काही करतो का कधी? मला या आश्रमाच्या बाहेर जायची परवानगी मिळवून द्या. बित्तंबातमी घेऊन येतो सगळी.

बाजीराव : मग, ही बातमी कशी कळली तुला?

जयंत : टेलरनं सांगितली. तो भटकायला जात असतो ना बाहेर.

बाजीराव : मिस्टर टेलर...

जयंत : त्याला विचारून काही उपयोग नाही अंकल. त्यानंसुद्धा कुठेतरी उडत-उडत ऐकली आणि सांगितली.

बाजीराव : मिस्टर टेलर, कॅन यू गिव्ह मी सम मोअर इन्फरमेशन अबाउट द मर्डर?

टेलर : (अडखळत – थांबत – पण विश्वासाने)आपन आमीला माफी केले पायजे. आमीचे इथले दोस्तकरे आमी भोजनला गेले होते, तिथे कोनतरीच बोलले ते आमी हेन्ला सांगले.

(बाजीराव पाहात राहतो)

आपन आमीचा संगट म्हराटी भासा बोलतात. आमी दोन साल हिकरेच घुमते. म्हराटी बोलून सकतात. थोरा थोरा लिहून बी सकतात.

बाजीराव : ऐका जयंतराव.

जयंत : साला टेलर, भलताच स्मार्ट दिसतोस यार! दोन वर्षांत मराठी बोलायला शिकलास ते शिकलास; आणि वर भोजनही करायला शिकलास? कमाल झाली ...भोजन? वरण भात, लोणकढं तूप, त्यात लिंबाची फोड, आणि वर अळवाच्या पातळ भाजीचा भुरका! ग्रेट!

टेलर : या– या– ऑल धिस...ॲंड फुरनाची फोली टू !

जयंत : पुरणाची पोळी ? आयला ! तुझ्या मित्राकडे ?

टेलर : या – ॲंड तिकट वॉल्स.

जयंत : तिकट वॉल्स ?

टेलर : या – या – गोल गोल तिकट तिकट – काय, व्हॉट इज इट कॉल्ड – ह बाजी बाजी.

जयंत : हां – हां – भजी.

टेलर : या – ॲंड व्हॉट ईज दॅट कॉल्ड – समथिंग लाइक स्पॅगटी –

जयंत : कुरडई ?

टेलर : कुर व्हॉट ?

जयंत : कुरडई... कु – र – ड – ई...

टेलर : या या – द व्हेरी थींग. एकदम इंडियन स्टाइल. फाट थाट रांगोली उदबत्ती.

जयंत : उदबत्तीसुद्धा ? म्हणजे साला भटजी थाट झाला. आणि पाटावर बसलास तू ? मांडीबिंडी घालून ?

टेलर : या या – एक्झॅक्टली लाइक दॅट... (प्रोफेसरकडे बोट दाखवतो. या वेळी प्रोफेसर समाधीच्या पोजमध्ये डोळे मिटून बसलेले असतात.) ह्येचा भोजन होनार काय आटा ?

बाजीराव : नाही, मिस्टर टेलर. मी समाधी लावण्याचा प्रयत्न करतो आहे.

टेलर : समाढी ? वंडरफुल ! तुमी आमीला समाढीचा काय तरी सांगून सकतात काय ? आमीला जेन्युइन इंटरेस्ट हाय.

बाजीराव : वा वा मिस्टर टेलर, तुमची ही जिज्ञासू वृत्ती पाहून मला फार फार समाधान वाटतं. मी जरूर मला माहीत आहे तितकं समाधीविषयी तुम्हाला सांगेन. क्षुद्र जीवनकलहापासून आत्मा मुक्त करून आत्मा आणि परमात्मा यामधलं अंतर जास्तजास्त कमी करण्याची साधना पूर्णत्वाला जाते तेव्हा जी ब्रह्मानंदी टाळी लागते तिला समाधी असं म्हणतात. ती अविकल्प समाधी. सविकल्प समाधी म्हणजे –

जयंत : मेलो ! अंकल, तुमचं भंकस संपेपर्यंत मी इथे पडल्या पडल्या थोडी अविकल्प समाधी लावतो.

बाजीराव : ( टेलरला ) मी काय बोललो ते समजलं ?

टेलर : नो – नॉट अ वर्ड !

बाजीराव : नेव्हर माईंड– पुढे ऐका. समाधीनं भौतिक यातनांचा भार नष्ट होतो. देहाला नवं चैतन्य मिळतं. आत्म्याला परमात्म्याची ओळख पटते... माणसाला शाश्वत सुखाची गुरुकिल्ली सापडते.

टेलर : बट हाऊ ? हे सगरा होटे कसा ?

बाजीराव : समाधी लावली की हे आपोआप होतं.

टेलर : या. आय ॲग्री. बट हे समाढी लागटाट ते कसा लागटाट ?

बाजीराव : सांगतो. असं आसन घालून बसायचं. चित्त एकाग्र करायचं. आणि कुंडलिनी जागृत करायची.

टेलर : कशाची काय करायची ?

बाजीराव : कुंडलिनी जागृत करायची.

टेलर : म्हंजे एक्झॅक्टली काय करायची ?

बाजीराव : ऐकून घ्या. कुंडलिनी ही एक शक्ती असते. ती आपल्या बेंबीभोवती सर्पिणीसारखी वेटोळं घालून निद्रिस्त असते.

टेलर : भेंभी ? व्हॉट इज भेंभी ?

बाजीराव : नेव्हल.

टेलर : ओ – ओ, आय सी.

बाजीराव : तर ती कुंडलिनी जागृत झाली की इडा आणि पिंगला यांच्या मधे...

टेलर : वेट – वेट. व्हॉट डीड यू से ? इरा ॲण्ड हॉट ?

बाजीराव : इडा आणि पिंगला. ( तो आ वासून पाहात राहातो. ) पाठीचा कणा – स्पायनल कॉर्ड.

टेलर : या या.

बाजीराव : तर इडा आणि पिंगला यांच्यामधे जी सुषुम्ना असते...

टेलर : हे काय असटे ?

बाजीराव : सुषुम्ना.

टेलर : या – आय ॲम सॉरी. हेंचा मीनींग समजले नाय.

बाजीराव : नेव्हर माइंड. मला तरी कुठं समजलंय ! पण तूतं काही समजलं नाही तरी चालेल. नुसतं ऐका.

टेलर : ओ, आय सी !

बाजीराव : तर जागृत झालेली कुंडलिनी सुषुम्नेतून लहान मेंदूत जाते. मग मोठ्या मेंदूत. तिथून उतरून, दोन भुवयांच्या मधे जे चंद्रकमल असतं त्याला धक्का देते. चंद्रकमळ कलंडतं. त्यातलं अमृत सबंध शरीरात पसरतं. मग शरीराला आणि मनाला नवजीवन मिळतं. मग कृतकृत्य होऊन कुंडलिनी ब्रह्मरंध्रातून बाहेर पडते.

टेलर : कुठून ?

बाजीराव : ब्रह्मरंध्रातून. रंध्र म्हणजे भोक – होल. ब्रह्म म्हणजे ब्रह्म.

टेलर : म्हंजे ब्रह्माचा भोक.

बाजीराव : ब्रह्माला भोक कुठलं आलंय – ब्रह्म या नावाचं भोक.

टेलर : टे कुटे असटाट ?

बाजीराव : ( दाखवीत ) इथे. डोक्याच्या कवटीवर…मध्यभागी.

टेलर : यू मीन, खवटीला भोक असटाट ? पंक्चर ? आय नेव्हर न्यू… ( कवटी चाचपू लागतो.

बाजीराव : तसं तुम्हाला ते सापडणार नाही. फक्त कुंडलिनी बाहेर जाण्यासाठीच आहे ते. अगदी सूक्ष्म.

टेलर : आय सी.

बाजीराव : समजलं का काही ?

टेलर : थोरा थोरा. अवघर हाय.

बाजीराव : तसं अवघडच आहे. पण प्रॅक्टिसनं जमतं. तसं मलासुद्धा जमत नाही अजून.

टेलर : आमी करून पहाटे. काय ?

बाजीराव : ओ यस्…! गो अहेड. माझ्यासारखं आसन घाला. करेक्ट ! श्वास रोखून धरा. प्राणायाम – यस करेक्ट ! आता चित्त एकाग्र करा. हळूहळू कुंडलिनी जागृत होईल. जागृत होताना थोडासा त्रास होईल. पण संयमन करा. दॅटस इट—दॅटस इट – काय झालं हो ?

टेलर : कुंडलिनी जागृट झाला. पोटाट गरबर होटे.

बाजीराव : जड शरीरव्याधीवर आत्मबलानं विजय मिळवा. का…काय झालं ?

टेलर : ( कासावीस होत ) कुंडलिनी कुठून बाहेर जाटो ?

बाजीराव : ब्रह्मरंध्रातून.

टेलर : टे डोकाचे कवटीवर असटो ना?

बाजीराव : हो. का?

टेलर : आहो, मग कुंडलिनी रस्टा चुकले. उलट दिशेला गेले.

बाजीराव : म्हणजे?

टेलर : (घाईने उठत) टुमचा पाखाना कुठे असतो?

बाजीराव : जयंत, पायखाना दाखव यांना.

टेलर : ओ! व्हॉट अ कुंडलिनी!

जयंत : यार, टेलर, ही कुंडलिनी नाही. ही पुरणपोळी!

टेलर : ओ, व्हॉट अ फुरनपोली...

[घाईने जयंतबरोबर जातो. हे चालू असतानाच योगिराज मागे येऊन उभे असतात.]

योगिराज : हरि ॐ तत्सत्!

बाजीराव : योगिराज! (नमस्कार करतो)

योगिराज : हा टेलर इथे काय करीत होता?

बाजीराव : योगिराज, या हिप्पीजना समाधी वगैरे योगसाधनेबद्दल जेन्युइन-इंटरेस्ट आहे. मी त्याला समाधीबद्दल प्राथमिक माहिती देत होता.

योगिराज : (खोचकपणे) तुम्ही समाधीबद्दल माहिती देत होता?

बाजीराव : म्हणजे, आपण मला सांगितलेलंच त्याला सांगत होतो. पण काहीतरी घोटाळा झाला. मी त्याला स्वर्गीय सुखाची वाट दाखवायला गेलो; आणि त्यानं भलतीच वाट धरली!

योगिराज : हाफ नॉलेज इज डेन्जरस! हे हिप्पीज उथळ असतात. यांना शाश्वत सुखाची ओढ असते, पण त्यासाठी करावी लागणारी खडतर तपश्चर्या नको असते. म्हणूनच जीवनकलहाच्या यातना टाळण्यासाठी:– हे भांग, गांजा, चरस, एल एस डी अशासारख्या क्षणकाल बुद्धिभ्रम करणाऱ्या अंमली आणि खोट्या पळवाटांचा अवलंब करीत असतात. पण हा निव्वळ भेकडांचा मार्ग. मन नपुंसक असल्याचं हे चिन्ह! हिप्पीच काय, प्रत्येक सामान्य माणूस मनानं नपुंसकच असतो.

बाजीराव : योगिराज, आपण म्हणता त्याप्रमाणे शाश्वत सुख मिळवण्याचा एक

मार्ग खडतर. तो अवलंबायचा म्हणजे कठोर मनोनिग्रह आणि तितकीच कठोर तपश्चर्या करण्याचा पुरुषार्थ हवा. सामान्य माणसाजवळ हा पुरुषार्थ नसतो म्हणून तो जगण्याची यातना, क्षणकाल का होईना, विसरण्यासाठी मद्य-पान करतो. भांग, गांजा, चरस अशा अंमली पदार्थांचा आश्रय घेतो. पण त्याला आपण नपुंसक म्हणता. मग आमच्यासारख्या सामान्य माणसाचा पुरुषार्थ तरी कशात आहे? की या जंजाळातून आम्हाला सुटका नाहीच? शाश्वत सुखाची तोंडओळखसुद्धा होण्याची आम्हाला शक्यता नाही?

योगिराज : जीवनकलहाच्या वादळातही सामान्य माणसाची नौका स्थिर करील, त्याला हव्या त्या दिशेला नेणारं सुकाणू त्याच्या हाती देईल, त्याच्या शिडात सुखाचा वारा भरील...त्याला पेलेल, रुचेल असाच आमचा हा नवजीवनाचा मार्ग आहे.

बाजीराव : शेवटचा मुद्दा वादाचा आहे.

योगिराज : तुमच्या बाबतीत तो वादातीत असला पाहिजे. आणि तेच शेवटचं एकदा बजावण्यासाठी आम्ही येथे आलो आहोत. तुमच्या सौभाग्यवतींची चित्त-वृत्ती आज फारच अस्वस्थ झालेली आहे. आमच्या ऑफिसमध्ये येऊन तावा-तावानं भांडायला लागल्या आमच्याशी.

बाजीराव : आणि लगेच आपण ऑफिसमधून उठून इकडे पळ काढलात! बरोबर! आमच्या कुटुंबाचा तोफखाना म्हणजे त्याला इतिहासात तोड नाही! मला विचारा ना!

योगिराज : मधेमधे बोलू नका.

बाजीराव : हो.

योगिराज : आजच्या आज घरी जायचं म्हणून आग्रह धरून बसल्याहेत त्या. आत्ता कुठे त्यांची मानसिक अवस्था स्थिरस्थावर झालीय. म्हणून त्यांना जास्त काही बोललो नाही आम्ही. त्यांना ऑफिसमधेच बसायला सांगून तडक तुमच्याकडे आलो. तुम्हीच त्यांना कल्पना द्या. आमचा प्रयोग पूर्ण झाल्या-शिवाय त्यांना आश्रम सोडून जाता येणार नाही.

बाजीराव : मी थोडं बोलू का?

योगिराज : बोला...

बाजीराव : तिच्या इच्छेविरुद्ध तिला इथे अडकवून ठेवण्यात काय अर्थ आहे?

झाले इतके हाल पुरे नाही का झाले तिचे ? आणखी ही शिक्षा का ?

योगिराज : अपराध तुमचा म्हणून शिक्षा त्यांना. तुमच्या मनावर तुमचा ताबा नाही. एकदा त्या आमच्या नजरेसमोरून गेल्या की तुम्ही या ना त्या प्रकारानं त्यांच्याशी संपर्क साधणार. तुमच्या नेहमीच्या गलथानपणानं सगळ्या गोष्टी त्यांना सांगणार; आणि आम्ही तुमच्यासाठी आखलेल्या कार्यक्रमात व्यत्यय येणार. ते आम्हाला चालणार नाही.

बाजीराव : योगिराज, खरंच मी अगदी दुबळा माणूस आहे. तुमच्या या प्रयोगाला अगदी नालायक आहे. मी हात जोडून विनंती करतो तुम्हाला... तिला जाऊ द्या. घरी. मलाही जाऊ द्या. मी कान धरून सगळं कबूल करतो तिच्याजवळ. शपथेवर तुम्हाला सांगतो, माझी बायको जबाबदारी ओळखणारी आहे. ती एक शब्दसुद्धा बाहेर जाऊ देणार नाही यातला...

योगिराज : नो, दॅट वोन्ट डू !

बाजीराव : योगिराज, मला समजून घेण्याचा प्रयत्न करा. लग्न झाल्यापासून इथे येईपर्यंत चार दिवससुद्धा एकमेकांना सोडून राहिलो नाही आम्ही. त्यामुळे असेल कदाचित– मी तिच्यावर चिडायचो, वैतागायचो. अतिपरिचयामुळे अवज्ञा करायचो. पण आता पहिल्यांदा दुरावली मला ती; आणी तिची किंमत मला कळली. अहो, सवय झाली हो मला तिची. गलथान माणूस मी. पेशानं प्राध्यापक. प्राध्यापक म्हणजे व्यवहारी अपूर्णांक. त्यात स्वतःला मनानं कलावंत समजायचो मी. म्हणजे व्यवहारी अपूर्णांक नाही; तर अव्यवहारी पूर्णांक ! नेटका संसार काय, पण नेटके कपडेसुद्धा करता आले नसते कधी. ती होती म्हणून निभावली. बायकोशिवाय चालणंच शक्य नाही माझं.

योगिराज : तसंच असेल तर दुसरी एखादी बायको करून घ्या.

बाजीराव : मग हिलाच काय झालं ?

योगिराज : ही तुमची पूर्वाश्रमीची बायको आहे. मिसेस पळपुटे म्हणून ती सर्वांना माहीत आहे. या जीवनात ती चालणार नाही !

बाजीराव : मग दुसरी कोणतीही बाई बायको म्हणून मला चालणार नाही !

योगिराज : बायको म्हणून नको असेल तर नुसती बाई म्हणून ठेवा !

बाजीराव : अहो, ठेवलेल्या बाईला बायकोची सर येईल का कधी ?

योगिराज : काय फरक पडणार आहे ? नगाला नग असला म्हणजे झालं.

बाजीराव : योगिराज, तुम्हाला कधी बायको होती? कधी बाई ठेवलीत तुम्ही?

योगिराज : डोंट टॉक रॉट!

बाजीराव : अहो, इतर गोष्टी सोडा; पण बायको नवऱ्यावर ज्या चवीनं खेकसते तसं खेकसता तरी येईल का तिला?

योगिराज : तसं खेकसण्यासाठी ज्यादा पगार कबूल करू आपण तिला.

बाजीराव : योगिराज, ते ताकापुरतं रामायण. बायको हक्काच्या नवऱ्यावर ट्वेन्टी फोर अवर्स ड्यूटी बजावते. ओव्हरटाइम न घेता. ऑनररी! ती नॅचरल धार भाडोत्री बाईच्या शब्दांना कशी येणार!

योगिराज : मग, आता उपाय एकच आहे. तुम्ही तुमच्या बायकोशीच पुन्हा लग्न करा.

बाजीराव : व्हॉट?

योगिराज : नव्या नावानं. पूर्वजीवनाची तिला तिळमात्र कल्पना न देता. बळवंत दुधाट म्हणून तुम्ही तिच्याशी लग्न करा!

बाजीराव : पण बंड्या दुधाट हाँगकाँगमध्ये जिवंत आहे ना! इथले लोकही त्याला ओळखतात.

योगिराज : नाटकाच्या करिअरसाठी असलं गद्य नाव बदलून दुसरं नाव घेणार असं तिला सांगून नाव बदला. बळवंत दुधाट हे नाव गुप्त ठेवण्याची ताकीद द्या तिला.

बाजीराव : घोळ आहे. सगळा घोळ आहे.

योगिराज : प्रोफेसर, आम्ही आऊट ऑफ द वे जाऊन तुमच्यासाठी इतकंच करू शकतो.

बाजीराव : पण योगिराज...

योगिराज : ऐकून घ्या. आज आम्ही आमची बाजू स्पष्टपणानं तुमच्यापुढे मांडायचं ठरवलेलं आहे. आम्ही अमेरिकेत दहा वर्षे काढली. योगमार्गाच्या प्रसारार्थ. अनेक अनुयायी मिळवले. कुणी लक्षाधीश व्यापारी– कुणी राजकारणी–कुणी गायकवादक–तर कुणी चित्रपट कलावंत. जास्त जास्त भरणा असे तो हिप्पी संप्रदायातल्या तरुण तरुणींचा. मन:शांती आणि शाश्वत सुखाची ओढ सर्वांना. पण सर्व वरवर पोहणारे. खोल तळाशी जाण्याची इच्छा कुणातच दिसली नाही. अनेक फॅडस् असतात त्यात एक आमचा प्रयत्नही

जमा व्हायची पाळी आली. पण आम्ही निराश झालो नाही. कारण, निराश मानवाला आशेचा किरण दाखवणं हे तर आमचं जीवितकार्य. प्रचंड विचार-मंथनातून आम्ही हा नवजीवनाचा, सर्वांच्या पचनी पडू शकेल असा, मार्ग शोधून काढला. अमेरिकेत हॉवर्ड हेस फाऊंडेशन म्हणून मानवाच्या शाश्वत सुखासाठी प्रयत्नशील असलेली एक धनाढ्य संस्था आहे. आम्ही आमच्या प्रयोगाची कल्पना या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना सांगितली. त्यांनी एकाच अटीवर आमच्या प्रयोगासाठी अनुदान देण्याचं मान्य केलं. भारतात जाऊन आम्ही किमान बारा व्यक्तींवर नवजीवनाचा प्रयोग करावा...प्रयोग पूर्णांशानं यशस्वी होऊन या बारा व्यक्ती नव्या जीवनात सुखी झाल्या असं अनुभवाला आलं, तर दोन कोट रुपयांइतकी मदत द्यायला फाऊंडेशन तयार आहे.

**बाजीराव** : दोन कोट ?

**योगिराज** : म्हणून आम्ही हा खटाटोप चालवला. हा आश्रम उभारला. भारता-तल्या आणि परदेशातल्या आमच्या अनुयायांच्या मदतीनं हजारो रुपये ओतले. मनुष्यबळ मिळवलं. प्रचारयंत्रणा, वैद्यकीय विभाग, शस्त्रक्रिया विभाग, हे सर्व उभारलं. कशासाठी ? फक्त मानवाला सुखाचा सोपा मार्ग सापडावा म्हणून. जन्मभराची आमची हीच आकांक्षा. ती पूर्ण व्हावी हाच असला तर यामागचा स्वार्थ. पण भारतात निरपेक्ष मानवसेवेचं चीज नाही. प्रयोगासाठी मोठ्या मुष्कि-लीनं बारा जण आम्ही मिळवले. पण बारांच्या बारा तऱ्हा निघाल्या. एका ठराविक टप्प्यापुढे आमचा प्लॅन सरकणं अशक्यप्राय होऊन बसलं. पुढच्या योजना तशाच राहिल्या. जीव मेटाकुटीला आला. प्रोफेसर, आमचा जीव मेटाकुटीला आला. ( क्षणभर थांबून ) पण आम्ही स्वस्थ बसणार नाही. प्रसंगी वज्रकठोर होऊ; पण पराभूत होणार नाही ! ही आमची प्रतिज्ञा आहे प्रोफेसर. (उठतो) तुमच्या सौभाग्यवतींना आम्ही इथे पाठवून देतो. त्यांच्याशी धोरणानं बोलून लग्नाचं ठरवून टाका. म्हणजे तुमचे सर्व वैयक्तिक प्रश्न सुटतील; आणि तुमच्यासाठी आम्ही ठरविलेला नवजीवनाचा कार्यक्रम हाती घेता येईल. शक्यतोवर शांतपणानं, समजुतीनं, सहानुभूतीनंच आम्ही वागू. अगदी नाइलाज झाला तरच वाम मार्गाचा अवलंब होईल. हरि ॐ तत्सत् !

[ योगिराज जातात. बाजीराव किंकर्तव्यमूढ होतो. विमल प्रवेश करते. ]

विमल : तो दीडशाहाणा कुठाय ?

बाजीराव : कोण ?

विमल : जयंत. दुसरा कोण दीडशहाणा असणार इथे ? असला तर अर्धा शहाणा असेल ! वचताय काय असे ? खाली बसा !

बाजीराव : हो...( मटकन बसतो. )

विमल : कुठाय तो ?

बाजीराव : इथेच आहे. मी हाक मारतो. ( उठतो )

विमल : खाली बसा !

बाजीराव : हो. ( बसतो )

विमल : काय हो...यांचे मित्र होता ना तुम्ही ?

बाजीराव : अं – हो.

विमल : हो ! काय हो, मित्राच्या बायकोपोराशी असं वागतात ? त्यांना बोलावून घेतलंत – कैद्यासारखं डांबून ठेवलंत. ही काय रीत झाली ? बोला ना...... आता का दातखीळ बसली ?

बाजीराव : मी बोलतो. पण तुम्ही जरा हळू —

विमल : का ?

बाजीराव : तुमचा आवाज जरा —

विमल : काय झालंय माझ्या आवाजाला ?

बाजीराव : कु – कुठे काय ? चांगला ठणठणीत आहे. पण व्हॉल्यूम जरा कमी केलात तर मला थोडं मोकळेपणानं बोलता येईल. म्हणजे काय, की कुणी मोठ्यानं ओरडायला लागलं की मला नर्व्हस व्हायला होतं.

विमल : म्हणजे मी मोठ्यानं ओरडते आहे ?

बाजीराव : न – नाही. तुम्ही नेहमीसारख्याच बोलताय. पण मलाच ते ओरडल्यासारखं वाटतंय. बरेच दिवसात सवय मोडली ना....

विमल : काय ?

बाजीराव : नाही नाही. म्हणजे मला असं म्हणायचंय की हॉ – हॉंगकॉंगवर जपाननं बॉंबहल्ला केला ना, तेव्हा तिथेच होतो मी. सारखे बॉंब फुटायचे. तेव्हा सवय होती त्याची. पण त्यानंतर आवाज म्हटला की नर्व्हस होतो मी. नॉर्मल आवाजात कुणी बोललं ना, तरी बॉंब फुटल्यासारखं वाटतं मला. तुमची

काही चूक नाही. तुम्ही बोला. अगदी तुमच्या नॉर्मल आवाजातच बोला.

**विमल** : बोला काय? बोलणारच आहे. काय हो! हा योगिराज कोण? त्यानं का डांबून ठेवलंय आम्हाला इथे? आमच्या घरी जायला आम्हाला मज्जाव करणारे तुम्ही कोण?

**बाजीराव** : आम्ही?

**विमल** : हो! हो! तुम्ही. तुमचा सुद्धा हात असला पाहिजे या बनावात. मला काही समजणार नाही असं वाटलं तुम्हाला? ऑं? खरं सांगा. तुम्ही कोण?

**बाजीराव** : म – म – मी?

**विमल** : मे मे मे करू नका. मुकाट्यानं सांगा. तुम्ही खरे कोण? नाही तर याद राखून ठेवा बच्चंजी...गाठ माझ्याशी आहे! (कंबरेवर हात ठेवून उभी राहते)

**बाजीराव** : प्लीज, प्लीज – हे पाहा, तुम्ही हवं तितकं ओरडून बोला. पण अशा कंबरेवर हात ठेवून ओरडू नका.

**विमल** : का?

**बाजीराव** : आता का? अहो, हात दुखतील तुमचे.

**विमल** : दुखू देत. हात माझे आहेत...कंबर माझी आहे. मी अशीच उभी राहणार!

**बाजीराव** : पण तुम्ही अशी पोझ घेतली की माझी कंबर खचते ना इकडे!

**विमल** : का — कंबर खचायला काय झालं?

**बाजीराव** : बायकोची आठवण झाली. ती अशीच कंबरेवर हात ठेवून दम भरायची.

**विमल** : अस्सं! बायको कुठंय तुमची?

**बजीराव** : अं – त – त – प – बायको...बायको नाही आता...

**विमल** : बायको नाही आता? म्हणजे?

**बाजीराव** : म्हणजे ती आहे – पण तरी देखील नाही.

**विमल** : याचा अर्थ ब्रह्मदेवाला तरी समजेल का?

**बाजीराव** : अर्थ सरळ आहे...म्हणजे ती वारली.

**विमल** : (एकदम ओरडून) काय? वारली?

**बाजीराव** : (दचकून) नाही नाही. ती नाही वारली. मी वारलो.

**विमल** : उठा!

बाजीराव : अं ?

विमल : उठा म्हणते ना! आधी डॉक्टरांच्याकडे चला. माझ्यापेक्षा तुम्हालाच डॉक्टरची जास्त गरज आहे.

बाजीराव : नाही–डॉक्टरची काही गरज नाही. मी फक्त थोडासा गोंधळलोय. बाकी काही नाही. मला तुम्हाला सगळं सांगायचंय. पण तुम्ही थोडं खाली बसून स्वस्थपणानं ऐकून घ्याल का ? प्लीज !

विमल : ऑल राइट. ( बसते ) बोला....

बाजीराव : विमलाबाई, माझ्या डोक्यात सगळा गुंता झालाय; त्यामुळे बोलताना घोटाळा होतोय सगळा. अगदी स्पष्टच सांगायचं म्हणजे, माझी बायको वारली नाही...जिवंत आहे.

विमल : अस्सं ! कुठे असतात तुमच्या मिसेस ?

बाजीराव : अं ? ( किंचित गोंधळून ) तिकडे हाँगकाँगला.

विमल : हाँगकाँगला ? अस्सं ! आणि तुम्ही इकडे काय करताय मग ?

बाजीराव : मी ? मी तिला तिथेच सोडून आलो. कायमची.

विमल : म्हणजे ? तिला सोडून पळून आलात ?

बाजीराव : तसं म्हणा हवं तर. पण तिचा माझा संबंध तुटलाय. कायमचा !

विमल : का ?

बाजीराव : प्लीज....तुम्ही असे प्रश्न विचारू नका सारखे सारखे. माझ्या डोक्यात आधीच गोंधळ झालाय– सगळ्याच प्रश्नांची उत्तरं देता येणं शक्य होत नाही कधी कधी...

विमल : तरी पण का ? का अशी तोडली तुम्ही तिला ?

बाजीराव : ( वैतागून ) तोडावीसं वाटलं म्हणून तोडली. बस् !

विमल : तुमचं तिच्यावर प्रेम नव्हतं ?

बाजीराव : नाही. तसं नाही.

विमल : तुम्हाला ती आवडत नव्हती ?

बाजीराव : तसंही नाही.

विमल : कुरूप होती ? तुम्हाल साजेशी नव्हती ?

बाजीराव : नाही नाही....

विमल : संसारी नव्हती ? सुग्रण नव्हती ? स्वतःच्या कर्तव्याला चुकली कधी ?

बाजीराव : ओ गॉड–ओ गॉड !

विमल : तुमच्याशी बेइमान झाली ? कुणा परपुरुषाच्या नादी लागली ? पत्नी-धर्माला कलंक लावला तिनं ?

बाजीराव : तुम्ही काय बोलता हे ! गंगाजळासारखी पवित्र होती हो ती.

विमल : मग वांझोटी तरी असली पाहिजे.

बाजीराव : नाही हो –दोन मुलं झाली आम्हाला.

विमल : आणि तरी तिला सोडून पळून आलात तुम्ही ? का ? सुंदर होती; कर्तृत्ववान होती; एकनिष्ठ होती; दोन लेकरांची माय होती. मग का त्या माउलीचा गळा कापलात असा ? मागे तिचं काय होईल, ती कसे दिवस काढील, पोराबाळांचं काय करील....कशाचा कशाचा विचार आला नाही तुमच्या मनात ? लग्नाची बायको होती ना ती ? सुखदुःखात साथ देणारी....जन्माची जोडीदारीण होती ना ? दोन घडीच्या चैनीसाठी ठेवलेली बाजारबसवी तर नव्हती ! तिला कायमची तोडली असं सांगताना काही काही लाज वाटत नाही तुम्हाला ?

बाजीराव : वाटते–वाटते. लाज वाटते माझी मलाच. पण...व्हायचं ते होऊन गेलं. का झालं–कसं झालं हा सगळा काथ्याकूट आता निरर्थक आहे.

विमल : का ? असं का म्हणता ? अजूनही काही फारसं बिघडलेलं नाही. अजूनही तिच्याकडे परत जाऊ शकता तुम्ही.

बाजीराव : नाही हो. इतकं सोपं असतं तर मग काय पाहिजे होतं आणखी ! पण हे एखाद्या कोड्यासारखं झालंय. उकल कळला तर किती सरळ सोपं वाटतं कोडं ! पण तो कळण्याआधी कोडं कोडंच राहतं. अगम्य – न सुटणारं. तसंच आहे हे सगळं....वरवर दिसायला सोपं, सरळ. पण सुटायला फार अवघड. विमलाबाई, तुमच्या समोरही या क्षणाला असंच एक कोडं आहे. तुमच्यासारखी बायको मिळूनही तुमच्या नवऱ्यानं आत्महत्या का केली, असा प्रश्न मी तुम्हाला विचारला, तर उत्तर देऊ शकाल तुम्ही ?

विमल : हो —

बाजीराव : कोणतं ?

विमल : आधीच्या माझ्या प्रश्नाचं तुम्ही जे उत्तर द्याल तेच. त्या उत्तरातच आपल्या दोघांच्याही प्रश्नाचं उत्तर सापडेल तुम्हाला.

बाजीराव : हं. उत्तर तसं सोपं आहे, विमलाबाई. पण सोपं असलं तरी समजा-

यला अवघड आहे. आणि समजलं तरी उमजायला त्याहून अवघड आहे. छोट्या छोट्या गोष्टी. संसारातले नेहमीचे छोटे छोटे संघर्ष. आता त्यापासून तुटून अलिप्त झाल्यावर तर आणखीच छोटे होणारे — निरर्थक, क्षुल्लक, निरुपद्रवी वाटणारे. पण जवळ असताना तेच किती मोठे भासतात. बाटलीतल्या राक्षसासारखे, मनाच्या वाफेबरोबर फुगत जातात; अक्राळविक्राळ होतात; आणि आपलं छोटंसं विश्व व्यापून टाकतात. मनाचा खेळ असतो सारा. पण माणूस वैतागून जातो; भेदरून जातो; काऊन जातो!

**विमल** : आणि खेळ अर्धा टाकून पळ काढतो!

**बाजीराव** : हो. शेवटी आपण सर्व तसे भेकडच असतो. अविवेकी असतो. स्वतःच्या पायाशी पाहाणारे असतो. लढून रक्तबंबाळ होण्यापेक्षा पळून चामडी बचावणं जास्त पसंत करतो!

**विमल** : भ्याडपणाला शोभणारंच समर्थन आहे हे! संसाराच्या तव्यावर सगळ्यांचेच हात पोळत असतात. म्हणून सगळेच काही तुमच्यासारखे चूल पेटती ठेवून जात नाहीत!

**बाजीराव** : संसाराच्या मायामोहाचे दोर तुटता तुटत नाहीत. चुलीला बांधून ठेवतात. हात होरपळून निघत असतात. पण माणूस जागच्याजागीच बांधलेला राहातो. तशातही क्वचित एखाद्याचे बंध तुटलेच...पळण्याची संधी त्याला मिळालीच... तर तो पळाल्याशिवाय राहत नाही. निदान मला तशी संधी मिळाली आणि मी पळालो.

**विमल** : कशासाठी? पुन्हा विचारते — कशासाठी?

**बाजीराव** : : कशासाठी? त्या क्षणी कदाचित तुमच्या प्रश्नाचं उत्तर देणं सोपं गेलं असतं. पण आज म्हणाल तर माझ्याजवळ उत्तर नाही. आज माझ्या मनात उभा आहे तो हाच प्रश्न. कशासाठी? ही उलथापालथ कशासाठी? (डोक्यावरून हात फिरवतो)

**विमल** : निदान, असा प्रश्न तरी उभा राहिला ना तुमच्या मनात? नशीब! आता असंच आणखी काही वेळ डोकं खाजवीत बसा, म्हणजे उत्तरही तुमचं तुम्हालाच सापडेल!

**बाजीराव** : माझ्यापुरतंच म्हणाल तर मी उत्तर शोधून काढलेलं आहे.

**विमल** : अस्सं! काय उत्तर सापडलं?

बाजीराव : झालं ते सगळं अक्कलखाती जमा करायचं– आयुष्याचं नवं पान सुरू करायचं.

विमल : आणि मागच्या पानाचं काय ?

बाजीराव : ते उलटून टाकायचं.

विमल : पान उलटायचं, पण हिशेब मात्र मागच्या पानावरून पुढच्या पानावर तसेच चालू ठेवायचे, असंच ना ?

बाजीराव : छे–छे, सगळं नव्यानं सुरू करायचं. नवं पान, नवा जमाखर्च.

विमल : आणि मागची देणी कोण फेडणार ?

बाजीराव : त्याचा विचारच करायचा नाही. त्या पानावर आपल्या अकलेचं दिवाळं निघालं असं समजायचं !

विमल : असं प्रत्येक पानाच्या शेवटी दिवाळं काढीत राहणार तुम्ही ?

बाजीराव : छे छे–हे व्यापारातलं दिवाळं थोडंच आहे ! हे अकलेचं दिवाळं ! हे एकदाच, द लास्ट ॲण्ड द बेस्ट !

विमल : हं. शेवटी एवढी समज आली म्हणायची ! छान ! आता हॉंगकॉंगला परत जा. बायकोपुढे नाक घासा आणि कानाला खडा लावून नेटक्या संसाराला लागा. आणि सगळा ताळमेळ जमला म्हणजे मला पत्र पाठवून कळवा.

बाजीराव : छे छे–हॉंगकॉंगला कशाला जायचं ?

विमल : म्हणजे ?

बाजीराव : म्ह–म्हणजे माझं हॉंगकॉंग इथेच आहे.

विमल : म्हणजे ?

बाजीराव : नवं नाही; जुनंच आहे. तुमच्या काहीच कसं लक्षात येत नाही हो ? विमलाबाई, मी...आता कसं सांगू तुम्हाला...अहो, मी नवं पान उघडायचं म्हणतोय ना ? त्या पानावर खातं उघडायचं ते...ते तुमच्या नावावरच...

विमल : म्हणजे ? लग्नाची मागणी घालता आहात तुम्ही मला ?

बाजीराव : अं ? हो. जवळजवळ तसंच.

विमल : दुसऱ्यांदा ?

बाजीराव : दुसऱ्यांदा ?

विमल : पहिली मागणी हॉंगकॉंगला विसरून आलात. आता ही दुसरी.

बाजीराव : दुसरी कुठली ? पहिलीच. मागणी पहिलीच. फक्त मी रिपीट करतोय

दुसऱ्यांदा.

**विमल** : आणि पहिलीचं काय ?

**बाजीराव** : ते विसरून जा विमलाबाई. ते प्रकरण आता डोक्यातून काढून टाका. खरं प्रकरण हेच !

**विमल** : या प्रकरणात मी सामील होईन असं वाटलं तुम्हाला ? त्या बिचारीचा केसानं गळा कापलात. तिला फसवलंत...तिचा अपमान करून पळून आलात इथे. असल्या उथळ, बेजबाबदार, भेकड पुरुषाकडे कुठलीही स्त्री ढुंकूनसुद्धा पाहणार नाही ! समजलात ?

**बाजीराव** : दुसऱ्या स्त्रियांशी मला काय कर्तव्य आहे ? मी तुम्हाला सांगतोय. विमलाबाई, विचार करा – तुम्ही एकट्या आहात. तुम्हाला कुणाचा आधार नाही...त्यात जयंतसारख्या वेफाट मुलाची जबाबदारी आहे तुमच्यावर.

**विमल** : माझी जबाबदारी उचलायला मी समर्थ आहे ! माझी काळजी तुम्हाला नको ! मी तुमच्यासारख्या बांगड्या भरलेल्या असल्या हातात तरी माझ्या बांगड्या तुमच्या हातातल्या बांगड्यांइतक्या कच्च्या नाहीत ! चांगल्या बावन्नकशी आहेत ! म्हणे तुमच्यावर जबाबदारी आहे ! तुम्हाला आधार नाही ! म्हणून तुमच्याशी लग्न करून आधार घेऊ ? असला सडकाकुजका आधार ? जबाबदारीला भिऊन पळून जाऊ ? असल्या भेकड पळवाटा शोधायला मी म्हणजे तुम्ही नाही ! चांगली खंबीर आहे ! कंबर कसून स्वतःच्या पायावर उभी राहीन ! जयंतला ताळ्यावर आणीन. शिकवीन. मोठा करीन. सगळं करीन. रडत बसणार नाही; की पाय पाठीला लावून पळणार नाही ! दुःखाचा कोंडा नशिबानं पुढे ठेवला तरी त्याचा मांडा करून कसा खावा, हे आम्हा बायकां-पासून शिका तुम्ही !

**बाजीराव** : ते शिकावं म्हणूनच मी तुम्हाला --

**विमल** : मला कशाला ? तुम्हाला शिकवणारी वाट पाहाते आहे तिकडे हाँग-काँगमधे.

**बाजीराव** : (वैतागून) हाँगकाँग – हाँगकाँग – किंगकाँगसारखा मानगुटीला बसलाय हा हाँगकाँग ! विमलाबाई, आता – (एकदम गप्प होतो. मग निश्चयानं) विमल, मी जिवंत आहे.

**विमल** : हो. जिवंत आहात; पण मेल्यात जमा !

बाजीराव : तरी देखील मी जिवंत आहे. मी आत्महत्या केली नाही. अग — अग मी बलवंत दुधाट वगैरे कुणी नाही. मी प्रोफेसर बाजीराव पळपुटे. तुझा नवरा.

विमल : ( शांतपणे ) इतकी साधी, सोपी, सरळ गोष्ट सांगायला इतका वेळ लागला तुम्हाला ?

बाजीराव : ( चक्रावून ) अं ?

विमल : सुरुवातीला कबूल केलं असतं तर चाललं नसतं ?

बाजीराव : म्हणजे आधीपासून ओळखलं होतंस तू मला ? अगदी थेट तू इथे आल्या दिवसापासून ?

विमल : त्या दिवशी काय झालं, नीटसं आठवत देखील नाही मला.

बाजीराव : मग कधी कळलं तुला ?

विमल : आजच. योगिराज मला त्यांच्या ऑफिसमधे बसवून बाहेर पडले आणि थोड्या वेळान गजाभाऊजी तिथे आले. त्यांनी मला पाहिलं — मी त्यांना पाहिलं. दोघंही दचकलो — क्षणभर गोंधळलो. आश्चर्यानं मी काही बोलणार इतक्यात त्यांनी मला थांबवलं आणि म्हणाले, ' वहिनी, आता लपंडाव खेळण्यात अर्थ नाही. जयंतानं मला ओळखलं. तुम्हीही ओळखलंत. मी तुम्हाला सगळं काही सांगून टाकतो.' आणि त्यांनी सगळं सांगितलं.

बाजीराव : हं. म्हणजे आतापर्यंत जे शालजोडीतले लगावलेस ते डायरेक्टली मलाच होते ! व्हाया बलवंत दुधाट वगैरे काही नाही !

विमल : कोण कुठले दुधाट ? एका परक्या माणसाशी बोलताना अशा भाषेत बोलले असते मी ?

बाजीराव : खरंच...भाषेच्या वजनावरून तरी लक्षात यायला पाहिजे होतं माझ्या. असली धारदार वजनदार भाषा फक्त नवऱ्यासाठीच राखून ठेवतात बायका !

विमल : ठेवावीच लागते. त्याशिवाय टाळकी ठिकाणावर येत नाहीत तुमची ! अगबाई, खरंच — टक्कलावर केस कसे हो उगवले तुमच्या ?

बाजीराव : केस कसले उगवले ? केसाचा टोप आहे हा !

विमल : आणि चष्म्याशिवाय दिसायला कसं लागलं ?

बाजीराव : कॉंटॅक्ट लेन्सेस लावल्या.

विमल : चेहराही स्मार्ट झालाय बराच !

बाजीराव : प्लॅस्टिक सर्जरी.

विमल : पोटही कमी झालंय !

बाजीराव : योगासनं — डाएट.

विमल : अयाई ! कित्ती कष्ट घेतलेत हो हे !

बाजीराव : कष्टाचं सोड. योगिराजांच्या प्रयोगानं बाकी काही साधलं नसलं तरी या कायापालटाच्या बाबतीत ए वन् काम झालं की नाही सांग ! पूर्वी तू आणि मी जोडीनं फिरायला निघालो की कॉलेजातली कार्टी काय म्हणायची आठवतंय ना ? डबाबाटली ! बुड्ढा घोडा लाल लगाम ! आता बघा म्हणावं लेकांनो ! बुड्ढा घोडा नाही — एकदम रेसहॉर्स !

विमल : तुमची घोडदौड इथेच थांबली हे नशीब ! आणखी थोडा कायापालट केला असतात तर जयंतचा धाकटा भाऊ समजायला लागले असते लोक तुम्हाला !

बाजीराव : बघ. झाली पुन्हा सुरुवात ?

विमल : काय हो...हे सगळं करायलाच हवं होतं ? त्यावाचून काही उणं पडलं होतं संसारात ?

बाजीराव : अग, नट व्हायचं होतं ना मला !

विमल : मग का नाही झालात नट ?

बाजीराव : होऊ घातलोच होतो, पण धीर खचला. वाटलं, आता उशीर झालाय. इट्स् टू लेट ! मध्ये संसारात गुरफटलो, स्थैर्याची सवय झाली. तुझी सवय झाली. आता हे सगळे दोर तोडून नटाचं कलंदर आयुष्य आपल्याला परवडणार नाही.

विमल : म्हणजे तिथूनही पळ काढलात ! हं : ! भित्रा माणूस दुसरं काय करणार !

बाजीराव : माझे आई, आता बस् ना. माणसाच्या मनात खोल कुठेतरी दडून बसलेली एखादी महत्त्वाकांक्षा असते. चुकून कधी ती पूर्ण होण्याची संधी दिसली तर हुरळून जाऊ शकतो तो. इट्स् व्हेरी ह्यूमन. माणसाला काय महत्त्वाकांक्षा असूच नये ? ती पूर्ण करण्यासाठी त्यानं एखादा जुगार खेळूच नये ?

विमल : असावी ना ! महत्त्वाकांक्षा असावी ! तिच्यासाठी प्रसंगी जुगार खेळण्याची धमकही असावी. पण कुणाला ? ज्याच्या अंगात तेवढी कुवत आहे

त्याला. तुमच्या अंगात तेवढी कुवत असती तर आयुष्याच्या सुरुवातीलाच त्या महत्त्वांकाक्षेला वाहून घेतलं असतंत तुम्ही. त्या एका ध्येयासाठी सर्वस्व पणाला लावलं असतंत. कदाचित आतापर्यंत यशाच्या शिखरावरही जाऊन बसला असतात. पण तुम्ही भित्रे! त्या जुगारातला अपयशाचा धोका पत्करण्याचं धैर्य तुमच्यात नव्हतं, म्हणून तुम्ही चारचौघांसारखा बिनधोक्याचा धोपट मार्ग पत्करलात. आता त्या मार्गानं तरी मुकाटपणानं खाली मान घालून जायचं की नाही? तर तेही नाही. तुम्हाला महत्त्वाकांक्षेचे भिकार डोहाळे! भित्रेपणा स्वतःचा, अपयश स्वतःचं, पण त्याचा राग जगावर! आणि जगावर राग काढण्याचंही धैर्य नाही म्हणून घरच्या बायकोपोरावर! घरच्या म्हातारीचे काळ तुम्ही! बाहेर शेळी, घरात वाघ! सारखी गुरगुर, धुसफूस! कुसळाचं मुसळ करणार आणि एवढ्यातेवढ्या कारणावरून बायकोपोरांना झोडपणार! सुखाचं ताट समोर; पण प्रत्येक घासाची राख करून डोक्यात घातलीत तुम्ही! स्वतःच्या आणि आमच्याही!

**बाजीराव :** हे बघ, हे असलं बोलणं थांबवणार नसलीस तर या वेळी मात्र खरोखरच समुद्रात उडी मारून आत्महत्या करीन मी!

**विमल :** करा – खरंच करा!

**बाजीराव :** तुला चेष्टा वाटते? माझ्यात तेवढं धाडस नाही असं वाटतंय तुला?

**विमल :** आहे ना! खूप धाडस आहे! आणि ते धाडस का आहे याचं कारणही माहीत आहे मला.

**बाजीराव :** का?

**विमल :** कारण, महाबळेश्वरला समुद्र नाही हे नक्की माहीत आहे तुम्हाला.

**बाजीराव :** पण उंचउंच कडे तर आहेत ना? कड्यावरून उडी मारीन! समजलीस काय?

**विमल :** मारा ना! थांबलात कशासाठी?

**बाजीराव :** थांबलो कुठे? हा निघालो (तणतणत)! हे रोजचं घालूनपाडून बोलणं ऐकण्यापेक्षा एकदाचा मेलेला काय वाईट! (दरवाजापाशी जाऊन थबकतो) अच्छा बाय बाय....

**विमल :** बाय बाऽऽय!

**बाजीराव :** आता आपली भेट पुढच्या जन्मी!



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.

विमल : नक्की भेटा! नाहीतर पत्ता लिहून कळवा. मी येऊन भेटेन!

बाजीराव बाऽऽय!

विमल : टा टा!

बाजीराव : (दरवाजाच्या किंचित बाहेर जाऊन परत फिरतो.) तुला काहीच म्हणायचं नाही? मी रस्त्यापर्यंत पोचलोय.

विमल : जाताना तेवढा दरवाजा लोटून घ्यायला विसरू नका. नाहीतर वाईत विसराल. हा रस्ता सरळ कड्याकडेच जातो.

बाजीराव : (तिच्या जवळ येत) हे बघ, मला हा उगीच प्रेस्टीज इश्यू करायचा नाही. 'जाऊ नका' असं तू नुसतं फॉर्मली म्हणालीस तरी मी जाणार नाही.

विमल : हे पाहा, उगीच तुमचा मौल्यवान वेळ वाया घालवू नका. तिकडे तुमचं उंच ध्येयशिखर वाट पाहातंय तुमची!

योगिराज : हरि ओम् तत्सत्!

[दोघे भानावर येऊन दूर होतात.]

योगिराज : माय कॅांग्रॅच्युलेशन, मिस्टर दुधाटे!

बाजीराव : दुधाटे नाही, योगिराज. प्रोफेसर पळपुटे!...

[विमल व प्राध्यापक एकमेकांकडे पाहून स्मित करतात.]

योगिराज : आय सी—आय सी – शेवटी जे होऊ नये ते झालंच!

बाजीराव : होय योगिराज. मी हिला सगळं सांगून टाकलं.

योगिराज : आः आम्हाला वाटलंच होतं—वाटलंच होतं! (अत्यंत प्रक्षुब्ध होऊन फेऱ्या मारू लागतो.) सगळे भ्याड—सगळे कमजोर—सगळे अवसानघातकी—

बाजीराव : शांत व्हा—शांत व्हा योगिराज—

योगिराज : शट् अप्, यू स्पाइनलेस कॉवर्ड—यू गटलेस वीकलिंग! (डोकं दाबून धरीत) ओ गॉड! ओ गॉड! (एकदम थांबून विमलकडे जाऊन) मिसेस पळपुटे, एक वर्षपर्यंत आमच्या नवजीवनाच्या प्रयोगासाठी आम्हाला तुमच्या नवऱ्याची गरज आहे. तावत्काळपर्यंत ते आमच्याच स्वाधीन राहतील.

विमल : काय?

योगिराज : फक्त ऐका. तावत्कालपर्यंत आपल्यालाही चिरंजिवासमवेत याच आश्रमात राहावं लागेल.

विमल : योगिराज, धमकी देताय तुम्ही? मला काय प्रोफेसर समजलात? एक

वर्ष काय; एक मिनिटसुद्धा यांना इथे राहू देणार नाही मी ! चला हो. असे वावळटासारखे पाहाताय काय ?... पुढे व्हा ! आत्ताच्या आत्ता हा आश्रम सोडून जायचंय आपल्याला...

योगिराज : प्लीज, प्लीज– मिसेस पळपुटे, आमच्या या महान प्रयोगाचं गांभीर्य.......

विमल : तुम्हाला काय महान प्रयोग करायचे असतील ते तुमचे तुम्ही करा. माझ्या नवऱ्याला मधे ओढायचं काम नाही ! सांगून ठेवते !

योगिराज : वेड्यासारखं करू नका. सबंध मानवजातीला संजीवनी देण्यासाठी चाललेली आमची ही तपस्या...

विमल : कसली कपाळाची संजीवनी देणार हो तुम्ही माणसाला ?

योगिराज : हरवलेलं सुख परत प्राप्त करून देणारी संजीवनी.

विमल : माणसाचं सुख हरवलं म्हणून कुणी सांगितलं तुम्हाला ?....

योगिराज : कुणी सांगायला कशाला पाहिजे ? आज अहोरात्र माणूस हाच टाहो फोडतोय. 'मला सुख सापडत नाही–मला सुख सापडत नाही !'

विमल : आणि ज्याचं त्याला जे सुख सापडत नाही ते तुम्ही त्याला मिळवून देणार ?

योगिराज : अर्थात् !

विमल : ते देऊनही माणूस सुखी होईल अशी खात्री आहे तुम्हाला ?

योगिराज : हवं ते मिळाल्यावर दुःखी असायचं कारणच काय ?

विमल : कारण, हवं ते मिळाल्यावरही नाही ते मिळवण्याची हाव सुटते माणसाला ! योगिराज, माणसाला जे हवं असतं ना, ते क्षितिजासारखं असतं. क्षितिजाकडे पाहिलं की वाटतं, हे काय, इथून फक्त दहा मैलांवर क्षितिज. तिथे पोचलो की आपण सुखी. त्या वेडानं दहा मैल तुडवतो आपण; आणि तरी क्षितिज काही पायाला लागत नाही ! ते गेलेलं असतं आणखी दहा मैल पुढं !

योगिराज : या निराशावादानंच माणसाला निष्क्रिय करून टाकलंय पार ! इतकी आकुंचित दृष्टी ठेवली की सुखाचं क्षितिज गाठणं केवळ अशक्यच !

विमल : ज्यानं त्यानं आपल्या दृष्टीने कुवत ओळखली–त्या दृष्टीत मावेल इतक्या वेतानं आपलं क्षितिज वेतलं–की काही कुठे धावपळ करायची गरज नाही. आपलं सुख आपल्याच पायाखालच्या जमिनीत उगवतं. पण आपण ते आपल्याच

पायांनी झाकून दृष्टी लावतो दूरच्या क्षितिजाकडे. आणि मग सुरू होतात असले सुखाच्या शोधाचे वांझोटे प्रयोग! असले प्रयोग करीत बसण्यापेक्षा योगिराज, हसण्याची कला शिकवणाऱ्या शाळा काढा गावोगाव. निराशेतही हसायला शिकला माणूस तर सुखाची अर्धीअधिक वाट सापडेल त्याला.

[ हे चालू असतानाच मागे गजा व रघू आलेले असतात. ]

**रघुनाथ** : ( पुढे येत– ) वहिनी म्हणतात ते अगदी खरं आहे योगिराज. असले सुखप्राप्तीचे प्रयोग काही उपयोगाचे नाहीत. असल्या कृत्रिम उपायांनी सुख हाती लागणार आहे का? वांझेच्या ओटीत कचकड्याची बाहुली ठेवली तर सुखी होणार आहे का ती कधी?

**योगिराज** : रघुनाथ, तू–तू हे बोलतो आहेस? तू सुद्धा!

**रघुनाथ** : होय योगिराज. असल्या वरवरच्या मलमपट्टीनं आतल्या वेदनेवर इलाज होत नाही! बाह्य परिस्थिती बदलली, वातावरण बदललं, नवं नावरूप आलं तरी आतला माणूस शेवटी तोच राहतो. रागलोभ, हेवादावा, मदमत्सर सगळं जसंच्या तसं उरतं. बदललेल्या परिस्थितीतही माणूस शेवटी स्वतःच्या हातानं तीच सुखदुःखं पेरीत असतो. अशा माणसानं कितीही जन्म बदलले तरी शेवटी तो तोच उरतो. सुख मिळवण्यासाठी म्हणून कशात बदल करणं आवश्यकच असलं, तर तो बदल माणसानं स्वतःमध्येच घडवून आणला पाहिजे योगिराज!

**योगिराज** : हरि ओम् तत्सत्! ( डोळे मिटून स्तब्ध होतो. )

**बाजीराव** : रघू, त्या सुपारीवाल्याचं काय झालं? त्यानंच खून केला तो?

**रघुनाथ** : नाही मित्रा. सुदैवानं तो प्रसंग टळला. माझे हात निष्कलंक राहिले. ती दोघं काल अचानक महाबळेश्वर सोडून मुंबईला गेली.

**बाजीराव** : थँक गॉड! पण तो खून झाला तो—

**रघुनाथ** : इथल्याच कुणा एका माणसाचा. ते सुपारीवाले मला म्हणत होते, एक हजार रुपये जास्त देणार असला तर मुंबईला जाऊन काम फत्ते करून येतो. मी नको म्हणून सांगितलं. आता वहिनी म्हणाल्या तसंच करायचं ठरवलंय मी. बस्! एकदा मोठ्यानं हसायचं आणि विसरून जायचं सगळं. बायको माझी; पण त्याच्या नशिबात होती. ठीक आहे. त्याला घेऊ दे. आपल्याला काय? तू नही और सही. और नही और सही....बस! लाफ ॲट

इट, फरगेट द व्होल डॅम थिंग! आणि प्रोफेसर, तुझ्या कुणी इंग्रजी कवीनं म्हटलं आहे :

नथिंग अॅट ऑल बट कॉमनसेन्स
कॅन एव्हर ऊइटस्टॅंड दिज हौज !

बस्; दॅटस् दॅट! (अभावितपणे डोळ्याच्या कडा पुसतो. तोंडावरचे हास्य कायमच आहे. स्वतःला सावरतो) चला. आयुष्यातलं एक पान उलटलं— निघायला पाहिजे आपल्याला इथून.

**बाजीराव** : हो. पण योगिराज—

**विमल** : योगिराज योगिराज काय करताय ? त्यांना आडवू तर दे आपल्याला! दाढी उपटून हातात नाही दिली तर बांगड्या भरणार नाही पुन्हा कधी या हातात! समजलात ?

**बाजीराव** : पाहिलंस ? पुन्हा कंबरेवर हात ठेवलेस! थोडं शांतपणानं घे—शांतपणानं घे—आणि थोडा वेळ गप्प राहा. प्लीज! (योगिराजांना) योगिराज—

**योगिराज** : (खचून गेलेला आहे) जा बाबांनो, जा. आम्ही तुम्हाला अडवीत नाही. अडवून उपयोगही नाही. इच्छा असली तरच मार्ग सापडतो. जिथे इच्छाच नाही तिथं मार्ग तरी कसा सापडणार ? रघू, तू म्हणालास तेच खरं. वांझेच्या ओटीत कचकड्याची बाहुली ठेवण्यात तिलाही सुख नाही; ठेवणाऱ्यालाही नाही! जा.. ज्या मार्गानं तुम्हाला सुख सापडेल त्या मार्गानं जा. आम्ही आमच्या मार्गानं जाऊ. जो आपखुशीनं हमराही होईल त्याला बरोबर घेऊन जाऊ. जा तुम्ही.

[खाली मान घालून बसतो. जयंत टेलरला घेऊन येतो. टेलर लोळागोळा झालेला आहे.]

**जयंत** : यार टेलर, आमचं भोजन फार महाग पडलं यार तुला. (एकदम थबकून) कमाल आहे. अंकल, पुन्हा तुमचा इथला दोस्त. डिट्टो गजाकाका!

**गजाभाऊ** : मेहेरबान, डिट्टो गजाकाका नाही. गजाकाकाच! खुद्द! शुद्ध—निर्भेळ गजाकाका!

**जयंत** : बापरे—म्हणजे, तुमच्या पाठोपाठ मी....

**बाजीराव** : होय त्याच्या पाठोपाठ....

**जयंत** : अंकल, तुम्ही—

बाजीराव : अंकल नाही, तुझा बाप !

जयंत : आयला ! म्हणजे मॉम, तू अंकलशी....वंडरफुल ! झकास. नाहीतरी डॅडींची गादी चालवायला कुणीतरी पाहिजेच होतं ! अंकल, तुम्ही गादीवर आलात, आनंद वाटला. चला. आपण एका मोठ्या जबाबदारीतून सुटलो !

बाजीराव : चिरंजीव –

जयंत : नो नो नो ! अंकल, चिरंजीव बिरंजीव म्हणायचं नाही आपल्याला ! मॉमवर लाईन टाकलीत तर तो साला तिचा खाजगी प्रश्न आहे. पण मॉमशी जमवलंत म्हणून डॅडींच्या पेटंट स्टायलीत आपल्याला चिरंजीव वगैरे म्हणायची चालबाजी नाय मंगता ! सांगून ठेवतो ! आता आपण कुणाचे चिरंजीवबिरंजीव काही नाही ! आता आपण चिलमचे आणि चिलम आपली !

विमल : जया, शुद्धीवर आहेस का तू ? कुणासमोर काय बोलावं याची काही अक्कल ? तुझे पूर्वीचेच डॅडी आहेत हे...

जयंत : आयला– गजाकाका आणि डॅडी– वारले नाहीत ? म्हणजे फुकटच रडलो त्या दिवशी इतकं....

विमल : जया, मेल्या तुझ्या जिभेला काही हाड....चल ऊठ. आधी पाय धर यांचे....

बाजीराव : असू द्या. असू द्या. निघायचंय ना आपल्याला ?

विमल : जयंत, चल, हो पुढे —

जयंत : चल ? कुठे ?

विमल : कुठे म्हणजे काय ? आपल्या घरी.

जयंत : सॉरी मॉम. आता हे उघडंबोडखं जग म्हणजेच आमचं घर ! ही चिलम म्हणजेच आमच्या सुखाची गुरुकिल्ली !

विमल : जया गघड्या – ( रागाने चिलीम फेकून देते )

जयंत : आयला मॉम, धिस इज टू मच हां !

विमल : तू आता मुकाट्यानं येतोस की थोबाडीत ठेवून देऊ एक ?

जयंत : थोबाडीत ? आय से –

विमल : आधीच थोबाड रंगवायला पाहिजे होतं; म्हणजे हे चाळे सुचले नसते. चल ऊठ ! ( कान धरून उठवते. )

जयंत : आय से मॉम–

विमल : चल, हो पुढे – चला हो –

बाजीराव : येतो योगिराज –

गजाभाऊ : बरंय योगिराज, आम्ही जातो आमुच्या गावा. नमस्कार! कळावे. राग नसावा ही विनंती...

[ रघुनाथ क्षणभर योगिराजांकडे पाहतो आणि वळून सर्वांबरोबर जातो. रंगमंचावर फक्त योगिराज आणि पोट दाबीत बसलेला टेलर हे दोघेच राहतात. पडदा पडतो. ]

समाप्त

IRBK-0120602
IRBK-0120602

# निवेदन

या नाटकाची कल्पना ' सेकंडस ' ही कादंबरी वाचीत असताना सुचली. प्लॅस्टिक सर्जरी करून माणसाचा चेहेरामोहरा बदलून आणि त्याचा मृत्यू जाहीर करून त्याचे नवे जीवन सुरू करायचे ही ती कल्पना. फक्त बीजरूपाने ती घेऊन तिचा तीन अंकांचा विकास मी पूर्णपणे स्वतंत्र रीतीने केलेला आहे. या नाटकाचा प्रतिपाद्य विषय, त्याचा विकास, शेवट, अपेक्षित परिणाम आणि त्यातील व्यक्तिचित्रे या सर्व गोष्टी मूळ कादंबरीपेक्षा सर्वस्वी भिन्न आहेत. मूळ कादंबरी ही केवळ एक उत्कंठा वाढवीत नेणारी भयकथा आहे. वाचकाच्या अंगावर शहारे आणणे हाच तिचा उद्देश आहे. तिचा शेवटही भयानक आणि विकृत आहे. माझ्या नाटकात मी सामान्य माणसाच्या सुखदुःखाचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. मूळ कादंबरी वाचून हे नाटक पाहिल्यास किंवा वाचल्यास या दोन कृतींमधला फरक ताबडतोब लक्षात येईल.

हे नाटक लिहिताना माझे परम स्नेही श्री. दत्ता भट, तसेच गुणग्राही मर्मज्ञ टीकाकार श्री. माधव मनोहर आणि आजचे आघाडीचे नाटककार प्रा. वसंत कानेटकर यांच्या बहुमोल सूचनांचा उपयोग झाला.

चंद्रलेखेचे माझे मित्र श्री. मोहन वाघ आणि वासुदेव कोल्हटकर यांनी उत्साहाने आणि दिमाखाने हे नाटक रंगभूमीवर आणले.

आशालता वाबगावकर, दत्ता भट, आणि मोहन मुंगी यांनी वेळोवेळी प्रोत्साहन आणि धीर दिला. सर्व नटवर्गाने व पडद्यामागील कलावंतांनी पूर्ण सहकार्य दिले.

आणि केशवराव कोठावळे यांनी पुस्तकरूपाने हे नाटक रसिकांच्या समोर ठेवले.

या सर्व मित्रांचे आभार मानणे फार औपचारिकपणाचे होईल. त्यांचे प्रेम आणि सहकार्य असेच कायम राहो, हीच इच्छा.

तोरडमल बिल्डिंग, अहमदनगर.

मधुकर तोरडमल



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ३०...२०१ नों. दि ..............